आजचा सामना
लखनौ वि. गुजरात
वेळ : दु.३.३० वाजता
ठिकाण : लखनौ

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

आजचा सामना
मुंबई वि. बेंगलोर
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : मुंबई

लातूर | रविवार, १२ एप्रिल २०२६ | वर्ष ४ थे अंक ३५ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



संघ शाखा म्हणताच लक्षात येईल की, संघाचे कार्य शाखेची कार्यवाही, प्रशिक्षण, विस्तार, निर्मिती आणि उपाययोजना या पंचसूत्रीच्या आधारावर उभे असते.

**सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# अटी-तटीची चर्चा

## वाटाघाटीत इराणची सरशी ● गोठवलेला निधी-मालमत्ता परत मिळणार

◆ **इस्लामाबाद, ११ एप्रिल**

अमेरिका-इराणमध्ये झालेल्या संघर्षविरामानंतर पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे शनिवारी दोन्ही बाजूने शांतता चर्चेला प्रत्यक्ष सुरवात झाली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या मध्यस्थीने सुरू झालेल्या चर्चेत इराणच्या मुख्य तीन पैकी एका अटीवर अमेरिकेने सहमती दर्शवली. त्यानुसार अमेरिकेने कतारसह आदी देशातील इराणची गोठवलेली सहा अब्ज डॉलर्सची मालमत्तांवरील निर्बंध हटवण्यावर सहमती दर्शवली असल्याची माहिती शरीफ यांनी दिली. होर्मुझ जलमार्गावर नियंत्रण आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम या इराणच्या अटींवर सहमती झाली नसून चर्चा सुरूच असल्याचे त्यांनी सांगितले.

अमेरिकेच्या वतीने उपराष्ट्राध्यक्ष जे.डी.व्हान्स, विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे सल्लागार जेरेड कुशनर चर्चेत सहभागी झाले, तर इराणकडून संसद अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ आणि परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांची उपस्थिती होती. शाहबाज शरीफ यांनी दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींची स्वतंत्रपणे भेट घेतली. या चर्चेदरम्यान लेबनॉनमध्ये संघर्षविराम, गोठवलेली मालमत्ता परत मिळावी आणि होर्मुझवर इराणचे नियंत्रण मान्य करावे या प्रमुख अटी ठेवल्या. दुसरीकडे शरीफ यांच्याशी व्हान्स यांनी स्वतंत्र चर्चा केली. यावेळी लष्करप्रमुख असीम मुनीर, गृहमंत्री मोहसिन नक्वी उपस्थित होते. चर्चा सुरू होण्यापूर्वी तीन अटी मान्य कराव्या, अशी मागणी इराणने केल्याची माहिती व्हान्स यांना दिल्याचे शरीफ यांनी प्रसार माध्यमांना सांगितले. यावर इराणची गोठवलेली मालमत्ता परत करण्यावर अमेरिकेने सहमती दर्शवली. त्यानंतर इराणचे शिष्टमंडळ चर्चेस तयार झाले. दोन्ही बाजूने औपचारिक चर्चा सुरू झाली असून, चर्चेच्या चार फेरी होणार असल्याचे ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)



### इराणच्या प्रमुख अटी काय ?

- होर्मुझच्या सामुद्रधुनीवर संपूर्ण नियंत्रण
- युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी
- परदेशात जप्त मालमत्तावरील निर्बंध उठवावे
- संघर्षविरामात लेबनॉनचा समावेश करावा
- अमेरिकेचा हल्ला होणार नाही याची हमी द्यावी

### पहिली फेरी दोन तासांची

शरीफ यांनी सांगितले की, इराण आणि अमेरिका यांच्या शिष्टमंडळात दोन तास समोरा-समोर चर्चा झाली. चर्चेची दुसरी फेरी रात्री १० वाजताच्या सुमारास सुरू होणार आहे. अमेरिकेच्या प्रस्तावित एकूण १५ अटी आणि इराणच्या १२ अटींवर चर्चेच्या पहिल्या फेरीत चर्चा झाली. अद्याप एकाच अटीवर सहमती झाली आहे. इराणच्या काही अटी आक्षेपार्ह असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे, तथापि चर्चेतून मार्ग काढण्यावर त्यांनी सहमती दर्शवली आहे.

## तंत्रज्ञान हे घटनात्मक साधन : सरन्यायाधीश

**नवी दिल्ली, ११ एप्रिल-**

तंत्रज्ञान केवळ प्रशासकीय सोय राहिलेले नसून, ते एक घटनात्मक साधन बनले आहे. कायद्यात समानता, न्यायाची उपलब्धता आणि न्यायपालिकेला प्रक्रियात्मक कठोरतेच्या पलीकडे जाण्यास सक्षम करण्यात तंत्रज्ञानाची मोठी भूमिका आहे.



भारताला १० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी केवळ भांडवल आणि धोरणे पुरेशी नाहीत. यासाठी मजबूत आणि विश्वासार्ह कायदेशीर व्यवस्थाही तितकीच आवश्यक असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केले. बार असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने शनिवारी आयोजित न्यायिक डिजिटल परिवर्तन या विषयावर आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन सरन्यायाधीशांनी केले. याप्रसंगी त्यांनी ७,२२० कोटी रुपयांच्या खर्चातून तयार करण्यात आलेल्या ई-कोर्ट्स प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्याचा औपचारिक शुभारंभ केला. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी पारदर्शक न्यायप्रणालीची आवश्यकता आहे.

## महत्त्वाचे

### डिझेलचे निर्यात शुल्क वाढले

**नवी दिल्ली** : इराण-इस्रायल तणावाच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने महसूल वाढवण्यासाठी हाय-स्पीड डिझेल वरील निर्यात शुल्क प्रतिलिटर २१.५ रुपयांनी वाढवून ५५.५ रुपये प्रति लिटर वाढवले आहे, तर रस्ते आणि पायाभूत सुविधा उपकरही वाढवला आहे. या निर्णयामुळे डिझेलवरील एकूण कराचा बोजा लक्षणीय वाढला आहे. पूर्वीचे विशेष उत्पादन शुल्क आणि पायाभूत सुविधा उपकरात आता लक्षणीय वाढ झाली आहे. याव्यतिरिक्त, डिझेलवरील निर्यात शुल्क प्रति लिटर २१.५ वरून प्रति लिटर ५५.५ पर्यंत वाढवण्यात आले आहे.

## हिजबुल्लाहचा इस्रायलवर क्षेपणास्त्र मारा

**तेल अवीव** : अमेरिका-इराणच्या संघर्षविरामाच्या काही तासांतच इस्रायलने दक्षिण लेबनॉनमध्ये दहशतवादी संघटना हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर जोरदार प्रहार केला होता. यात हिजबुल्लाह प्रमुखाच्या पुतण्यासह ३०० पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू तर, हजारो नागरिक जखमी झाले होते. हल्ल्याला प्रत्युत्तर देत शनिवारी पहाटे हिजबुल्लाहने इस्रालच्या राजधानीसह अनेक शहरांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात दक्षिण इस्रायलमधील अशदोद बंदर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. या हल्ल्यात २८ नागरिक ठार, ५६ पेक्षा अधिक जखमी आहे. हिजबुल्लाहच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत इस्रायलनेदेखील लेबनॉनवर हल्ले सुरू केले आहेत. इस्रायली संरक्षण विभाग अर्थात् आयडीएफने निवेदनात म्हटले की, हिजबुल्लाहने शनिवारी केलेल्या हल्ल्यात अशदोद बंदराचे मोठे नुकसान झाले.

## आशा भोसले यांना हृदयविकाराचा झटका



**मुंबई** : प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांना शनिवारी हृदयविकाराचा झटका आला. त्यांना मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती सूत्रांनी दिली. तिथे त्यांच्यावर आपत्कालीन विभागात उपचार सुरू आहे. सध्या त्यांच्या प्रकृतीबाबत अधिक माहिती उपलब्ध झाली नाही. त्यांच्या कुटुंबीयांनी, टीमने अथवा रुग्णालय प्रशासनाने याबाबत अद्याप कोणतेही निवेदन जारी केलेले नाही.


Suyash
नवीन प्रवेश
- इ.१०वी बोर्ड परीक्षेला बसलेले विद्यार्थी
  - ११वी सायन्स रेग्युलर (JEE,NEET,CET)
  - ब्रीज कोर्स(फक्त एप्रिल व मे)
- १२वी सायन्स
- १०वी व्हेकेशन बॅच(एप्रिल/मे) (Science, Maths, English)
- मूलभूत शिक्षण,स्पर्धा परीक्षा (JEE,NEET,CET पूर्ण तयारी)
- शास्त्रज्ञ,शिक्षक,प्रोफेसर इत्यादीसाठी लागणारे पायाभूत ज्ञान, सर्व प्रॅक्टीकल्स व प्रोजेक्टसहित
- निवासी/अनिवासी/बस सुविधा

‘सुयश’ची विद्यादान योजना
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलां-मुलींसाठी संपूर्ण शिक्षण मोफत व इतर सुविधा(अल्प शुल्क)
- इतर विद्यार्थ्यांसाठी शुल्कमध्ये २०-२५% स्कॉलरशिप

सुयश ज्युनिअर कॉलेज
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.
मोबा.७६२०७०९२३७, ९७३०७०१४०७,

प्रवेश चालू
CBSE/STATE BOARD
- CBSE Nursery ते ५वी, ७वी ते १०वी
- State Board(semi. Eng.) ५वी, ७वी ते १०वी
- विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील NTS, MTS, NEET, JEE पूर्वतयारी. Foundation classes मोजक्याच जागा उपलब्ध आहेत. त्वरीत संपर्क साधावा.

सुयश गुरुकुल/सेंट्रल स्कूल(CBSE)
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.
मोबा.७६२०७०९२३७





## महत्वाचे...

### वासुद गावाचा हिरवा संकल्प १ हजार ३०० झाडे जगवत निसर्गाचे रक्षण



**सांगोला, दि. ११ एप्रिल-**

सांगोला तालुक्यातील वासुद हे माण नदीकाठी वसलेले छोटेसे गाव आज वृक्षसंवर्धनाच्या कार्यामुळे संपूर्ण परिसरासाठी प्रेरणास्थान ठरत आहे. गावातील तरुण, ग्रामस्थ, विद्यार्थी आणि परदेशी स्थायिक झालेले गावकरी यांनी मिळून तब्बल १ हजार ३०० झाडे लावून ती यशस्वीपणे जगवण्याचा संकल्प पूर्ण केला आहे. गावातील एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यावेळी अंत्यविधीसाठी गेलेल्या तरुणांना स्मशानभूमीत एकही झाड नसल्याची जाणीव झाली. त्या क्षणीच त्यांनी ठरवले गाव हिरवागार करायचा आणि झाडे फक्त लावायची नाहीत, तर जगवायची ! गावभर हरित क्रांती या संकल्पातून सुरू झालेले वृक्षारोपण आज गावाच्या प्रत्येक कोपऱ्यात फुलले आहे. वासुद ते सांगोला रोड, अकोला रोड, सूतगिरणी रोड, केदारवाडी रोड, सातकी रोड तसेच मंदिर परिसर, शाळा, गावठाण जिथे जागा दिसेल तिथे फळझाडे, फुलझाडे आणि सावली देणारी झाडे लावण्यात आली आहेत. या उपक्रमात प्रत्येक घटकाचा मोलाचा वाटा आहे त्यामध्ये ग्रामपंचायत व विकास सोसायटी, तरुण मंडळे, हनुमान विद्यालय वासुद येथील विद्यार्थी, जि.प.प्राथमिक शाळेतील विद्यार्थी गावातील महिला व ज्येष्ठ नागरिक यांचा तसेच गावापासून दूर पुणे, मुंबई, दिल्ली येथे असलेले अधिकारी व उद्योजक यांनी सुद्धा आर्थिक मदत करत सहभाग नोंदविला. फक्त लागवड न करता जोपासना करत दर आठवड्याला टँकरने पाणीपुरवठा तसेच काही शेतकऱ्यांकडून ड्रिप सिंचन व तरुणांकडून नियमित देखभाल करत आहेत. एप्रिलच्या कडक उन्हात जेव्हा माणूस, जनावरे आणि पक्षी या झाडांच्या सावलीत निवारा घेतात तेव्हा या उपक्रमाचे खरे महत्त्व जाणवत आहे. झाडे लावा आणि झाडे जगवा हा संदेश वासुद गावाने या कृतीतून दिला आहे.



### नानाजी देशमुख यांच्या प्रेरणेने माताबालक प्रतिष्ठानची स्थापना

#### डॉ. संजीवनी केळकर; सांगोल्यात चैत्र गौरी हळदीकुंकू कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ एप्रिल-**

महिलांना प्रसंगी काली, शारदा आणि लक्ष्मी ही तीन रूपे अंगीकारून वागावे लागते. पूर्वी महिलांना सन्मानाचे जीवन मिळत नव्हते. या महिलांना एकत्र आणून सहविचार केंद्र सुरू केले आणि प्रथम त्यांच्या मुलांसाठी संस्कार वर्ग सुरू करण्यात आले आणि ते यशस्वीपणे चालवले. याच पार्श्वभूमीवर नानाजी देशमुख यांच्या प्रेरणेने माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानची स्थापना झाली असल्याचे प्रतिपादन संस्थापिका डॉ. संजीवनी केळकर यांनी केले.

माताबालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला यांच्यावतीने आयोजित चैत्र गौरी पूजन व हळदीकुंकू कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी दीर्घकाळानंतर सहविचार केंद्र पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेत कुटुंब व्यवस्थेतील महिलांची भूमिका या विषयावर मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्षा प्रा. नीलिमा कुलकर्णी तर तहसीलदार बाळूताई भागवत, डॉ.स्मिता गव्हाणे, खजिनदार शालिनी कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी उपस्थित होत्या. यावेळी सहविचार केंद्राच्या विजया बनसोडे, विजया खडतरे, सुमन कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शुभांगी कवठेकर यांनी केले. आभार अश्विनी कुलकर्णी यांनी मानले. हा कार्यक्रम महिला सक्षमीकरण, कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीवर आधारित असल्याने उपस्थितांना नवी ऊर्जा व प्रेरणा देऊन गेला.

> महिलांनी अनावश्यक जबाबदाऱ्यांचे ओझे न घेता आत्मविश्वासाने निर्णय घ्यावेत. स्वतःच्या ज्ञानावर विश्वास ठेवावा व प्रगल्भ व्हावे. मुलांना महिलांचा आदर करण्याचे संस्कार द्यावेत. आपले अनुभव व ज्ञान पुढील पिढीला द्यावे. शरीराकडे लक्ष द्यावे. वयाच्या चाळिशीनंतर आरोग्यविषयक समस्या येऊ नयेत म्हणून नियमित व्यायाम व संतुलित आहार घ्यावा. स्वतःवर प्रेम करावे.
>
> **- बाळू भागवत,** तहसीलदार, सांगोला

## ‘हर घर योद्धा’ उपक्रमातून महिला सशक्तीकरणाला नवी दिशा

### स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

वाढत्या महिला अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर युवतींना सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने हिंदु जनजागृती समितीच्या हर घर योद्धा या अभियानांतर्गत १ एप्रिल ते १० जुलै २०२६ या कालावधीत सोलापूरमधील शेकडो तरुणींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सोलापूर येथील साई मंदिर (जुने घरकुल) येथे ७ दिवसीय विशेष स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले.

या ७ दिवसीय प्रशिक्षणात प्रशिक्षक धनंजय बोकडे यांनी २५ युवतींना लाठी-काठी, निःशस्त्र युद्धकला, नानचाकू, तसेच विविध स्वसंरक्षण तंत्रांचे प्रशिक्षण दिले. या शिबिरात केवळ शारीरिक प्रशिक्षणावर भर न देता, समाजात सुरक्षित वावर कसा ठेवावा, संकटसमयी कसा प्रतिकार करावा आणि हिंदु धर्माचे महत्त्व काय आहे, याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराच्या सांगता समारंभात प्रशिक्षित युवतींनी लाठीकाठी आणि नानचाकूचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी युवतींना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आम्ही स्वतः कधीही अत्याचाराला बळी पडणार नाही आणि इतर कोणत्याही महिलांवर अन्याय होऊ देणार नाही, अशी सामूहिक शपथ युवतींनी घेतली.

कार्यक्रमास संस्थेच्या संत पू. दीपाली मतकर, हिरालाल तिवारी आणि हिंदु जनजागृती समितीचे संकेत पिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी साई मंदिराचे विश्वस्त राहुल तलकोकूल आणि मनोज बुधाराम यांचे सहकार्य लाभले.



### समता सप्ताहात महात्मा फुले जयंतीनिमित्त संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता सप्ताह राबविण्यात येत आहे.

८ एप्रिलपासून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत शनिवारी सोलापूर जिल्हापरिषदेच्या शिवरत्न सभागृहात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

तदनंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून सामाजिक समतेचा संदेश देण्यात आला. तसेच महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाटपही करण्यात आले. जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

समता सप्ताहाच्या माध्यमातून समाजात समतेची जाणीव दृढ करण्याचा प्रयत्न होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रास्ताविक विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांनी केले.



### वटवृक्ष मंदिरातील दर्शन व्यवस्था पाहून समाधान वाटले : खा.वाघमारे

**अक्कलकोट, दि. ११ एप्रिल-**

मंदिर समितीचे सर्व नियोजन समितीचे चेअरमन महेश इंगळे हे अत्यंत कार्यकुशलतेने व समर्पण भावनेने हाताळत आहेत, त्यामुळे श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात महिला भाविकांसाठी असलेली स्वतंत्र दर्शन व्यवस्था पाहून समाधान वाटले असल्याचे मनोगत नूतन राज्यसभा सदस्या, खासदार वाघमारे यांनी व्यक्त केल्या.

त्या नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांनी त्यांचा सत्कार केला. माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांचाही वाढदिवसानिमित्त स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद देवून चेअरमन महेश इंगळे यांनी सत्कार केला. यावेळी नगरसेवकद्वय अमोल शिंदे, प्रियदर्शन साठे यांच्यासह अमर पाटील, दिपक पाटील, भिमा वाघमारे, गणेश तुपडोळे, लक्ष्मण वाघमारे, गणेश जंगडेकर, भैय्या माने, सागर नवत्रे, सिद्धार्थ गायकवाड, विश्वनाथ हडलगी, सुनिल कटारे, प्रा.सूर्यकांत कडबगांवकर, आत्माराम घाटगे, महेश गोगी, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव, रमेश शिंदे, श्रीकांत मलवे, ज्ञानेश्वर भोसले उपस्थित होते.

## वळसंग येथे समाधान शिबीर

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग दि. ११ एप्रिल-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हापरिषद सोलापूर कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी सावकार व वळसंग पंचायत समिती सदस्य गटनेते बलवान गोतसुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्या सुनियोजनातुन वळसंग येथील शंकरलिंग प्रशालेच्या प्रांगणात नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने यशस्वीपणे संपन्न पार पडले.

यावेळी बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित महसुली सेवांचा एकाच ठिकाणी, निश्चित कालमर्यादेत आणि सुलभ पद्धतीने निपटारा करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी माध्यम ठरत असल्याचे सांगितले. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार, ७/१२ मधील दुरुस्त्या, डिजीटल स्वाक्षरीसह ७/१२ व ८-अ उताऱ्यांचे वाटप, नॉन-क्रीमिलेअर प्रमाणपत्र, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, अकृषिक (छ) परवानगी, सनद प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दाखले, तुकडेबंदी कायद्यांतर्गत प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप, शासकीय घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू कुपन वाटप, इ-मोजणी अर्ज, पीएम किसान नोंदणी तसेच भूसंपादन व पंचायत समिती आणि तालुका कृषी विभागाच्या इतर विविध शासकीय सेवांचा समावेश करण्यात आला होता.

यावेळी तहसीलदार किरण जमदांडे, सोलापूर जिल्हा परिषद कृषी सभापती रामप्पा चिवडशेट्टी, दक्षिण सोलापूर पंचायत समिती गटनेते बलवान गोतसुर्वे, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार मंडल अधिकारी संतोष फुलारी, जिल्हापरिषद सदस्य नेताजी खडागळे, गेनसिद्ध बहीरगुंडे, वळसंग सरपंच जगदिश अंटद, विश्रांती पाटील, श्रीशैल दुधगी, शिवशरण थळगे, अनिल बर्वे उपस्थित होते.

## सोलापुरात इलेक्ट्रिक एसयूव्ही ई-विटाराचे अनावरण



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

देशातील आघाडीची वाहन उत्पादक कंपनी मारुती सुझुकी नेक्सा या प्रीमियम रिटेल नेटवर्क तर्फ सोलापूरमध्ये अत्याधुनिक इलेक्ट्रिक एसयूव्ही ई-विटाराचे भव्य अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुण्या

राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी नवीन गाडीचे अनावरण केले. व त्यांच्यासोबत जिल्हाध्यक्ष शिवसेना शिंदे गट व नगरसेवक अमोल शिंदे व नगरसेवक प्रियदर्शन साठे हे हे देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. शिवप्रकाश बाबू चव्हाण यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

सदर अनावरण सोहळा अशोक चौक परिसरातील नेक्सा चव्हाण मोटर्स येथे मोठ्या उत्साहात पार पडला. इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित करणारी ही एसयूव्ही ई-विटारा ग्राहकांसाठी आजपासून उपलब्ध करण्यात आली आहे.

एसयूव्ही ई-विटारा या गाडी विषयी माहिती सांगताना घनश्याम चव्हाण यांनी सदर एसयूव्ही वाहन एकाच चार्जमध्ये सुमारे ५४३ किमी पर्यंतची रेंज देत असल्याचा दावा कंपनीने केला आहे. तसेच या वाहनावर ८ वर्षांची बॅटरी वॉरंटी देण्यात येणार असून, कंपनीने संपूर्ण भारतात प्रत्येक ५० किलोमीटरवर उपलब्ध करून दिला चार्जिंग स्टेशनवर सदर एसयूव्ही चाळीस मिनिटात पूर्ण चार्ज होते. एक वर्ष फ्री चार्जिंगची योजना देखील उपलब्ध आहे, असे उद्घाटनाप्रसंगी त्यांनी सांगितले.

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी कंपनीने विशेष ऑफर्स जाहीर केल्या आहेत. यामध्ये ६०% अश्युअड बायबॅक, मोफत होम चार्जर व त्याची इंस्टॉलेशन सुविधा (सुमारे ५० हजार किंमतीची), तसेच या एसयूव्ही ई-विटारा ची प्रारंभिक किंमत ‘इंट्रोडक्टरी इररड’ योजनेअंतर्गत सुमारे १०.९९ लाख ठेवण्यात आली असून, बॅटरीसाठी वेगळी एचख योजना (३.९९ प्रति किमी) उपलब्ध आहे.

कार्यक्रमात बोलताना खासदार प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी चव्हाण परिवारांच्या सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमात अनेक वेळा उपस्थित राहिल्याचे त्यांनी नमूद केले व नवीन गाडी विषयी बोलताना ई-विटारा- खुशियों का पिटारा असे संबोधित केले व इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पर्यावरणपूरक आणि इंधन बचतीसाठी ही एसयूव्ही ग्राहकांसाठी एक उत्तम पर्याय ठरेल, असे त्यांनी उद्घाटनाप्रसंगी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमात चव्हाण परिवारातर्फे लक्ष्मी चव्हाण, अमृता चव्हाण व पुरुषोत्तम चव्हाण हे देखील या कार्यक्रमात उपस्थित होते दरम्यान, एसयूव्ही ई-विटारा साठी बुकिंग सुरू करण्यात आले असून, ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याचे आयोजकांनी सांगितले.



### महामानव चषक क्रिकेट स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती तसेच एस. एस. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त महामानव चषक क्रिकेट स्पर्धेस सुरुवात झाली.

याचे उद्घाटन अधिकारी टिळकचंद कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी एस. एस. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेषराव शिरसठ, जयंती उत्सव अध्यक्ष बाळासाहेब गोतसुर्वे, प्राणी संग्रहालय प्रमुख डॉ. चौगुले, उद्यान अधीक्षक स्वप्नील सोलनकर, अनिल जगझाप, लिंबराज जेठीथोर, सतीश नागटिळक आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करून क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून एकात्मता, बंधुता आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याचे आवाहन केले.

महामानव चषक स्पर्धेमुळे कर्मचारी वर्गामध्ये क्रीडाप्रेम वाढण्यासोबतच संघभावना दृढ होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## गुलमोहर, रॉयल्स अंतिम फेरीत

### इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग: सर्फराज शेख, संदीप व्हटकर सामन्याचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीगच्या १६ व्या पर्वात गुलमोहर के. के. आणि रॉयल्स या संघांनी अंतिम फेरीत धडक मारली.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील पहिल्या उपांत्य सामन्यात गुलमोहर के.के. संघाने थंडर्स संघाचा ३८ धावांनी पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना गुलमोहर संघाने १५ षटकांत ४ बाद १३२ धावांचे लक्ष्य उभे केले. संदीप व्हटकरने ५४ धावांची शानदार खेळी केली. प्रत्युत्तरदाखल थंडर्सचा संघ १५ षटकांत ८ बाद ९४ धावाच करू शकला. अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या संदीप व्हटकरला (५४ धावा व २ बळी) सामनावीर घोषित करण्यात आले.



सर्फराज शेख



संदीप व्हटकर

दुसऱ्या उपांत्य सामन्यात रॉयल्स संघाने समर्थ इलेव्हन संघावर ६ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना समर्थ इलेव्हन संघाने १५ षटकांत ३ बाद १२६ धावा केल्या. यामध्ये इम्तियाज अत्तार (नाबाद ५६ धावा) आणि रवी माने (४७ धावा) यांची खेळी महत्त्वपूर्ण ठरली. मात्र, रॉयल्स संघाने हे आव्हान १४व्या षटकातच ५ बाद १२७ धावा करत पूर्ण केले. सरफराज शेख याने ३१ धावांचे योगदान देत सामनावीर किताब पटकावला.

**संक्षिप्त धावफलक**

**गुलमोहर के.के.:** १५ षटकांत ४ बाद १३२ धावा. (संदीप व्हटकर ५४, काशीनाथ कोळी २५, मोहसीन शेख १८, गजानन पिंगुलवार २-१०, राजपाल सरवदे १-१०, प्रभुराज चितापुरे प्रत्येकी १-२३) **विजयी विरुद्ध थंडर्स:** १५ षटकांत ८ बाद ९४ धावा. (इम्तियाज शेख ३६, राजपाल सरवदे १८, आनंद बबलेश्वर ३-१५, संदीप व्हटकर २-१७, सोमनाथ किल्लेदार १-६).

**समर्थ इलेव्हन :** १५ षटकांत ३ बाद १२६ (इम्तियाज अत्तार नाबाद ५६, रवी माने ४७, प्रशांत भट १-९, अनिकेत कदम १-१८, डॉ.सचिन वांगीकर १-२६) **पराभूत विरुध्द रॉयल्स:** १४ षटकांत ५ बाद १२७ धावा. (सरफराज शेख ३१, बालाजी बोल्ली ३०, प्रमोद मंगलपल्ली २०, मोहसीन शेख २-१५, सिराज अहमद शेख २-१६).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### शस्त्रांसह अफूची पोती जप्त, दोघांना अटक

**इम्फाळ :** मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यात शस्त्रे आणि अफूच्या बियांची पोती जप्त करून दोघांना अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. शुक्रवारी चुराचंदपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील टी बांगला एमव्हीसीपी परिसरातून त्यांना ताब्यात घेण्यात आले, असे पोलिसांच्या एका निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या ताब्यातून एक सुधारित कार्बाईन, एक ९ मिमी पिस्तूल, १,८०० किलो अफूच्या बिया असलेली ३६ पोती आणि दोन वाहने जप्त करण्यात आल्याचेही या निवेदनात म्हटले आहे. दुसऱ्या एका कारवाईत, सुरक्षा दलांनी चंडेल जिल्ह्यातील चकपिकारोंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ताईजांग गावाच्या वनक्षेत्रातून शस्त्रे आणि स्फोटकांचा मोठा साठाही जप्त केला. या कारवाईदरम्यान एक एके-४७ रायफल, मॅगझिन्ससह चार गावठी बंदुका, सात मोर्टार, सुमारे चार किलो वजनाचा आयईडी बनवण्याचे साहित्य आणि पाच वॉकी-टॉकी सेट, अशा विविध वस्तू जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. दोन वर्षांपूर्वी वांशिक हिंसाचार भडकल्यापासून, मणिपूरमध्ये सुरक्षा दलांकडून सातत्याने शोधमोहिमा राबवल्या जात आहेत.

### झोपड्यांना आग लागून तिघांचा मृत्यू

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात एका वस्तीत भीषण आग लागून तीन जणांचा मृत्यू झाला. या आगीमुळे अनेक एलपीजी सिलेंडर्सचे स्फोट झाले, अशी माहिती एका पालिका अधिकाऱ्याने शनिवारी दिली. मीरा-भाईंदर परिसरातील नवघर भागात असलेल्या इंद्रलोक झोपडपट्टी वसाहतीत शुक्रवारी रात्री ही आग भडकली, असे मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे यांनी सांगितले. गवत आणि कापडापासून बनवलेल्या तात्पुरत्या झोपड्यांच्या या दाट वस्तीत आग वेगाने पसरल्यामुळे, आगीच्या ज्वाला दुरूनही स्पष्टपणे दिसत होत्या. या घटनेत सुमारे ३० ते ३५ झोपड्या जळून खाक झाल्या. आगीच्या धुमश्चक्रीदरम्यान अनेक गॅस सिलेंडर्सचे स्फोट झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळावरून तब्बल २४ सिलेंडर्स सुरक्षितपणे बाहेर काढले. अग्निशमन दलाच्या जवानांनी एक तास शर्थीचे प्रयत्न केल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळवले, असे बोराडे यांनी सांगितले.



### शाळेत दररोज गायिले जावे 'वंदे मातरम्'

नवी दिल्ली : देशातील सर्व शाळांमध्ये प्रार्थनेच्यावेळी दररोज 'वंदे मातरम्' गायिले जावे अशा सूचना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जारी केल्या आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने अलीकडेच काढलेल्या आदेशाचा उल्लेख प्रसिद्धीपत्रकात करण्यात आला. शिक्षण मंत्रालयाने विद्यापीठांसह सर्व उच्च शिक्षण संस्थांना प्रमुख सांस्कृतिक कार्यक्रमांदरम्यान संपूर्ण 'वंदे मातरम्' गाण्याच्या सूचना जारी केल्या आहे. २८ जानेवारी रोजी, गृह मंत्रालयाने देशभरातील सर्व मंत्रालये आणि राज्य सरकारांच्या मुख्य सचिवांना 'वंदे मातरम्' गीताच्या अंमलबजावणीसंदर्भात आदेश जारी केला होता. शिक्षण मंत्रालयाने याच आदेशाच्या प्रतीसह, सर्व शाळा आणि विद्यापीठांना याच सूचनांचे पालन करण्याचा निर्देश दिला.

# विदर्भ, मराठवाड्यात भूकंपाचे सौम्य धक्के


**रिश्टर स्केलवर ४.७ इतकी तीव्रता**

**नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

◆ **यवतमाळ, ११ एप्रिल**

विदर्भातील यवतमाळ, वाशीम आणि चंद्रपूर येथे तसेच मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि परभणी जिल्ह्यांना शनिवारी सकाळी रिश्टर स्केलवर ४.७ तीव्रतेचे धक्के बसले. भूकंपाचे धक्के सौम्य असले, तरी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

वाशीममधील रिसोड तालुक्यात रिठद भागात तसेच वाशीम शहरातील काही भागांत भूकंपाचे धक्के जाणवले. चंद्रपुरात राजुरा तालुक्यातील हरदोना येथे धक्के जाणवले. भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा मालमत्तेची हानी झालेली नाही. नागरिकांनी घाबरून न जाता शांतता राखावी. आपत्ती व्यवस्थापन विभाग, महसूल प्रशासन व स्थानिक यंत्रणा सतर्क असून, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी सज्ज आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले. भूकंपाचे धक्के जाणवल्यास सुरक्षित ठिकाणी जावे, इमारतीबाहेर मोकळ्या जागेत उभे राहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल यांनी केले. सकाळी ८.४५ वाजता झालेल्या भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली १० किमी होता. रिश्टर स्केलवर त्याची ४.७ तीव्रता नोंदविण्यात आली. या भूकंपामुळे यवतमाळ जिल्ह्यात कोणतीही हानी झाली नाही. मात्र, इसापूर धरणामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.




> "गोदावरी नदीचे पाणी जमिनीत शिरते. त्यामुळे भूगर्भीय हालचालींना गती मिळून अशा सूक्ष्म भूकंपाची शक्यता असते."
> **प्रा. सुरेश चोपणे,** ग्रीन प्लॅनेट सोसायटीचे अध्यक्ष

**हिंगोलीजवळ केंद्रबिंदू**

या भूकंपाचा केंद्रबिंदू वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे गावाजवळ होता. या भूकंपाचे सौम्य धक्के उमरखेड शहरातील हनुमान वार्ड, विवेकानंद कॉलनी, सेवादास कॉलनी, नाथनगर तसेच विठ्ठल परिसरात जाणवले. काही नागरिकांनी जमिनीतून आवाज येऊन घर हलल्यासारखे वाटल्याचे सांगितले, तर काहींना सलग २ ते ३ धक्के जाणवले. अंदाजे ५ ते ६ सेकंद हा कंप जाणवल्याची माहिती आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# करुणानिधींसोबत मतभेदानंतर अण्णाद्रमुकची स्थापना

### एम.जी. रामचंद्रन् झाले कट्टर प्रतिस्पर्धी

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ११ एप्रिल**

द्रमुकचे अध्यक्ष एम.के.करुणानिधी यांच्याशी मतभेद झाल्यानंतर एम.जी रामचंद्रन् यांनी अण्णाद्रमकची स्थापना केली. पुढे तामिळनाडूच्या राजकारणात हे दोन्ही पक्ष एक दुसऱ्याचे कट्टर प्रतिस्पर्धी झाले.

तामिळनाडूत कधी द्रमुकची तर, कधी अण्णाद्रमुकची सत्ता येत असते. सध्याची विधानसभा निवडणूक राज्यात या दोन आघाड्यांच्या नेतृत्वातच होत आहे. भाजपाच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी ही लढत तिरंगी करण्याच्या प्रयत्नात आहे.

करुणानिधी हे द्रमुकचे अध्यक्ष आणि सर्वेसर्वा होते, तर रामचंद्रन् द्रमुकमध्ये कोषाध्यक्ष होते. कोषाध्यक्ष म्हणून अधिकार बजावण्याचा प्रयत्न करत रामचंद्रन् यांनी काही बँक खात्यांचा हिशेब करुणानिधी यांच्याकडे मागितला. यामुळे करुणानिधी संतप्त झाले, त्यांचा अहंकार दुखावला गेला, परिणामी त्यांनी द्रमुकमधून रामचंद्रन् यांची हकालपट्टी केली.

द्रमुकमधून बाहेर पडल्यानंतर रामचंद्रन् यांनी अण्णाद्रमुक या आपल्या नव्या पक्षाची स्थापना केली. करुणानिधी यांच्या नेतृत्वाला खरे आव्हान तामिळनाडूच्या राजकारणात कोणी दिले असेल तर, ते रामचंद्रन् यांनी. ते पाहून आपण उगीच रामचंद्रन् यांची पक्षातून हकालपट्टी केली, त्यांना पक्षातच राहू दिले असते तर, पुढचे सगळे रामायण टळले असते, असे नक्कीच करुणानिधी यांना वाटले असावे.




१९७२ मध्ये अण्णाद्रमुकची स्थापना झाल्यानंतर रामचंद्रन् यांच्या नेतृत्वात पक्षाने १९७७, १९८० आणि १९८५ अशा सलग तीन विधानसभा निवडणुका जिंकल्या. १९७७ मध्ये रामचंद्रन् पहिल्यांदा तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाले. सलग तीनदा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याचा विक्रमही रामचंद्रन् यांनी केला. १९८५ मध्ये तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर दोन वर्षांतच रामचंद्रन् यांचे निधन झाले. रामचंद्रन् यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी व्ही. एन. जानकी आणि जयललिता यांच्यात विभाजन झाले. प्रसिद्ध तामीळ चित्रपट अभिनेत्री असलेल्या जानकी या रामचंद्रन यांच्या तिसऱ्या पत्नी होत्या. रामचंद्रन् यांच्या निधनानंतर अण्णाद्रमुक विधिमंडळ पक्षाच्या नेत्या म्हणून त्यांची निवड करण्यात आली आणि मुख्यमंत्रिपदाची त्यांनी शपथ घेतली. त्या फक्त २४ दिवस या पदावर होत्या. राज्यातील पहिल्या महिला मुख्यमंत्री अशी त्यांची ओळख निर्माण झाली.

## जानकी रामचंद्रन् ठरल्या औटघटकेच्या मुख्यमंत्री

◆ **नवी दिल्ली, ११ एप्रिल**

अण्णाद्रमुकचे एम.जी. रामचंद्रन् तामिळनाडूचे मुख्यमंत्री असताना जानकी या राजकारणात सक्रिय नव्हत्या. काही सार्वजनिक कार्यक्रमांना त्या फक्त उपस्थित राहात होत्या.

१९८४ मध्ये रामचंद्रन् यांची प्रकृती बिघडल्यावर जानकी यांनी रामचंद्रन् आणि अण्णाद्रमुकचे कार्यकर्ते यांच्यात संपर्कसूत्र म्हणून काम केले. रामचंद्रन् यांचे निधन झाल्यानंतर पक्षातील काही नेत्यांनी त्यांना मुख्यमंत्री होण्याची गळ घातली. मात्र, पक्षातील एका गटाचा त्यांना मुख्यमंत्री करण्यास विरोध होता. मात्र, जानकी रामचंद्रन यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपालांनी त्यांना विश्वासदर्शक प्रस्ताव पारित करायला सांगितला. पक्षातील काही आमदारांचा त्यांच्या नेतृत्वाला विरोध होता. त्यामुळे विश्वासदर्शक प्रस्तावाला विरोध



करण्याची भूमिका त्यांनी घेतली. विधानसभेच्या अध्यक्षांनी या आमदारांना अपात्र घोषित केले. विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला, हाणामारीची स्थिती उद्‌भवली. या गदारोळात विश्वासदर्शक प्रस्ताव पारित झाल्याचे विधानसभेच्या अध्यक्षांनी जाहीर केले. सभागृहातील परिस्थिती हाताबाहेर गेल्यामुळे पोलिस बोलवावे लागले. सभागृहात प्रचंड धुमश्चक्री झाली. राज्यातील अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी कलम ३५६ चा उपयोग करीत जानकी यांचे सरकार बरखास्त केले आणि राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली.

अण्णाद्रमुकचे दोन गट झाले, जानकी यांच्या नेतृत्वातील एक गट तर जयललिता यांच्या नेतृत्वातील दुसरा गट. अण्णाद्रमुकचे दोन पत्ती हे निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाने गोठवले. १९८९ ची विधानसभा निवडणूक जानकी यांच्या नेतृत्वातील गटाने दोन कबुतर या निवडणूक चिन्हाखाली लढवली, त्यांना फक्त दोन जागा जिंकता आल्या. पुढे काही दिवसांनी अण्णाद्रमुकचे दोन्ही गट एकत्र आले आणि जानकी रामचंद्रन् यांनी कायमस्वरूपी राजकारण संन्यास घेतला. द्रमुक आणि अण्णाद्रमुकला फुटीचा जुना शाप आहे. जयललिता यांच्या निधनानंतरही अण्णाद्रमुकमध्ये फूट पडली, त्याचे दोन गट झाले. गंमत म्हणजे अण्णाद्रमुकमध्ये जेवढी फूट पडली, तेवढी फूट द्रमुकमध्ये कधी पडली नाही. याचा अर्थ द्रमुकमध्ये पक्षांतर्गत मतभेद झाले नाही, असे नाही. ◂(तभा वृत्तसेवा)


# भोंदू खरात प्रकरणात प्रत्येकावर कारवाई होणार

### छगन भुजबळ यांचा इशारा

◆ **पुणे, ११ एप्रिल**

भोंदू अशोक खरात प्रकरणाशी संबंधित असलेल्या प्रत्येकावर कडक कारवाई होणार आहे. खरातच्या दुष्कृत्यांत जे जे सहभागी आहेत, त्यांच्यावर गेल्या सहा महिन्यांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष आहे. आता कारवाईला सुरुवात झाली आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केले.

महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी पुण्यातील फुले वाड्याला भेट दिल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. भुजबळ म्हणाले की, लोकांनी शाहू, फुले



आणि आंबेडकरांचे विचार आचरणात आणले पाहिजेत. समाजाने अंधश्रद्धेपासून दूर राहावे, तरच असे भोंदू निर्माण होणार नाहीत. खरात प्रकरणामुळे नाशिक जिल्हा बदनाम होत आहे, ही दुर्दैवी बाब आहे.

महत्त्वाच्या पदांवरील महिला आरक्षणाबाबत विचारले असता ते म्हणाले, जी महिला संबंधित पदाला न्याय देण्यास सक्षम आहे, तिलाच संधी मिळावी ही आमची भूमिका आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री योग्य निर्णय घेतील. तसेच, त्यांच्या हेलिकॉप्टरबाबत झालेल्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना ते म्हणाले की, कोणताही अपघात झालेला नाही. हेलिपॅड न दिसल्यामुळे हेलिकॉप्टर कार पार्किंगमध्ये सुरक्षित उतरले, काळजी करण्याचे कारण नाही.

छगन भुजबळ यांनी यावेळी सामाजिक प्रबोधनावर भर दिला. भोंदूगिरीला बळी पडण्यापेक्षा विवेकी विचारांची कास धरण्याचे आवाहन त्यांनी केले. खरात प्रकरणातील तपासाची व्याप्ती मोठी असून, यात सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीला सोडणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, राजकीय नियुक्त्यांमध्ये गुणवत्तेला प्राधान्य देण्याचे संकेतही त्यांनी यावेळी दिले. ◂(वृत्तसंस्था)

### बस-पिकअपच्या धडकेत १० ठार, २५ जखमी

◆ **कटिहार, ११ एप्रिल**

कटिहारमध्ये एक हृदयद्रावक घटना घडली. राष्ट्रीय महामार्ग -३१ वर दातपूर मुसाहरी चौकाजवळ भरधाव बस आणि पिकअप व्हॅनची जोरदार धडक झाली. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला तर, २५ हून अधिक लोक जखमी झाले आहे. जखमींपैकी अनेकाची प्रकृती गंभीर असल्यामुळे मृतकांची संख्या वाढू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. हरदा ते पूर्णियाला जाणाऱ्या बसचा चालक नशेत होता. बस दातपूर मुसाहरी चौकाजवळ पोहोचताच तिने समोरून येणाऱ्या एका पिकअप व्हॅनला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, रस्त्यावरून जाणाऱ्या दोन दुचाकींनाही फटका बसला. या अपघातामुळे घटनास्थळी प्रचंड गोंधळ उडाला. स्थानिक गावकऱ्यांनी आणि पोलिसांनी तात्काळ बचावकार्याला सुरुवात करत जखमींना रुग्णालयात दाखल केले. ◂(वृत्तसंस्था)

# वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी : शरद पवार



**समता, प्रबोधनाऐवजी धर्मांध शक्तींना बळ देणारी मांडणी**

◆ **मुंबई, ११ एप्रिल**

वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी होत आहे. या प्रवृत्तीमुळे चळवळीचा मूळ प्रबोधनात्मक हेतू धोक्यात येत आहे, अशी वादग्रस्त भूमिका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेत घेतली.

अखिल भारतीय साहित्य संमेलन या कार्यक्रमाच्या पृष्ठभूमीवर दिलेल्या लेखात शरद पवार यांनी वारकरी परंपरेतील बदलत्या प्रवाहांवर भाष्य केले. त्यांच्या मते, या संप्रदायातील सुमारे ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी होत आहे. समतेचा आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या वारकरी चळवळीमध्ये अशा विचारांची वाढ होणे, ही बाब चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पृष्ठभूमीवर काही पुरोगामी विचार मांडणाऱ्या व्यक्तींची नोंद घेण्याचे काम सुरू केले आहे. सध्या सुमारे चाळीस जण असे दिसून येतात की, जे कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून प्रगत विचार मांडत आहेत. अशा लोकांची संख्या वाढणे आवश्यक आहे. समाजप्रबोधनासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आज वारकरी चळवळीत महिलांचा अभाव आहे. प्रबोधनाच्या या प्रवाहात महिलांचा सहभाग फारसा दिसत नाही, ही बाब दुर्दैवी आहे. समाजातील सर्व घटकांचा समतोल सहभाग असणे आवश्यक आहे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

या संमेलनाचे उद्‌घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, देशभरातील महिला शासकीय अधिकारी यात सहभागी होत आहेत. या निमित्ताने सामाजिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा होत असून, त्यात वारकरी संप्रदायावरील पवार यांच्या विधानामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

# वारकरी संप्रदायातील अर्बन नक्षलवाद्यांवर कधी बोलणार?



### नवनाथ बन यांचा शरद पवारांना प्रश्न

◆ **मुंबई, ११ एप्रिल**

वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी झाल्याचे विधान करणाऱ्या शरद पवार यांनी, याच संप्रदायात शिरकाव केलेल्या अर्बन नक्षलवाद्यांवरही आपली भूमिका स्पष्ट करावी. या घुसखोर नक्षलवाद्यांची नेमकी आकडेवारी पवारांनी महाराष्ट्रासमोर मांडावी, असा थेट प्रहार भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी शरद पवार यांच्यासह काँग्रेस नेत्यांच्या दुटप्पी भूमिकेवर कडाडून टीका केली.

ज्ञानोबा-तुकोबांच्या वारकरी संप्रदायाने नेहमीच देव, देश आणि धर्माची पताका उंचावत समाजाचे प्रबोधन केले. या संप्रदायात धर्मांध शक्तींचा शिरकाव झाल्याचे म्हणणे चुकीचे असून, खरे तर औरंगजेब आणि अफजल खानाची वंशावळ हीच खरी धर्मांध शक्ती आहे, असे नवनाथ बन यांनी ठणकावून सांगितले. राज्यात सध्या लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद आणि व्होट जिहादच्या माध्यमातून जे प्रयत्न सुरू आहेत, त्याबद्दल ज्येष्ठ नेते असूनही शरद पवार गप्प का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

यावेळी त्यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यावरही निशाणा साधला. काँग्रेसची मदार केवळ विशिष्ट धर्माच्या मतांवर असल्याने वडेट्टीवार सतत लांगुलचालन करत असल्याची टीका त्यांनी केली. राहुल गांधी हे औरंगजेब फॅन क्लबचे अध्यक्ष असल्यासारखे वागत असून, काँग्रेस नेते औरंगजेब आणि अफजल खानाच्या दाढ्या कुरवाळण्याचे काम करत असल्याचे ते म्हणाले. खरात प्रकरणावर त्यांनी स्पष्ट केले की, भाजपा सरकार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या खंबीर नेतृत्वामुळेच गुन्हेगारांवर कठोर कारवाई शक्य झाली आहे. महिला सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना बन यांनी सांगितले की, भाजपा आणि महायुती सरकारमध्ये महिलांना नेहमीच सन्मानाचे स्थान दिले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारी शक्ती वंदन अभियानाद्वारे महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# समाज परिवर्तनाचे मोठे काम क्रांतीज्योती महात्मा फुलेंनी केले

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्‌गार ● खानवडीत 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे' उद्‌घाटन**

◆ **पुणे, ११ एप्रिल**

आज या कार्यक्रमाला आल्यावर मला येथे 'नासा' आणि 'इस्रो'ला भेट देऊन आलेल्या विद्यार्थिनी भेटल्या. तसेच परदेशी भाषा शिकलेल्या विद्यार्थिनीही भेटल्या. यातून महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याची जाणीव होते. समाजात परिवर्तन घडवण्याचे काम महात्मा फुले यांनी केले, असे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला असून, तो महात्मा फुले यांच्या स्त्री-शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून त्यांना हीच खरी आदरांजली आहे, असेही ते म्हणाले.

महात्मा जोतिबा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त पुरंदर त्यांचे मूळ गाव असणाऱ्या खानवडी येथे पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे' उद्‌घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त पुण्यातील खानवडी येथे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. व्यासपीठावर उपस्थित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्री, आमदार, खासदार आणि अधिकारी

यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे, अल्पसंख्यक मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, महात्मा जोतिबा फुले यांचा २०० व्या जयंती वर्षाचा कार्यक्रम कुठे घ्यावा असा आमचा विचार सुरू असताना महात्मा फुले यांच्या मूळ गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा म्हणजे २०० व्या जयंती वर्षाची सर्वांत योग्य सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यास हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

**अजित पवार यांच्या पुढाकारातून शाळेची उभारणी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून या शाळेची उभारणी झाली असून, त्यांनी शाळा उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष घातले होते. महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य विकासाची एक हजार केंद्रे उभारणार आहोत. पुणे जिल्हा परिषदेकडून 'इंडस्ट्री ४.०' अंतर्गत १०० शाळांमध्ये १०० अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली असून भविष्यात अशी एक हजार केंद्रे उभारण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)



# महात्मा फुलेंच्या जयंतीदिनी पंतप्रधान मोदी-राहुल गांधी एकत्र

**पंतप्रधानांची आपुलकीने विचारपूस अन् चर्चा, सर्व बघतच राहिले**

◆ **नवी दिल्ली, ११ एप्रिल**

महात्मा जोतीबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त शनिवारी संसद परिसरात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी समोरा-समोरा आले. दोघांनी एकमेकांना हात जोडून नमस्कार केला. त्यानंतर पंतप्रधानांनी आपुलकीने विचारपूस करीत एक मिनिटापेक्षा अधिक राहुल यांच्याशी चर्चा केली. हा दुर्मिळ क्षण उपस्थित सर्वच बघत राहिले.

महात्मा फुले यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन्, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी, जे.पी. नड्डा, अर्जुन मेघवाल यांच्यासह अनेक नेते, मान्यवरांनी पुष्पार्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी पंतप्रधान मोदी आणि राहुल गांधी यांच्यात मनमोकळी चर्चा रंगली. मोदी संसद भवन परिसरात आल्यावर त्यांचे उपस्थितांनी स्वागत केले. या स्वागताच्या वेळेस राहुल उपस्थित होते. यावेळी मोदी यांनी सरळ राहुल यांच्याकडे जात आपुलकीने विचारपूस तसेच सुमारे दीड मिनिटे चर्चा केली.

दोन्ही नेते अगदी मनमोकळेपणाने एकमेकांशी चर्चा करत असताना उपस्थित मान्यवर कुतुहलाने पाहत होते. दोघांमध्ये नेमक्या कोणत्या विषयावर चर्चा झाली, याची माहिती अद्याप समोर आली नाही. परंतु, तेथे उपस्थित असलेले अधिकारी, नेते, जनता या दृश्यामुळे सुखावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. ◂(वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



रोखठोक

दिनेश गुणे

# जगणे भेसळयुक्त होत आहे

ही जेमतेम दीड महिन्यापूर्वीची घटना आहे. आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्यातील लालाचेवरू, चौदेश्वरनगर, स्वरूपनगर या भागांत गेल्या फेब्रुवारी महिन्यात अचानक काही लोकांना वेगळाच आजार सुरू झाला. मळमळ, उलट्या, पोटदुखीमुळे अनेक जण बेजार झाले. अनेकांना मूत्रविसर्जनदेखील करता येईनासे झाले. काहींची मूत्रपिंडे निकामी झाली आणि या आजाराने जिल्हा हादरून गेला. गेल्या २२ फेब्रुवारी रोजी अशा काही तक्रारी सुरू झाल्या आणि रुग्णांची संख्या वाढू लागल्याने तपास यंत्रणा सतर्क झाल्या. सखोल चौकशी सुरू झाली आणि आजाराचे मूळ शोधण्यासाठी आरोग्य यंत्रणा कामाला लागल्या. याच परिसरातील एका दूध डेअरीमधून विकले जाणारे दूध आहारात वापरले गेल्याने या तक्रारी सुरू झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष निघाला आणि या दुधाची तपासणी करण्यात आली. पूर्णान्न आणि आरोग्यरक्षक मानल्या जाणाऱ्या दुधामुळे अनेक जण अक्षरशः मृत्युशय्येवर पडले. २० हून अधिक लोकांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. लहान मुले, वृद्ध, महिलांनाही या दुधाची बाधा झाली आणि १६ जण अक्षरशः तडफडून मरण पावले. एथिलिन गायकॉल नावाचा अँटी-फ्रिझ म्हणून वापरला जाणारा व मानवी आरोग्यासाठी अत्यंत अपायकारक असणारा विषारी पदार्थ दुधात मिसळला जात होता आणि या भेसळयुक्त दुधामुळे १६ जीव प्राणास मुकले, काही जण गंभीर आजाराशी कमालीचा संघर्ष करून कसाबसा तरले. १०० हून अधिक कुटुंबांच्या घरी त्या डेअरीमधून हे दूध वितरित केले जात होते. त्याचा आहारात वापर केलेल्या काहींना डायलिसिस द्यावे लागले, काही जणांची प्रकृती एवढी बिघडली की त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले. या घटनेनंतर संपूर्ण देश हादरला. त्याआधी गेल्या वर्षी, जूनमध्ये उत्तर प्रदेशातील आग्रा येथे भेसळयुक्त दूध प्यायल्याने दोन निष्पाप बालकांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आल्यावर प्रशासनाने आग्रा बाह्य रस्त्यावरच दुधाची वाहतूक करणारा एक टँकर जप्त केला आणि तब्बल पाच हजार लिटर भेसळयुक्त दूध रस्त्यावर ओतून दिले. असाच एक प्रकार गेल्या वर्षी मे महिन्यात महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात उघडकीस आला होता. सोलापूर जिल्ह्यातील एका गावातील शीतकरण केंद्रातून गाईचे दूध घेऊन कोल्हापूरकडे निघालेल्या पाच टँकरमध्ये भेसळयुक्त दूध असल्याची खात्रीशीर माहिती अन्न व औषध प्रशासनास मिळाली आणि वाटेतच टँकर अडवून दुधाची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये भेसळ असल्याचे निष्पन्न झाल्यावर पाचही टँकरमधील सुमारे ७५ हजार लिटर दूध ओतून नष्ट करण्यात आले. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील भवरखेडे येथे घातक रसायनांपासून बनविलेल्या दुधाची विक्री होत असल्याची खबर मिळाल्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने कारवाई करून बनावट दूध तयार करणाऱ्या एका तरुणास अटक केली. गेल्या जुलै महिन्यातील या कारवाईत सुमारे ८० लिटर बनावट दूध नष्ट करण्यात आले, पण तोवर असे किती दूध विकले गेले असेल आणि किती जणांनी भेसळयुक्त दूध पूर्णान्न म्हणून आहारात वापरले असेल या भीतीने गाव गोठले असेल यात शंका नाही. जळगाव जिल्ह्यात अनेक ठिकाणी बनावट दूध तयार करण्याचा उद्योग चालत असल्याचे बोलले जाते. अनेक ठिकाणी खाजगी दूध संकलन केंद्रांतील दुधाचे नमुने तपासणीसाठी घेतल्यानंतर कारवायाही करण्यात आल्या होत्या. तरीही भेसळीचे आणि बनावट दुधाचे संकट सरल्याची खात्री नागरिकांना नाही.

तेल, चुना, रसायने, शाम्पू, साबण, बोरिक ॲसिड, युरिया, स्टार्च, हायड्रोजन पॅराक्साईड यासारख्या आरोग्यास अपायकारक असलेल्या पदार्थांचा वापर करून बनावट दूध तयार करण्याचे कारखाने जागोजागी फोफावल्याच्या बातम्या गेल्या अनेक वर्षांपासून सतत कानावर आदळत असतात. आग्रा येथे दोन बालकांचा मृत्यू झाल्यावर पुन्हा एकदा त्या बातम्यांनी डोके वर काढले. यापैकी काही रसायने एवढी घातक असतात की त्यामुळे कर्करोगासारखे आजारही बळावू शकतात, शरीरातील पेशींचे नुकसान होते आणि आनुवंशिकतेच्या गुणात्मकतेलाही बाधा येऊ शकते, असे अनेक संशोधनांतून स्पष्ट झाले आहे. मात्र, अजूनही, दूध हे पूर्णान्न असल्याची सार्वत्रिक समजूत श्रद्धेने जोपासली जाते. भेसळयुक्त पदार्थ तयार करणे, ते बाजारपेठेत आणणे आणि ग्राहकाच्या माथी मारणे ही जीवघेणी अनैतिक व्यापारनीती केवळ दुधासारख्या एकाच पदार्थापुरती मर्यादित राहिलेली नाही. आरोग्यास पोषक मानल्या जाणाऱ्या दुधापासून ते आरोग्यास अपायकारक असलेल्या दारूपर्यंत सर्वत्र भेसळीच्या धंद्याचा उच्छाद सुरू असल्याने, कोणत्याही वस्तूच्या नैसर्गिक शुद्धतेवर डोळे झाकून विश्वास ठेवावा अशी हमी देणे सामान्य समाजास अशक्य होऊ लागले आहे. दोन-चार दिवसांपूर्वी गुजरातमधील अहमदाबादेत चांदखेडा परिसरात एका कुटुंबाने तयार डोश्याचे पीठ विकत आणले. घरच्या घरी बनविलेला डोसा आरोग्यास चांगला असतो या विश्वासाने तो खाल्ल्यावर सर्वांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि अन्न विषबाधेची सारी लक्षणे दिसू लागली. उपचार सुरू झाले, पण कुटुंबातील दोन बालके मात्र हे विष पचवू शकली नाहीत. उपचार सुरू असतानाच त्यांनी प्राण सोडला. यातील एका बालिकेने जेमतेम काही महिन्यांपूर्वी जगात प्रवेश केला होता. उघड्या डोळ्यांनी जग पाहण्याआधीच तिला जगाचा निरोप घ्यावा लागला. तिच्या आईने डोसा खाल्ल्यानंतर स्तनपान दिल्याने तिचा मृत्यू झाला असावा असे सांगितले जाते. अन्नातील भेसळीचे हे अंगावर शहारे आणणारे जीवघेणे उदाहरण आहे.

दोन-चार वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशातील मेरठमध्ये नवरात्रीचा उत्सव साजरा करताना भेसळयुक्त कुट्टू पिठाचे सेवन केल्याने सुमारे दीडशे जणांना विषबाधा झाली, तर हरयाणाच्या सोनीपतमध्ये तीन वर्षांपूर्वी गव्हाचे भेसळयुक्त पीठ खाल्ल्याने एक जण मरण पावला. अलिकडे तांदूळही नकली मिळत असल्याची भीती व्यक्त होत असते आणि अंड्यांच्या शुद्धतेवरही प्रश्नचिन्हे उमटत असतात. नकली मिठाने बाजारात शिरकाव केल्याच्या भीतीने अनेक जण धास्तावले आहेत. स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या लाल तिखट व हळदीमध्ये रासायनिक रंगाची भेसळ, काळेमिरीमध्ये पपईच्या वाळलेल्या बियांची भेसळ, दुग्धजन्य पदार्थांपासून बनविल्या जाणाऱ्या मिठाईमध्ये मैदा वा अन्य रासायनिक पदार्थांची भेसळ, जीव वाचविण्यासाठी आणि आरोग्याच्या समस्यांपासून मुक्ती मिळविण्यासाठी घ्यावयाच्या औषधांमध्येही भेसळ



आणि पिकांचे पोषण व्हावे यासाठी वापरल्या जाणाऱ्या खतामध्येही भेसळ आढळू लागल्याने, जगाचे अवघे जगणे भेसळयुक्त होऊ लागले असून, ज्याचे सेवन जगण्यासाठी करावे त्यापैकी काहीही मरणास कारणीभूत ठरू शकते या भीतीचे वास्तविक रूप आता दिसू लागले आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये गुजरातच्या नडियाद नावाच्या गावात पाच जणांचा संशयास्पद मृत्यू झाला. अचानक झालेल्या या दुर्घटनेचा तपास करताना पोलिसही चक्रावून गेले आणि मृत्यूच्या कारणाचा शोध लागला. मिथाईल अल्कोहोल नावाचा विषारी पदार्थ मिसळलेले भेसळयुक्त आयुर्वेदिक औषध घेतल्याने हे मृत्यू झाल्याचे उघडकीस आले. कोविड महामारीच्या संकटात जेव्हा प्रत्येक जण जीव वाचविण्यासाठी जिवाचे रान करत होता, तेव्हा काही भेसळखोरांच्या टोळ्या मात्र या आजारापासून बचाव करणारे औषध समजले जाणाऱ्या रेमडेसिविर नावाच्या इंजेक्शनच्या रिकाम्या कुप्यांमध्ये पाणी घालून विकण्याचा धंदा करत होते. उत्तर प्रदेशातील लखनौमधील रक्तपेढ्यांमध्ये उघडकीस आलेला प्रकार तर भयावह आहे. येथील काही रक्तपेढ्यांमधील रक्त मानवी शरीरासाठी घातक असल्याचे अन्नसुरक्षा प्रशासनाने एका अहवालाद्वारे उघड केले आणि लखनौवासीयांची झोप उडाली. एक मोठी टोळी संघटितपणे उत्तर प्रदेशातील अनेक गावांत भेसळयुक्त रक्ताचा धंदा करत असल्याचा पोलिसांचा अंदाज होता. त्यानंतर लखनौमध्ये काही रक्तपेढ्यांवर धाडी घालण्यात आल्या आणि तेथील रक्त भेसळयुक्त असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाचे धागेदोरे राजस्थानापर्यंत पोहोचल्याचेही तपासात निष्पन्न झाले होते. काही रक्तपेढ्यांना सलाईनचे पाणी मिसळलेल्या भेसळयुक्त रक्ताच्या पिशव्या स्वस्त किमतीस विकल्या जात होत्या, असेही स्पष्ट झाले. असे भेसळयुक्त रक्त रुग्णाच्या शरीरात गेल्यास संसर्ग पसरून काही तासांतच रुग्ण दगावतो, असे या क्षेत्रातील जाणकारांनी तेव्हा स्पष्ट केले होते. सोडियम क्लोराईड मिसळलेले सलाईनचे पाणी मिसळून रक्त दुप्पट करण्याचा हा मानवी जिवाशी खेळण्याचा अघोरी आणि अमानवी प्रकार म्हणजे, भेसळीच्या विकृत धंद्याचे थेट उदाहरण आहे.

अन्नपदार्थांतील भेसळ हा अनेक दशकांपासून होत असलेला अनैतिक आणि अमानवी व्यवहार आहे. जगभर अनेक देशांत अन्न भेसळीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. रेस्टॉरेंटमधील फ्रायर्स, ग्रीस ट्रॅप्स आणि कत्तलखान्यातील कचऱ्यातून काढलेले किंवा टाकून दिलेल्या प्राण्यांच्या अवयवांपासून काढलेल्या अवैध खाद्यतेलाचा घोटाळा चीनमध्ये गाजला होता. तैवान, हाँगकाँग आणि सिंगापूरमध्येही अशी दूषित अन्न उत्पादने आढळली. २०१३ मध्ये, इराणमध्ये मिथेनॉलमुळे ६९४ जणांना विषबाधा झाली आणि आठ जणांचा मृत्यू झाला. २०१८ मध्ये, मलेशियामध्ये मिथेनॉल विषबाधेमुळे अनेकांचे अवयव कायमचे निकामी झाले, तर ६४ जणांचा मृत्यू झाला. डिसेंबर २०२१ ते मे २०२२ दरम्यान झालेल्या व्यापक मोहिमेचा भाग म्हणून, २६ देशांच्या अधिकाऱ्यांनी जवळपास २७,००० टन बनावट अन्न आणि १.५ कोटी लिटर मद्यपेये जप्त केली होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये, पाकिस्तानच्या अन्न सुरक्षा आणि हलाल अन्न प्राधिकरणाने साखर, रसायने आणि मेण यांची भेसळ असलेला ४००० लिटर बनावट मध जप्त केला. डिसेंबर २०२२ मध्ये, भारतातील बिहारमध्ये भेसळयुक्त दारू प्यायल्याने १२ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि १५ हून अधिक लोकांची दृष्टी गेली. जुलै २०२२ मध्ये, भारतातील अधिकाऱ्यांनी ३० टन भेसळयुक्त पदार्थ मिसळलेले जिरे जप्त केले.

आधुनिक काळात अन्न भेसळ संशोधनात लक्षणीय तांत्रिक प्रगती होत आहे. पूर्वी, भेसळयुक्त अन्न उत्पादने काही भौतिक मापदंडांच्या आधारावर ओळखली जात होती. आता जागतिक बाजारपेठांच्या विस्तारामुळे आणि व्यावसायिक स्पर्धेमुळे, अन्न भेसळीचे प्रमाण वेगाने वाढले आहे. निकृष्ट दर्जाचे घटक वापरून कच्च्या मालाचा आणि उत्पादनाचा खर्च कमी करणे, हा अन्न भेसळीमागील मुख्य उद्देश असतो हे स्पष्ट आहे. खाद्यपदार्थांचे भौतिक गुणधर्म आणि चव अनेक प्रकारे बदलली जातात. फळे कृत्रिमरीत्या पिकवणे हा अन्न भेसळीचा एक सामान्य प्रकार आहे. संरक्षक, रंग आणि कृत्रिम गोडवा वापरून केलेली भेसळ ही देखील अन्न भेसळीची सामान्य तंत्रे आहेत. उत्पादनाविषयी खोटी माहिती देणे यालाही भेसळ मानले जाते. कोणत्याही खाद्यपदार्थांची निवड करताना ग्राहक सर्वसाधारणपणे त्यांचा रंग, पोत आणि स्वरूप हे महत्त्वाचे निकष मानतो. आकर्षक रंग असलेल्या खाद्यपदार्थांमुळे त्यांची बाजारपेठेतील मागणी आणि नफा वाढतो. फळे आणि भाज्या ग्राहकाच्या माथी मारण्याच्या धंद्यात, नैसर्गिक रंगाहून अधिक आकर्षक असलेल्या कृत्रिम रंगांचा वापर होतो. ग्राहकांची पसंती वाढवण्यासाठी टरबुजांमध्ये लाल रंग टाकला जातो. हिरवी मिरची, हिरवे वाटाणे, कारले, भेंडी यांसारख्या हिरव्या भाज्यांना अधिक हिरव्या, ताज्या, चमकदार आणि तेजस्वी दिसण्यासाठी मॅलाकाईट ग्रीनचा वापर केला जातो, तर वांगी, टोमॅटो, फुलकोबी आणि पानकोबीमध्ये रंगासाठी मोबाईल ऑईल आणि ताजा जांभळा रंग येण्यासाठी कार्बोफ्युरानची इंजेक्शने दिली जातात. अंडी कृत्रिमरीत्या रंगवली जातात, तर अंड्याच्या पिवळ्या बलकाचा रंग अधिक आकर्षक करण्यासाठी कोंबड्यांनाच रंग मिसळलेले खाद्य दिले जाते, असे अनेक प्रकार काही आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणांतून उघडकीस आले आहेत.

मानवी जीवनाशी खेळ खेळणारा हा धंदा सर्वांच्याच दृष्टीने चिंताजनक ठरला आहे. महाराष्ट्रात आणि देशातही, अन्नपदार्थ व खाद्यपदार्थांतील भेसळीचे प्रकार रोखण्यासाठी कठोर कायद्यांची तरतूद आहे. गेल्या आठवड्यात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानेही भेसळीच्या आव्हानाची गंभीर दखल घेतली. या धोक्यास सामोरे जाण्यासाठी करावयाच्या उपायांचा विचार करण्यासाठी गेल्या ७ एप्रिल रोजी नवी दिल्लीत आयोगाने आयोजित केलेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत अन्न भेसळीचा गंभीर धोका अधोरेखित करण्यात आला. केवळ कायदे किंवा कारवाया करून ही दुष्प्रवृत्ती नष्ट होणार नाही, तर जनजागृती आणि खाद्यसुरक्षेविषयीची सावधानता यातूनच भेसळखोरीला आळा घालण्यास मदत होईल, असे मत आयोगाचे सदस्य न्या. डॉ. बिद्युतरंजन सारंगी यांनी व्यक्त केले, तर भेसळीचे प्रकार थांबविण्यासाठी बहुस्तरीय कार्यगट स्थापन करावा अशी सूचना आयोगाच्या सदस्य विजया भारती यांनी केली. भेसळीचे गंभीर परिणाम विशेषत: गर्भवती महिला बालके आणि वयोवृद्धांच्या आरोग्यावर होत असल्याची बाब आयोगाचे महासचिव भरत लाल यांनी अधोरेखित केली आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांची ओळख पटविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त उपकरण विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिथे मानवी बुद्धी कुंठित होते, तेथे कृत्रिम बुद्धिमत्ता कामास येते, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. भेसळयुक्त जगण्यापासून जगाची मुक्तता करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झाला, तर ते एक मोठे वरदान ठरेल.

dineshgune@gmail.com

---

रविवारची पत्रे

## ''संगीत सरिता''मध्ये घुमला नागपूरकर तिजारेंचा तबला

''विदर्भ विषय: सारस्वतीजन्मभू'' असा गौरवपूर्ण उल्लेख वत्सगुल्म (वाशीम) येथील वाकाटकांचे राजकवी राजशेखर यांनी करून ठेवला आहे. तो सार्थ ठरविणारी अनेक उदाहरणं आपल्याकडे आहेत. विदर्भ हा प्राचीन काळापासूनच साहित्य, संगीत आदी कलांमध्ये अग्रेसर असलेला प्रदेश राहिलेला आहे आणि ती परंपरा आजही कायम आहे. संगीत क्षेत्रात विदर्भाचा सन्मान देशभरात वाढविणारा असाच एक कलावंत म्हणजे नागपूरचे तबलापटू अच्युत शोभा मुकुंद तिजारे. या पठ्ठ्यानं लागोपाठ दोन वर्षी विदर्भाच्या शिरपेचात दोन मानाचे तुरे खोवण्याचा पराक्रम केला आहे.

आकाशवाणीची राष्ट्रीय वाहिनी ''विविध भारती''वर नुकतीच (१ ते १० मार्च २०२६) त्यांनी लोकप्रिय ''संगीत सरिता'' कार्यक्रमात ''तबला और उसकी विरासत'' ही मालिका सादर करून देशभर वाहवा मिळविली. संगीत सरितामध्ये आमंत्रित कलाकार म्हणून नागपूर-विदर्भातील कलावंताला अशी संधी प्रथमच मिळाली आहे. त्याबद्दल अच्युत तिजारे यांचं करावं तेवढं अभिनंदन थोडं आहे.



त्याच्या आधी, गतवर्षीच्या अखेरीस तर त्यांनी एक राष्ट्रीय पुरस्कारच पटकावला. ज्येष्ठ संगीतज्ञांना प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन झालेल्या ''खयाल ५० अबाऊट ५०'' या संस्थेनं तिजारेंना हा सन्मान मिळवून दिला. नॅशनल टॅलेंट हंट या देशव्यापी स्पर्धेतील वादन गटात ''इन्स्ट्रुमेंटल मेस्ट्रो ऑफ द इयर २०२५'' हा अत्यंत सन्मानाचा पहिला पुरस्कार तिजारेंना मिळाला. या स्पर्धेत प्रेक्षक-श्रोत्यांच्या गुणांकनालाही विशेष महत्त्व होते. त्यात तिजारेंनी देशभरात बाजी मारून पुरस्कार जिंकला, हे विशेष. त्यांचं तबलावादन किती भावणारं असेल, याची यावरून कल्पना येते. ते आकाशवाणीचे अ श्रेणी कलावंत असून, अनेक नामवंत गायक-वादकांना त्यांनी समर्थ साथही केली आहे.

नागपूरचे प्रसिद्ध गुलाबप्रेमी मुकुंद तिजारे यांचे सुपुत्र असलेले अच्युत सध्या मुंबईत बँक अधिकारी आहेत. बालपणापासूनच तबल्याची आवड असल्यानं रीतसर प्रशिक्षण घेऊन गेली ३० वर्षे या क्षेत्रातील एकेक शिखर ते पादाक्रांत करीत आहेत. सुदैवानं त्यांना चांगले गुरूही लाभले. पं. सुभाष राजहंस, पं. केशवराव राजहंस, पं. उल्हास राजहंस, पं. अभिजित मजूमदार, उस्ताद अहमदजान थिरकवांचे शिष्य पं. भाई गायतोंडे, पं. विभव नागेशकर अशी त्यांची गुरुपरंपरा आहे. परिणामी दिल्ली, अजराडा, लखनौ आणि फरूखाबाद या चारही तबला घराण्यांची तालीम त्यांना मिळाली आणि त्यांच्या तबलावादनाला एक परिपूर्णता आली. त्यामुळेच खयाल ५० असो की संगीत सरिता असो, त्यांनी रसिकांची मनं सहज जिंकून घेतली.

साहजिकच नागपूर-विदर्भाला या गुणवान तबलापटूचा सार्थ अभिमान वाटतो. भविष्यातही त्यांच्या तबल्याची जादू अधिकाधिक रसिकांना आनंद देत राहो, अशा शुभेच्छा आपण त्यांना देऊया.

**विनोद देशमुख**/९८५०५८७६२२

## झटपट कर्ज... नको रे बाप्पा

मोबाईलने डिजिटल क्रांती केली खरी पण तेवढीच डोकेदुखी पण वाढवली. खिशात मावणाऱ्या या मोबाईलमध्ये आम्ही ढिगभर डाटा ठेवायला लागलो. कोणत्याही कार्यक्रमाचे क्षण त्यात फोटो बनून राहू लागले. हे करता करता आम्ही आमच्या गरजेची महत्त्वाची कागदपत्रे जसे आधार कार्ड, बँक पासबुक, पॅन कार्ड पण मोबाईलमध्ये फोटो स्वरूपात ठेवायला लागलो. काही लोक डिजी लॉकमध्ये ठेवतात ते बरे पण असे कितीसे लोक असतील? आणि रोज एक दोन मेसेज यायला लागले ''अभिनंदन एक लाख रुपयाचे पर्सनल लोन खास तुमच्यासाठी तयार आहे, बस क्लिक करा अथवा संपर्क करा'' असे मेसेज यायला लागले. आणि ज्यांना खरचं गरज आहे ते अशा मेसेजमध्ये फसायला पण लागले. मग तुमची कागदपत्रे अनेक कंपन्यांकडे आपोआप जातात आणि ते तुमच्या नावाचा वापर करून कर्ज घेतल्याचे दर्शवतात. सतत तुम्हाला त्यासाठी फोन करतात. तुम्ही कर्ज घेतलेले नसते तरी तुमच्यावर मानसिक दबाव आणतात. पण या सर्व बोगस बँका, कंपन्या असतात हे लक्षात ठेवा. मोबाईल चोरून तुमचा डाटा क्षणात अशा फसवेगिरी करणाऱ्या लोकांपर्यंत पोहचतो आणि ते तुमच्या नावाचा वापर तर करतात सोबतच तुमची खुफीया माहिती पण काढतात. तुम्ही कुठे जाता, कुठे राहता, शेजारी कोण कोण राहतात हे सर्व त्यांना माहीत असतं. हे रॅकेट फार दूरवर पसरलं असतं. महाराष्ट्रात आज हजारो लोक या समस्येने घेरले आहेत. खरे म्हणजे अशा बोगस बँका, कंपन्या ताबडतोब बंद व्हायला हव्या. ज्या लोकांच्या आधार कार्ड, पॅन कार्डचा वापर चोरट्यांनी केला आहे त्यांचा तो नंबर गाळून त्यांना नवीन आधार नंबर व पॅन कार्ड द्यायला हवा. अशानेच जुन्या कागदपत्रांच्या आधारावर वरचेवर चोरटे कर्ज केस बनवू शकणार नाहीत. डिजिटल क्रांतीचा ज्यांना त्रास झाला आहे ते जुनीच व्यवस्था अवलंबीत आहे आणि हे दिवसेंदिवस वाढणार आहे. संबंधितांच्या कागदपत्रांची शहनिशा न करता या बँका, सोसायट्या सर्रास कर्जवाटप करत आहेत. सरकारने याकडे लक्ष देण्याची गरज आहे आणि जनतेने सुद्धा जागरूक राहण्याची गरज आहे. झटपट कर्जाच्या नादापेक्षा जे आहे त्यातच समाधान मानावे असे दिवस आले आहे.



**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

## बालपण देगा देवा...

''बालपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा'' हे आपल्या संतांनी देवाकडे बालपणाचे मागणे मागितले होते. म्हणजे संतांनाही बालपणाचा मोह सुटला नव्हता तर आपण तर एक सर्वसामान्य माणूस आहोत आपल्यालाही बालपणाचा मोह कसा होणार नाही? मानवी जीवनाच्या प्रवासात अनेक टप्पे येतात, पण त्यातला सर्वांत सुंदर, निरागस आणि अविस्मरणीय टप्पा म्हणजे बालपण.

बालपणाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील त्या वयात मनावर कोणत्याही संस्कारांचे, समाजाच्या बंधनांचे किंवा भेदाभेदांचे ओझे नसते. मूल कोणाशीही तितक्याच आपुलकीने बोलते आणि खेळते. त्या डोळ्यांत ना कोणाबद्दल द्वेष असतो, ना मत्सर. कट्टी झाल्यावर पुन्हा बट्टी करण्यासाठी लागणारा तो पाच मिनिटांचा वेळ म्हणजे जगातील सर्वांत मोठे मित्रत्वाचे उदाहरण आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात माणसाला पावलोपावली ताण जाणवतो. पण बालपणीच्या जगात टेन्शन नावाचा शब्दच अस्तित्वात नसतो. उद्या काय होईल? करीअरचं काय? आर्थिक ओढाताण कशी सोसायची? या प्रश्नांऐवजी आज कोणता खेळ खेळायचा, पावसात कागदाची होडी कधी सोडायची हेच सर्वांत मोठे प्रश्न असायचे. मोठेपणी आपण सुखासाठी महागड्या वस्तू आणि सुविधेवर अवलंबून असतो. मात्र बालपणी सुख अगदी स्वस्त आणि सहज उपलब्ध असते. शाळेला मिळालेली सुट्टी. आजीने सांगितलेली परीची गोष्ट. कडक उन्हात खाल्लेला बर्फाचा गोळा. पावसात भिजून मातीत केलेले किल्ले. या छोट्या छोट्या गोष्टींमधून जो परमानंद मिळतो, तो आज करोडो रुपये खर्च करूनही विकत घेता येत नाही. बालपणी आपण निसर्गाच्या खूप जवळ असतो. झाडावर चढणं, फुलपाखरांच्या मागे धावणं, पावसात नाचणं हे सगळं जगणं समृद्ध करत असतं. त्याचबरोबर आजी-आजोबांच्या मांडीवर डोकं ठेवून ऐकलेल्या गोष्टी आयुष्याला लागणारी जीवन भराची शिदोरी देऊन जातात. त्याकाळी मोबाईल नव्हता, पण माणसांची सोबत आणि निखळ प्रेम भरपूर होतं. जसे जसे वय वाढते, तशी जबाबदारीची जाणीव होते आणि माणसातील निरागसपणा कमी होऊ लागतो. आपण व्यवहारी होतो, स्वार्थी होतो आणि स्पर्धेत धावू लागतो. पण जर आपल्याला खऱ्या अर्थाने सुखी व्हायचे असेल, तर आपल्यातील बालपण नेहमी जिवंत ठेवणे गरजेचे आहे. कधीतरी पावसात भिजणे, कधी लहान मुलांसोबत मूल होऊन खेळणे किंवा कधीतरी कामाचा ताण बाजूला सारून स्वतःसाठी वेळ देणे, हेच आपल्याला पुन्हा त्या आनंदाची अनुभूती देऊ शकते.

बालपण हे केवळ वयाचा एक टप्पा नाही, तर तो एक दृष्टिकोन आहे. बालपण परत येत नाही हे जरी सत्य असले, तरी त्या आठवणींच्या पाऊलखुणा जपून ठेवणं आपल्या हातात आहे. म्हणूनच म्हणावसं वाटतं की, ईश्वराने माणसाला दिलेली सर्वांत मौल्यवान भेट म्हणजे त्याचे बालपण होय.

**मोहन कळमकर**/७३८५८६१४४६

## आवडती राणी आणि पिठाचे मणी

मराठीत एक म्हण आहे ''आवडती व्यक्ती असेल तर तिच्या सर्व गोष्टी मान्य असतात, पण नावडती असेल तर तिची चांगली गोष्टही खुपते.'' ही म्हण सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पक्ष प्रमुख शरद पवार यांच्या भूमिकेला तंतोतंत लागू पडताना दिसत आहे.

लवकरच होणाऱ्या बारामती पोटनिवडणुकीसंदर्भात पार्थ पवार यांनी काँग्रेस पक्षासंबंधी एक विधान केले होते. या विधानावर शरद पवारांनी ज्या पद्धतीने आपला जाहीर संताप व्यक्त केला, त्यातून त्यांची पार्थ पवारांबद्दलची टोकाची नाराजी पुन्हा एकदा समोर आली. यापूर्वीही पार्थ पवारांच्या विधानांवरून ''त्याला अजून समज नाही'' किंवा ''त्याच्या विधानाला आम्ही कवडीचीही किंमत देत नाही'' असे म्हणून शरद पवारांनी त्यांना जाहीरपणे फटकारले होते. मात्र, दुसरीकडे त्यांचे दुसरे नातू आमदार रोहित पवार हे सातत्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत संशयाचे काहूर माजवत आहेत. स्वतः शरद पवारांनी पहिल्याच दिवशी सर्व विरोधी नेत्यांना या अपघाताबाबत कोणतीही शंका उपस्थित न करण्याचा सल्ला दिला होता. असे असतानाही रोहित पवार सातत्याने महायुतीतील नेत्यांवर आणि मित्रपक्षाच्या मंत्र्यांवर संशयास्पद विधाने करत आहेत. विशेष म्हणजे, स्वतःचा शब्द डावलला जात असूनही शरद पवार रोहित पवारांना साधा सबुरीचा सल्लाही देत नाहीत किंवा पूर्ण चौकशी होईपर्यंत शंका उपस्थित करू नको असे बजावत नाहीत. पार्थ पवारांना समज नाही म्हणणारे पवार, रोहित पवारांच्या संशयास्पद विधानांवर मात्र मौन बाळगून आहेत. राजकारणातील या उघड दुजाभावाकडे पाहिल्यावर ''आवडती राणी आणि पिठाचे मणी'' ही म्हण या परिस्थितीला अगदी चपखल बसते.

**अविनाश देशपांडे**/पुणे

## भारतातील 'तरुण' लोकसंख्येचे 'रुपेरी' आव्हान...

भारत आज जगातील सर्वांत मोठ्या तरुण लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. हीच तरुण लोकसंख्या देशाची सर्वांत मोठी ताकद मानली जाते. मात्र, या ताकदीसोबत एक दीर्घकालीन वास्तव जोडलेले आहे- आजचा हा तरुण वर्ग पुढील दोन दशकांत मोठ्या प्रमाणावर ज्येष्ठ नागरिकांमध्ये रूपांतरित होणार आहे. त्यामुळे भारताच्या आरोग्य व्यवस्थेसमोर उभे राहणारे आव्हान हे केवळ व्यवस्थापनाचे नसून, ते सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक स्वरूपाचे आहे.

एकूण पाहता, आजमितीस भारतात १६ कोटी ज्येष्ठ नागरिक आहेत आणि हीच संख्या २०३५ पर्यंत २४ कोटींवर पोहोचणार आहेत. ही वाढ केवळ लोकसंख्येतील बदल नसून, आरोग्य व्यवस्थेच्या क्षमतेची खरी परीक्षा आहे. जर सध्याच्या पायाभूत सुविधा, डॉक्टरांची उपलब्धता, विमा व्यवस्था आणि जनजागृती यामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली नाही, तर २०३५ पर्यंत भारताला 'हेल्थकेअर स्ट्रेस'चा गंभीर सामना करावा लागू शकतो.

पण याच परिस्थितीत एक संधीही दडलेली आहे. योग्य नियोजन केल्यास भारत 'सिल्व्हर इकॉनॉमी'मध्ये जागतिक नेतृत्व करू शकतो. २०३५ पर्यंत हे भारतासाठी केवळ लोकसंख्येतील बदलाचे वर्ष नसून, आरोग्य व्यवस्थेच्या भवितव्याचा निर्णायक टप्पा ठरणार आहे. याचा अर्थ असा की, आजच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक लोकांना दीर्घकालीन डॉक्टर्स, रुग्णालये, आरोग्यसेवा, औषधे आणि विमा इ. संसाधनांची गरज भासणार आहे. आधीच डॉक्टरांची कमतरता, हॉस्पिटल बेड्सची अपुरी संख्या आणि ग्रामीण-शहरी दरी या समस्या अस्तित्वात असताना, या वाढत्या मागणीचा सामना करणे ही मोठी कसोटी ठरणार आहे. तथापि, भारताचे चित्र केवळ आव्हानांचे नाही. उलटपक्षी, या बदलत्या लोकसंख्येच्या पृष्ठभूमीवर भारताकडे काही अद्वितीय ताकदीही आहेत. भारत हा जगातील सर्वांत मोठे जेनेरिक औषध उत्पादक देशांपैकी एक आहे, ज्यामुळे औषधांची किंमत तुलनेने कमी राहते. तसेच, इतर विकसित देशांच्या तुलनेत भारतात सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा स्वस्त आहेत. यामुळे 'मेडिकल टुरिझम'साठी भारत एक महत्त्वाचे केंद्र बनत आहे. कुशल डॉक्टर, वाढते खाजगी रुग्णालयांचे जाळे आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर या सर्व गोष्टी भारताला जागतिक आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची भूमिका देऊ शकतात.

मात्र, या ताकदीचा योग्य उपयोग करण्यासाठी नियोजनबद्ध पावले उचलणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, सरकारने आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढवणे गरजेचे आहे. सध्या भारताचा सार्वजनिक आरोग्य खर्च जीडीपीच्या सुमारे २ टक्क्यांच्या आसपास आहे, जो विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. ही गुंतवणूक वाढवून प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, डॉक्टर, नर्सेस आणि इतर सहायक वैयक्तिक सेवा तयार करण्यासाठी वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार आणि गुणवत्ता सुधारणा हीदेखील महत्त्वाची बाब आहे. आरोग्य विम्याच्या क्षेत्रात, सर्व ज्येष्ठ नागरिकांना विमा कवच देण्याची गरज आहे. आजही मोठा वर्ग विम्याच्या कक्षेबाहेर आहे आणि वृद्धावस्थेत विमा मिळवणे अधिक कठीण होते आहे. त्यामुळे तरुण वयातच विमा सुलभ आणि परवडणारा बनवणे, तसेच सार्वजनिक आणि खाजगी विमा योजनांमध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे.

परंतु या सर्व उपाययोजनांसोबत एक अत्यंत महत्त्वाचा घटक दुर्लक्षित करता येत नाही, तो म्हणजे जनजागृती. भारतात अजूनही आरोग्य विमा, प्रिव्हेंटिव्ह हेल्थकेअर आणि नियमित तपासणी याबाबत पुरेशी जागरूकता नाही. विशेषतः असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांमध्ये आरोग्य सुरक्षेबाबतची जाणीव कमी आहे. या पृष्ठभूमीवर सरकार, स्वयंसेवी संस्था आणि खाजगी क्षेत्र यांनी एकत्रितपणे व्यापक जनजागृती मोहीम राबवणे आवश्यक आहे. जसे बँकिंग क्षेत्रात 'जनधन योजना'मुळे आर्थिक समावेशन वाढले, तसेच आरोग्य क्षेत्रातही 'हेल्थ इन्क्लुशन' घडवून आणणे गरजेचे आहे.

असंघटित क्षेत्रातील कामगार- जसे की शेतमजूर, बांधकाम कामगार, छोटे व्यावसायिक हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग आहेत. त्यांच्यासाठी कमी प्रीमियमच्या 'मायक्रो-इन्शुरन्स' योजना, सहकारी संस्थांद्वारे सामूहिक विमा आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या मदतीने सहज नोंदणी या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. उदाहरणार्थ, दररोज अगदी अल्प रक्कम (जसे १०-- २० रुपये) बचत करून मोठ्या प्रमाणावर आरोग्य विमा कव्हरेज निर्माण करता येऊ शकते, जर योग्य रचना आणि विश्वासार्ह अंमलबजावणी असेल तरच. याला हेल्थ क्रेडिट स्किम असे म्हणतात. या संदर्भात नारायण हृदयालयाचे संस्थापक यांचे कार्य आणि त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रेरणादायी ठरतात. या रुग्णालय साखळीने ''कमी खर्चात उत्तम दर्जाची आरोग्य सेवा'' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांनी ५ ते १० लाख रुपयाचा आरोग्य विमा अत्यंत कमी पैशात उपलब्ध करून दिलेला आहे जेणे करून कुटुंबाची आरोग्य जोखीम घेण्याची क्षमता वाढेल. तसेच त्यांच्या रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया ७५ हजार रुपयांत होतात. भारतात आरोग्य सेवा महाग असण्याचे कारण तंत्रज्ञान नाही, तर व्यवस्थापन आणि स्केलचा अभाव आहे. 'इकॉनॉमीज ऑफ स्केल' चा वापर करून हृदय शस्त्रक्रिया अत्यंत परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात. आणखी एक महत्त्वाची कल्पना म्हणजे 'मास हेल्थ इन्शुरन्स.' जर मोठ्या लोकसंख्येने अल्प प्रीमियम भरून विमा घेतला, तर संपूर्ण देशासाठी अत्याधुनिक आरोग्यसेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध होऊ शकतात.

मोठ्या हॉस्पिटल चेनसमोरही काही स्पष्ट जबाबदाऱ्या उभ्या राहतात. केवळ महानगरांमध्ये अत्याधुनिक सुविधा उभारण्यापेक्षा, टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये विस्तार करणे ही काळाची गरज आहे. 'व्हॅल्यू-बेसड हेल्थकेअर' या संकल्पनेनुसार, कमी खर्चात दर्जेदार सेवा देणे हे ध्येय असले पाहिजे. याशिवाय, वृद्धांसाठी विशेष 'जेरिएट्रिक्स केअर', घरपोच आरोग्यसेवा आणि दीर्घकालीन उपचारांसाठी स्वतंत्र सुविधा उभारणे आवश्यक ठरणार आहे. या सर्व आव्हानांमध्येच भारतासाठी एक मोठी आर्थिक संधीही दडलेली आहे. वाढती ज्येष्ठांची संख्या, वाढणारी आरोग्य जाणीव आणि विम्याचा विस्तार यामुळे आरोग्य क्षेत्र हे पुढील दशकात सर्वांत वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक ठरणार आहे. हॉस्पिटल्स, डायग्नोस्टिक सेंटर्स, औषधनिर्मिती, वैद्यकीय उपकरणे, होम हेल्थकेअर आणि वृद्ध सेवा या सर्व क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण होणार आहेत.

आजच्या तरुणांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग, फार्मसी, हेल्थ टेक, बायोटेक्नॉलॉजी आणि हेल्थ मॅनेजमेंट या क्षेत्रांमध्ये करीअरच्या असंख्य वाटा खुल्या होत आहेत. तसेच, स्टार्टअप्सच्या माध्यमातून डिजिटल हेल्थ, रिमोट डायग्नोस्टिक आणि एलडरली केअर यासारख्या नव्या क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्ण उपाय विकसित करण्याची मोठी संधी आहे. लवकरच रुग्णांना आयसीयूमध्ये न ठेवता, घरच्या घरी, रिमोट कंट्रोल मेडिकल सर्व्हिलन्स मॉनिटरिंग ही सुविधा, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपचार देण्यास सक्षम होणार आहे. भारताच्या किफायतशीर आरोग्य सेवांचा जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी तरुण उद्योजक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शेवटी, भारताचे वैद्यकीय भविष्य अशा वळणावर उभे आहे की ही आव्हाने संधी म्हणून स्वीकारली तर भारत जागतिक आरोग्य क्षेत्रात अग्रणी स्थान मिळवू शकतो. आजच योग्य निर्णय घेतले तर उद्याचा भारतीय ज्येष्ठ नागरिक सुरक्षिततेत, सन्मानाने आणि निरोगी आयुष्य जगेल. या निर्णयांमध्ये सरकार, उद्योगक्षेत्र आणि समाज जितके महत्त्वाचे आहेत, तितकाच महत्त्वाचा आहे जागरूक, जबाबदार आणि दूरदृष्टी असलेला आजचा तरुण वर्ग.

**इंजि. दीपक दोडके**/समाज बदलाचे अभ्यासक

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### महात्मा फुले द्विशताब्दी महोत्सव समितीच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

येथील म. फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार समितीचे अध्यक्ष भाई यशवंत फडतरे हस्ते अर्पण करून अभिवादन केले. यावेळी समितीचे जनलर सेक्रेटरी विश्वास नागटिळक उपाध्यक्ष किर्तीपाल शिवशरण, प्रा. यशोधरा धोत्रे, दिपक कांबळे, रोहीणी गायकवाड, मुकेश भालेकर, राजेंद्र चव्हाण उपस्थित होते. या समीतीच्या वतिने सामाजिक विषम तेच्या विरोधात व दलित शोषित भटके विमुक्त आदिवासी श्रमिक शालेबाहय मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे समितीचे अध्यक्ष भाई यशवंत फडतरे यांनी सांगितले. सूत्रसंचालन विश्वास नागटिळक यांनी केले

# कोळेगावच्या प्रयोगातून तरुण पिढीने प्रेरणा घ्यावी

## आ. उत्तमराव जानकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ११ एप्रिल-**

आई-वडिलांचे छत्र नसताना मामाने केलेल्या कष्टाची आणि संघर्षाची जाणीव ठेवून जेव्हा मुले यशाचे शिखर गाठतात, तेव्हा तो क्षण केवळ कुटुंबाचा नसून संपूर्ण गावाला अभिमान वाटण्याजोगा असतो. कोळेगाव हे एक शांत आणि प्रयोगशील गाव आहे. इथल्या तरुणांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर केवळ गावाचेच नव्हे, तर संपूर्ण तालुक्याचा नावलौकिक वाढवावा, असे प्रतिपादन माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर यांनी केले.

कोळेगाव (ता. माळशिरस) येथे गावातील यशस्वी तरुणांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये



महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेले विश्वास चळेकर, केंद्रप्रमुख परीक्षेत यश संजय बेंदगुडे आणि प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारीपदी निवड झालेले योगेश सावंत यांचा आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. रवींद्र बेंदगुडे, बाजार समितीचे संचालक नितीन सावंत, डॉ. हनुमंत मोरे, ॲड. धनंजय दुपडे, अरुण सावंत, बाबासाहेब धोत्रे, अधिकराव सावंत, कैलास दुपडे, संभाजी दुपडे, नागेश दुपडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहाजी पारसे यांनी केले.

### संघर्षातूनच यशाची वाट

आमदार जानकर यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, २५ वर्षांपूर्वी मी कोणत्याही राजकीय पदावर नव्हतो. मात्र, लोकांच्या कल्याणाची जिद्द माझ्या मनात होती. त्याकाळी कोळेगावची शेती पाण्याअभावी करपून जात होती. तेव्हा आम्ही कालव्यासाठी संघर्ष केला आणि लोकांना हक्काचे पाणी मिळवून दिले. त्या लढाईनेच मला संघर्षाची खरी ताकद दिली.याप्रसंगी त्यांनी तरुणांना केवळ शेतीवर अवलंबून न राहता रोजगाराचे विविध पर्याय शोधण्याचे आवाहन केले. कष्टाची जोड आणि सातत्य असेल, तर यश नक्कीच मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# तेरमध्ये आजपासून संत गोरोबांच्या पुण्यतिथीनिमित्त वैष्णवांचा मेळा

**तभा वृत्तसेवा,**
**तेर, दि. ११ एप्रिल-**



संत परीक्षक श्री गोरोबा काकांच्या पुण्यतिथी सोहळा व यात्रा महोत्सवानिमित्त १२ ते १६ एप्रिल दरम्यान तेरणा नदीच्या काठावर वैष्णवांचा भव्य मेळा भरणार आहे.

तेर हे गाव गोरोबा काकांच्या समाधीस्थळामुळे 'प्रति पंढरपूर' म्हणून प्रसिद्ध असून येथे संत परीक्षक गोरोबा काकांचा ७०९वा पुण्यतिथी सोहळा पार पडणार आहे. या महोत्सवानिमित्त राज्यातून शंभराहून अधिक पायी वारकरी दिंड्या तसेच हजारो भाविक तेर येथे दाखल होऊन गोरोबा काकांच्या समाधीचे दर्शन घेतात. या पार्श्वभूमीवर नायब तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी मंदिर ट्रस्टच्या प्रशासक रूपाली कोरे, पोलीस निरीक्षक अतुल नळणीकर, तेरच्या सरपंच दीदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड आदी उपस्थित होते. बैठकीत भाविकांच्या सोयीसुविधा, सुरक्षा व्यवस्था व इतर आवश्यक बाबींवर चर्चा करण्यात आली. गोरोबा काकांच्या समाधी सोहळा व पुण्यतिथी उत्सवासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून राज्यभरातून येणाऱ्या भाविकांना सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंदिर प्रशासक कोरे यांनी दिली.



### श्री शिवाजी महाविद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**बार्शी, दि.११ एप्रिल-**

महाराष्ट्राला पुरोगामी परंपरेचा वारसा लाभला आहे. फुले-शाहू-आंबेडकर या विचारधारेतून महाराष्ट्राची जडणघडण होत आलेली आहे. आद्य समाजसुधारक महात्मा फुले यांनी त्यांच्या साहित्यिक लेखनातून सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली, असे मत प्रा. डॉ. राहुल पालके यांनी व्यक्त केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. महात्मा फुले यांच्या द्विजन्म शताब्दीचे पर्व सुरु झाले असून हा जयंती कार्यक्रम उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. बी. शेख व समितीचे चेअरमन डॉ. एस. बी. शिंदे हे उपस्थित होते. प्रमुख व्याख्याते डॉ. राहुल पालके यांनी आपल्या व्याख्यानातून महात्मा फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंकरराव निंबाळकर विद्यालयात केंद्रीय पात्रता परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ एप्रिल-**

शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती कार्यक्रम व फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या सीटीईटी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यासाठी अध्यक्ष म्हणून अमृत सरडे, बालविकास प्रकल्प अधिकारी सोलापूर (वर्ग १), प्रमुख पाहुणे म्हणून विशाल भोसले, बालविकास प्रकल्प अधिकारी दक्षिण सोलापूर (वर्ग २), समाधान नागणे, बालविकास प्रकल्प अधिकारी बार्शी (वर्ग २) हे तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ दीपक गुंड हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक प्रा. गायकवाड जे. पी. यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी करुन दिला. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते CTET मध्ये पात्र झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दळवी प्रियंका, देवराम प्रियंका, इंगोले श्वेता तसेच माजी विद्यार्थिनी राजनंदिनी गाडेकर यांनी देखील आपल्या सत्काराला उत्तर देताना अध्यापक विद्यालयाच्या उपक्रमांचे तसेच अध्ययन अध्यापनाचे, शिस्त लावण्याचे कौतुक केले व आभार मानले. यानंतर प्रमुख पाहुणे समाधान नागणे, विशाल भोसले, अमृत सरडे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार आरती मोटे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रगती भाले व आरती चव्हाण यांनी केले.



# बार्शीत पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.११ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी बार्शी शहर व तालुका यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियान मंडस्तरीय कार्यशाळेचे आयोजन राज लॉन्स येथे करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन मा.आ. राजा राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण मंडळ स्तरीय कार्यशाळेमध्ये पदाधिकारी व कार्यकर्त्यांना राऊत यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजपा सोलापूर जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे यांनी विचार मांडले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, बाजार समिती सभापती विजय गरड, पंचायत समिती उपसभापती संतोषदादा निंबाळकर, बाजार समिती उपसभापती बाबा गायकवाड, व्यापारी मर्चंट असोसिएशन अध्यक्ष बाबासाहेब कथले, विलास रेणके, माढा लोकसभा विस्तारक अनंत राऊत, माळशिरस तालुका प्रमुख मदने, शहराध्यक्ष महावीर कदम, तालुकाध्यक्ष मदन दराडे, बबन गडदे उपस्थित होते.



### भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने महात्मा फुले यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

भारतीय बौद्ध महासभा सोलापूर पूर्व विभाग, पुरुष-महिला व शहर शाखेच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अर्धपुतळ्यास जिल्हा सरचिटणीस बाबासाहेब क्षीरसागर, कोषाध्यक्ष दत्तात्रय सिद्ध, गणेश धम्म, रक्षिता कांबळे आणि शारदा गजभिये यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी सामुदायिकरित्या त्रिसरण पंचशील ग्रहण केले. समता सैनिक दलाचे जिल्हाप्रमुख यशवंत साबळे व शहर प्रमुख बाबू रणखांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी मेजर गौतम जगताप, सुमेध डोलारे, विजय साळवे, मीनाक्षी कांबळे, अण्णासाहेब वाघमारे, नागसेन माने, बुद्धरत्न लंकेश्वर, राजेंद्र माने, प्रसाद लांबतुरे, अविनाश वाघमारे, आशा शिवशरण, कमल सोनवणे, संजीव दुपारगुडे, रेखा दुपारगुडे, महेंद्र काटे, सोमनाथ गायकवाड उपस्थित होते.

### डायल ११२ : पोलीस अंमलदाराचे विशेष प्रशिक्षण सुरू

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या डायल ११२ आपत्कालीन सेवेअंतर्गत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस अंमलदारांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमास सुरूवात झाली. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यातून प्रत्येकी २ पोलीस अंमलदार याप्रमाणे एकूण ४८ पोलीस अंमलदार या प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत. इंजिनीयर संजय लांडगे व संजय साबणे यांनी कॉल प्राप्त झाल्यापासून ते घटनास्थळी पोहोचेपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे मार्गदर्शन केले. महिला पोलीस अंमलदार विपुला कांबळे यांनी महिला तक्रारदारांशी संवाद साधताना आवश्यक असलेली संवेदनशीलता, गोपनीयता व काळजी यावर विशेष भर दिला.

# शंकरलिंग प्रशालेत महात्मा फुले जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ११ एप्रिल-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत म हात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती कार्यक्रम संपन्न झाला. सर्वप्रथम प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी संजयकुमार धनशेट्टी, सिदधाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, प्रा. संतोष शिंदे, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव, प्रा. शरणय्या मसुती, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रा. प्रतिभा ताडुरे वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, सेवक कट्टेप्पा कोळी, सुनिता कुर्ले उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.

# मंद्रूप जि.प. शाळेत आज विद्यार्थी मेळावा

## अधिकाऱ्यांचा सत्कार, शस्त्रास्त्रांचेही प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**मंद्रूप, दि.११ एप्रिल-**

येथील जिल्हा परिषद मुलांची केंद्र शाळा व माजी विद्यार्थी संघाच्या वतीने माजी विद्यार्थी मेळावा व मंद्रूपमधील गुणवंत अधिकाऱ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन रविवारी १२ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. तसेच दहावी व बारावीनंतर पुढे काय? या विद्यार्थी व पालकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रमाचेही आयोजन केले आहे.

मंद्रूप येथील उपमुख्य कार्यकारी अधिकारी नौशाद काझी, सहाय्यक कक्ष अधिकारी प्रशांत वाघमोडे व भूवैज्ञानिक अनिल कुमठाळे यांचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनिता कोरे राहणार आहेत. यावेळी मंद्रूपचे अप्पर तहसीलदार विष्णू बुटे यांच्या हस्ते संविधान कोनशिला अनावरण, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या हस्ते शालेय अहवाल पुस्तिका प्रकाशन, गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्या हस्ते संगणक कक्ष उद्घाटन व गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार यांच्या हस्ते प्रज्ञा चक्षू वाचनालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक म राठी मुलांची केंद्र शाळा व माजी विद्यार्थी संघाच्या वतीने शिवकालीन ऐतिहासिक व दुर्मिळ शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शनात तलवार, कुऱ्हाडी, कटयारी, छुऱ्या, भाला, दांडपट्टा, वाघनखं, चिलखत व बिछवे या दुर्मिळ शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आला आहे. रविवारी १२ एप्रिल रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रदर्शनातील शस्त्रास्त्रे पाहण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी प्रदर्शनातील शस्त्रास्त्रे पाहण्यासाठी विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, इतिहास प्रेमी, शिवप्रेमी, महिला, ज्येष्ठ नागरीक यांनी मंद्रूप मुलांच्या केंद्र शाळेला भेट देण्याचे आवाहन शाळेचे मुख्याद्यापक प्रकाश कुंभार गुरूजी व शालेय व्यवस्थापन समीतीच्या पदाधिकार्यांनी केली आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी सभापती अप्पाराव कोरे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी मंद्रूपचे शिक्षण विस्तार अधिकारी आयुब कलबुर्गी राहणार आहेत. यावेळी माजी सरपंच विश्वनाथ स्वामी यांच्या हस्ते प्रतिमापूजन, माजी सरपंच पिरप्पा म्हेत्रे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात येणार आहे.



### महापालिकेच्या वतीने फुले यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

महापालिकेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त सुपर मार्केट येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपम हापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, नगरसेविका कल्पना कदम,नगरसेविका सारिका खजुरगी, नगरसेवक प्रशांत पल्ली, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, नगरसेवक विजय चिप्पा, महेश देवकर, संतोष कदम, समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनावणे,कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे उपस्थित होते.

# क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती उत्साहात

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांची उपस्थिती

### महात्मा फुले गौरव पुरस्काराचे आज वितरण

**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि.११ एप्रिल-**

क्रांतीसुर्य राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती निमित्त महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण आणि विविध क्षेत्रातील आदर्श व्यक्तींचा महात्मा फुले गौरव पुरस्कार प्रदान सोहळा आज रविवार १२ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते व सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अजिनाथ माळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार ११ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये महात्मा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास माढा तालुक्याचे माजी आमदार धनाजीराव साठे यांच्या हस्ते माजी उपसरपंच राजेंद्र चौरे नगराध्यक्ष मीनल साठे माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार नाना भांगे आदींच्या उपस्थितीमध्ये अभिवादन



करण्यात आले. रविवारी सायंकाळी सात वाजता शैक्षणिक सामाजिक औद्योगिक शेती पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना महात्मा फुले गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ॲड. अमृता वाघे, माढाच्या नगराध्यक्षा मिनल साठे, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह शिंदे, पंचायत समितीचे सभापती पंडित देशमुख, जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज सावंत, युवा नेते दादासाहेब साठे, जिल्हा परिषद सदस्य माधुरी मोरे, वंदना कांबळे, भाजपा अध्यक्ष योगेश पाटील, तहसीलदार संजय भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित शिंदे, कुंभार, गटविकास अधिकारी महेश सुळे, गटशिक्षण अधिकारी विकास यादव उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यानंतर सुप्रसिद्ध अशा प्रा. वसंत हंकारे यांचे न समजलेले आईबाप.. या विषयावर व्याख्यान संपन्न होणार आहे. तरी या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ हनुमंत क्षिरसागर, सचिव लक्ष्मण राऊत यांनी केले आहे

#### यांचा होणार सन्मान

आदर्श शिक्षक: पांडुरंग विठ्ठल शिंदे, प्रताप बजरंग शहाणे, आदर्श समाजसेवक : डॉ विकास मस्के, आदर्श पत्रकार:– धैर्यशील महेश भांगे, आदर्श माता: सुनिता तानाजी माळी आदर्श उद्योजक: जमीर महंमदहुसैन, तांबोळी हारून, नजीर मुलानी आदर्श शेतकरी : सार्थक विकास साठे

#### शुद्धिपत्रक

श्री. आरुध मोहन जाधव (मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या प्रकरणी, दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १०२ च्या तरतुदीनुसार, तरुण भारत (मराठी) सोलापूर आवृत्तीमध्ये प्रकाशित झालेल्या, दिनांक ११.०४.२०२६ च्या सार्वजनिक सूचनेतील शुद्धिपत्रक. सदर सार्वजनिक सूचनेच्या स्तंभ ७ मधील संपर्कासाठीचा ईमेल आयडी खालील प्रमाणे वाचावा: pirp.arudh@shravanvishnoi.com

सार्वजनिक सूचनेचा उर्वरित तपशील तोच राहील.

**डॉ. श्रवणकुमार विष्णोई**
ठराव व्यवसायिक
श्री. आरुध मोहन जाधव - वैयक्तिक जामीनदार, मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणी क्रमांक: -IBBI/IPA-००२/IP-N०००४०/२०१६-२०१७/१००७९
AFA No. AA२/१००७९/०२/३११२२६/२०४१२३
ठिकाण: लखनऊ, दिनांक: ११.०४.२०२६

#### शुद्धिपत्रक

श्री. मयुरेश कमळकर जाधव (मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या प्रकरणी, दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १०२ च्या तरतुदीनुसार दिनांक ११.०४.२०२६ रोजी प्रसारित केलेल्या आणि तरुण भारत (मराठी) सोलापूर आवृत्तीत प्रकाशित झालेल्या सार्वजनिक सूचनेतील शुद्धिपत्रक. सदर सार्वजनिक सूचनेच्या स्तंभ ७ मधील संपर्कासाठीचा ईमेल आयडी खालीलप्रमाणे वाचावा: pirp.mayuresh@shravanvishnoi.com

सार्वजनिक सूचनेचा उर्वरित तपशील तोच राहील.

**डॉ. श्रवणकुमार विष्णोई**
ठराव व्यवसायिक
श्री. मयुरेश कमळकर जाधव - वैयक्तिक जामीनदार, मे. पांढे कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणी क्रमांक: -IBBI/IPA-००२/IP-N०००४०/२०१६-२०१७/१००७९
AFA No. AA२/१००७९/०२/३११२२६/२०४१२३
ठिकाण: लखनऊ, दिनांक: ११.०४.२०२६



## महत्त्वाचे

### संजू सॅमसनला सूर गवसला; पहिले शतक झळकावले

**चेन्नई** १९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात टी-२० चेन्नई सुपर किंग्सकडून दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या



त्यांच्या चौथ्या सामन्यात खेळताना अखेर सलामीवीर संजू सॅमसनला सूर गवसला . सॅमसनने ५२ चेंडूंत १४ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने नाबाद १०० धावा ठोकल्या. त्यापूर्वी त्याने २६ चेंडूंमध्ये ९ चौकारांसह सीएसकेसाठी आपले पहिले अर्धशतक पूर्ण केले. चेपॉकमधील ३०,२७३ चाहते जल्लोष करू लागले. डीजेने आवेशम चित्रपटातील इल्यूमिनाटी हे गाणे मोठ्या आवाजात वाजवले. सॅमसन अजून खूप काही करू शकतो असे दिसते. ११ चौकार मारल्यानंतर सॅमसनने आपला पहिला षट्कार ठोकला, हा सीएसकेचाही पहिला षट्कार होता. त्याने कर्णधार ऋतुराज गायकवाडसोबत (१५) पहिल्या गड्यासाठी ६२ धावांची भागीदारी केली. शेवटचे वृत्त हाती आले तोपर्यंत सीएसकेने १९ षटकांत २ बाद १९७ धावांपर्यंत मजल मारली होती, त्यावेळी सॅमसन ११२ धावांवर, तर शिव दुबे नाबाद ८ धावांवर खेळत होते. आयुष म्हात्रे ५९ धावांवर असताना जखमी निवृत्त झाला. ■

### सैन्यमची सर्वोत्तम कामगिरी

**ग्रनाडा** : येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेतील महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल अंतिम फेरीत सैन्यमने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम असे पाचवे स्थान पटकावले. आशियाई क्रीडा स्पर्धेची विद्यमान विजेती असलेल्या पलकनेही अंतिम फेरीत स्थान मिळविले आणि ती एकूण सातव्या क्रमांकावर राहिली. महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात चीनच्या शेन यियाओने सुवर्णपदक जिंकले. पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड-फायर पिस्तूल प्रकारात २३ वे स्थान मिळवत विजयवीर सिद्धूने भारतीयांमध्ये सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली. माजी कनिष्ठ विश्वविजेती व आशियाई विजेती असलेली भारतीय नेमबाज सैन्यम हिने अंतिम फेरीत १७८.९ गुणांची कमाई केली. पलक हिने २४ शॉट्सच्या या अंतिम फेरीत १४ वा शॉट घेतल्यानंतर, १३७.९ गुणांसह ती स्पर्धेबाहेर झाली आणि एकूण सातव्या क्रमांकावर राहिली. चीनच्या शेन यियाओने २४४.२ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

### भारत प्ले-ऑफ शर्यतीतून बाहेर

**नवी दिल्ली** : येथे आयोजित -बिली जीन किंग चषक टेनिस स्पर्धेच्या आशिया/ओशानिया गट-१ मधील लढतीत शनिवारी अखेरच्या दिवशी दक्षिण कोरियाच्या डेयॉन बॅक हिच्याविरुद्ध सलग सेट्समध्ये पराभव पत्करण्यापूर्वी अंकिता रैनाने निकराचा लढा दिला; मात्र या पराभवामुळे बिली जीन किंग चषकमधील जागतिक प्ले-ऑफ शर्यतीतून भारताला बाहेर पडावे लागले. दिवसाच्या सुरुवातीला गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर असलेल्या भारताला अव्वल दोन स्थानांमध्ये प्रवेश करण्यासाठी कोरियावर ३-० असा विजय मिळविणे आवश्यक होते. कर्णधार विशाल उप्पल याने या महत्त्वपूर्ण लढतीची सुरुवात करण्यासाठी आपली सर्वात अनुभवी खेळाडू अंकिताची निवड केली; परंतु डेयॉन बॅकने यजमान संघाचे आव्हान मोडून काढत भारतीय चाहत्यांची निराशा केली. अंकिताने आपले सर्वस्व पणाला लावून खेळ केला. मात्र, ते पुरेसे ठरले नाही. १ तास ५५ मिनिटे चाललेल्या या सामन्यात तिला १-६, ५-७ असा पराभव पत्करावा लागला. आता भारत उर्वरित दोन सामने जिंकण्यासाठी प्रयत्न करेल. ■

# घरच्या मैदानावर पंजाबच 'किंग'

### हैदराबादवर ६ गड्यांनी मात

### प्रभसिमरन, प्रियांश, श्रेयसची अर्धशतके

◆ **मुल्लानपूर, ११ एप्रिल**

प्रभसिमरन सिंग, प्रियांश आर्य आणि कर्णधार श्रेयस अय्यरने झळकावलेल्या अर्धशतकांच्या जोरावर पंजाब किंग्सने येथे खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यात सनरायझर्स हैदराबादवर ७ चेंडू शिल्लक ठेवित ६ गड्यांनी शानदार विजय नोंदविला. आपल्या गृह मैदानावर मिळविलेल्या या विजयाबरोबरच पंजाब किंग्सने या हंगामातील आपली अजिंक्य मालिका कायम राखण्यात यश मिळविले. ३३ चेंडूंत नाबाद ६९ धावांची खेळी करणारा श्रेयस अय्यर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादने ६ बाद २१९ धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्सने १८.५ षटकांत ४ बाद २२३ धावा काढून आपला विजय साकार केला. पंजाब किंग्सचा चार सामन्यातील हा तिसरा विजय असून त्यांनी ७ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप मारली.

पंजाबने नाणेफेक जिंकून हैदराबादला प्रथम फलंदाजसाठी पाचारण केले.

अभिषेक शर्मा व ट्रॅव्हिस हेडने तडाखेबंद फलंदाजी करीत सनरायझर्स हैदराबादची दमदार सुरुवात करून दिली. या दोघांनी १२० धावांची भागीदारी करून हैदराबादचा पाया भक्कम केला. हे दोघेही सामना आपल्या बाजूने पूर्णपणे वळविणार असे वाटत असताना, फिरकीपटू शशांक सिंगने एकाच षटकात दोन बळी मिळवून सामन्याचे चित्र बदलून टाकले होते. ट्रॅव्हिस हेडने २३ चेंडूंत ३८ धावांची भर घातली, तर अभिषेकने अवघ्या २८ चेंडूंत ५ चौकार व ८ षट्कारांसह ७४ धावांची खेळी केली. मात्र पुढे कर्णधार ईशान किशन (२७), हेनरिक क्लासेन (३९), अनिकेत वर्मा (१८) व सलील अरोराने (९) छोट्या-छोट्या भागीदारी करत संघाला दोन धावांचा टप्पा गाठून दिला. नितीश कुमार रेड्डी (०) व हर्ष दुबेने (१) नाबाद खेळी करत सनरायझर्स हैदराबादला २० षटकांत ६ बाद २१९ धावा रचून दिल्या. पंजाब किंग्सकडून अर्शदीप सिंग व शशांक सिंगने प्रत्येकी २ बळी, तर झेव्हियर्स बार्टलेटने एक बळी टिपला.



सामनावीर श्रेयस अय्यरची विजयी खेळी

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना

**नाबाद ६९**
**चेंडू ३३**
**चौकार ५**
**षट्कार ५**

पंजाब किंग्सच्या प्रियांश आर्य व प्रभसिमरन सिंगनेही जबरदस्त फलंदाजी केली. या दोघांनी ३८ चेंडूंत ९९ धावांची सलामी भागीदारी केली असताना प्रियांश आर्यला शिवांग कुमारने नितीश कुमार रेड्डीकडून झेलबाद केले. प्रियांशने अवघ्या २० चेंडूंत प्रत्येकी ५ चौकार व षट्कारांसह ५७ धावांची अर्धशतकी खेळी केली.संघाच्या खात्यात आणखी १८ धावांची भर पडत नाही, तोच प्रभसिमरनलाही शिवांगने क्लासेनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. प्रभसिमरनने २५ चेंडूंत प्रत्येकी ४ चौकार व षट्कारांसह ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली. नंतर शिवांगने कूपर कोर्नोलीच्या (११) रुपाने तिसरा बळी मिळविला. तोपर्यंत पंजाब किंग्सने १०.२ षटकांत ३ बाद १२८ धावांचा टप्पा गाठला होता. पुढे श्रेयस अय्यरने कर्णधारपदाला साजेशी कामगिरी करीत संघाला विजय मिळवून देणारी खेळी केली. श्रेयसने नेहल वढेरा (१४) व शशांक सिंगच्या (नाबाद १६) साथीने पंजाब किंग्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. श्रेयसने अभिषेकच्या चेंडूवर चौकार ठोकत पंजाब किंग्सला १८.५ षटकांत ४ बाद २२३ धावा रचून दिल्या. श्रेयस अय्यरने अवघ्या ३३ चेंडूंत प्रत्येकी ५ चौकार व षट्कारांसह नाबाद ६९ धावांची विजयी खेळी केली. हैदराबादकडून शिवांग कुमारने तीन बळी व हर्ष दुबेने एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

# आयुष शेट्टी अंतिम फेरीत

### बॅडमिंटन आशियाई अजिंक्यपद स्पर्धा

### अव्वल विश्वमानांकित कुनलावुतला पराभवाचा धक्का

◆ **निंगबो, ११ एप्रिल**

येथे आयोजित बॅडमिंटन आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत शनिवारी भारताच्या २० वर्षीय आयुष शेट्टीने दिग्गज खेळाडूंना पराभूत करण्याची आपली मालिका कायम राखली. या स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या या भारतीय युवा खेळाडूने विद्यमान विजेता व जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या थायलंडच्या कुनलावुत विटिडसर्नचा १०-२१, २१-१९, २१-१७ अशा गुणांनी पराभव करीत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली.

१९६५ नंतर अंतिम फेरीत पोहोचणारा शेट्टी हा पुरुष एकेरीतील पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. पहिला गेम २०२३ च्या जागतिक ज्युनियर स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या आयुषच्या बाजूने लागला नसला तरी, त्याने सुरुवातीच्या या पिछाडीवर सहज मात केली. त्यानंतरच्या दोन गेममध्ये त्याने पूर्णपणे वर्चस्व गाजविले व ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या विटिडसर्नला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही.





दुसऱ्या गेममध्ये आयुषने १२-४ अशी आघाडी घेतली होती. विटिडसर्नने ही गुणांची तफावत कमी करत १३-११ अशी स्थिती आणली असली, तरीही आयुष पूर्णपणे निर्धास्त व आत्मविश्वासाने खेळताना दिसून आला.

तिसऱ्या गेममध्येही तोच आत्मविश्वास कायम राखत आयुषने १ तास १५ मिनिटांत आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील आपले पहिले अंतिम फेरीचे स्थान निश्चित केले. अंतिम फेरीत आयुषचा सामना, चाऊ टिएन चेन (जागतिक क्रमवारी ६) व शी यू ची (जागतिक क्रमवारी २) यांच्यातील सामन्याच्या विजेत्याशी होईल.

दिनेश खन्ना यांच्यानंतर, या प्रतिष्ठित स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारा तो पहिला भारतीय पुरुष एकेरी खेळाडू ठरला आहे. या खंडीय स्पर्धेत पुरुष एकेरीचे सुवर्णपदक जिंकणारा एकमेव भारतीय म्हणून खन्ना यांचे नाव आजही कायम आहे. त्यांनी १९६५ मध्ये ही कामगिरी केली होती. सात्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने २०२३ मध्ये दुहेरीचे विजेतेपद पटकावले होते. ◂(वृत्तसंस्था)

# अनिमेष कुजूरने पटकावले दुहेरी विजेतेपद

### एका दिवसीय इंडियन ॲथ्लेटिक्स सिरीज

◆ **नवी दिल्ली, ११ एप्रिल**

ओडिशाचा स्टार धावपटू अनिमेष कुजूरने शनिवारी येथे आयोजित एका दिवसाच्या इंडियन ॲथ्लेटिक्स सिरीजमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याने २०० मीटरचे विजेतेपद पटकावले असतानाच, १०० मीटर शर्यतही फोटो फिनिशमध्ये जिंकून दुहेरी यश संपादन केले.

मोंडो या वेगवान धावपट्टीवर आपल्या मैदानी हंगामाची सुरुवात करताना, कुजूरने २०० मीटर शर्यत २०.७४ सेकंदांच्या वेळेसह जिंकली. यात त्याने ४०० मीटर शर्यतीचा राष्ट्रीय विक्रमवीर विशाल टी. याला मागे टाकले. तिरुवनंतपुरमच्या विशालने ही शर्यत २१.०१ सेकंदांत पूर्ण केली. राजस्थानच्या धरमवीर चौधरीने २१.०३ सेकंदांची वेळ नोंदवित तिसरा सर्वोत्तम क्रमांक पटकावला. १०० मीटर शर्यतीत कुजूरने १०.२७२ सेकंदांची वेळ नोंदविली आणि फोटो फिनिशमध्ये तामिळ अरसूचा अगदी थोड्या फरकाने पराभव केला.



महिलांच्या लांब उडी स्पर्धेत शैली सिंगने ६.२४ मीटरची उडी घेत अव्वल स्थान पटकावले.

**हिमा दासचे पुनरागमन**

हिमा दास दोन वर्षांनंतर पुन्हा ट्रॅकवर परतली असून, राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी भारतीय संघात निवड होण्याचे तिचे ध्येय आहे. इंडियन ॲथलेटिक्स सिरीजमध्ये विविध क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंनी दमदार कामगिरी केली, ज्यामुळे भारतीय ॲथलेटिक्स क्षेत्रातील उदयोन्मुख प्रतिभांना प्रकाशझोतात येण्याची संधी मिळाली. ◂(वृत्तसंस्था)

# गुजरात विजय नोंदविण्यास उत्सुक

### लखनौ संघाचा घरच्या मैदानावरील वाईट फॉर्म चिंतेचा विषय

◆ **लखनौ, ११ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी दुपारच्या सत्रात एकाना क्रिकेट स्टेडियमवर यजमान लखनौ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. लखनौ सुपर जायंट्सला मुकुल चौधरीच्या रूपाने एक नवीन स्टार खेळाडू गवसला असला तरी, त्यांची घरच्या मैदानावरची वाईट कामगिरी ही एक मोठी चिंतेची बाब आहे.

या हंगामात लखनौने आतापर्यंत तीनपैकी दोन सामने जिंकले व एक सामना गमावला, तर गुजरातने तीनपैकी एक सामना जिंकला व दोन सामने गमावले आहेत. दोन्ही संघ आत्मविश्वास वाढवणाऱ्या परदेशातील विजयांच्या जोरावर या सामन्यात उतरत आहेत.

गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सवर एका धावेने रोमांचक विजय मिळवित या हंगामातील आपला पहिला विजय नोंदविला, तर लखनौ सुपर जायंट्सने (एलएसजी) सनरायझर्स हैदराबाद व कोलकाता



ऋषभ पंत



शुभमन गिल

नाईट रायडर्सविरुद्ध परदेशात दोन प्रभावी विजय नोंदविले. मात्र, एलएसजीला एकाना क्रिकेट स्टेडियमला अभेद्य किल्ला करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. गत हंगामात येथे खेळलेल्या आठ सामन्यांपैकी सहा सामन्यांत त्यांना पराभव पत्करावा लागला होता, यात सलग पाच पराभवांचा समावेश होता व त्यामुळे ते सातव्या स्थानावर राहिले होते. एकूणच, या मैदानावर खेळलेल्या २२ सामन्यांपैकी त्यांना केवळ नऊ विजय मिळविता आले आहेत.

या मोसमातही घरच्या मैदानावर त्यांची सुरुवात फलंदाजीतील घसरणीने झाली व दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सहा गडी राखून झालेल्या पराभवात ते १४१ धावांवर सर्वबाद झाले.

या वर्षीचा हा त्यांचा केवळ दुसरा घरच्या मैदानावरचा सामना असल्यामुळे लखनौ संघ हा विक्रम मोडण्यासाठी आतुर असेल.

केकेआरविरुद्धचा शेवटचा सामना विशेषतः खास होता. या सामन्यातून मुकुल चौधरीच्या रूपाने एका नवीन फिनिशरचा उदय झाला. उधमपूर, राजस्थानच्या या २१ वर्षीय मुकुलने विविध प्रकारच्या फटक्यांच्या जोरावर षट्कारांची उधळण करीत मैदान गाजवले. तो महेंद्र सिंह धोनीला आपला आदर्श मानतो. आयुष बदोनीलाही सूर गवसला असून त्याने केकेआरविरुद्ध अर्धशतक झळकावून संघाला धावांचा पाठलाग करण्यासाठी सज्ज केले. मिचेल मार्श, एडन मार्कराम, कर्णधार ऋषभ पंत आणि निकोलस पूरनचा समावेश असलेल्या पहिल्या पाच फलंदाजांच्या फळीला अधिक बळकटी मिळाली आहे.

हा सामना दुपारचा असल्यामुळे संथ व अनियमित उसळी देणाऱ्या खेळपट्टीवर गुजरातची फिरकी गोलंदाजांची जोडी रशीद खान व वॉशिंग्टन सुंदर यांच्याविरुद्धचा सामना निर्णायक ठरू शकतो. गुजरात टायटन्स संघासाठी फलंदाजीच्या आघाडीवरही सकारात्मक बातमी आहे. इंग्लंडचा अनुभवी खेळाडू जोस बटलरने २७ चेंडूंत ५२ धावा करून फॉर्ममध्ये परतला आहे, तर कर्णधार शुभमन गिलने दुखापतीतून पुनरागमन करताना डावाची सुरुवात करीत शानदार ७० धावा केल्या. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**लखनौ सुपर जायंट्स वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : एकाना स्टेडियम, लखनौ
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

००

**मुंबई इंडियन्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायंकाळी : ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीची फलंदाजी खूपच परिपक्व

◆ **गुवाहाटी, ११ एप्रिल**

वैभव सूर्यवंशी कदाचित अवघ्या १५ वर्षांचा असेल, पण तो ज्या स्पष्टतेने व शांतचित्ताने फलंदाजी करत आहे, ती पाहता तो त्याच्या वयापेक्षा कितीतरी अधिक परिपक्व आहे, अशा शब्दांत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार याने कौतुक केले.

वैभव सूर्यवंशीने अवघ्या २६ चेंडूंत ७८ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने या आक्रमक फलंदाजीमध्ये आठ चौकार व सात षटकार हाणलेत. त्यानंतर ध्रुव जुरेलने

### भुवनेश्वर कुमार यांनी केले कौतुक

नाबाद ८१ धावांची खेळी करत संघाच्या धावसंख्येचा डोलारा सांभाळला. या कामगिरीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला सहा गडी राखून आणि दोन षटके बाकी असताना पराभूत केले; या विजयासह या हंगामात राजस्थान रॉयल्सची सलग चार सामन्यांतील विजयी मालिका कायम राहिली आहे.

वैभव क्रिकेटच्या नियमांनुसार योग्य आणि तंत्रशुद्ध फटके खेळत आहे, अंधाधुंद फटकेबाजी करत नाही. तो खरोखरच उत्कृष्ट फलंदाजी करीत आहे. त्यासाठी आपण त्याला नक्कीच श्रेय दिले पाहिजे; त्यामुळे या सर्व श्रेयाचा तोच मानकरी आहे, असे भुवनेश्वर कुमार म्हणाला.

आरसीबीला आपण पूर्णपणे बॅकफूटवर गेलो आहोत किंवा हतबल झालो आहोत किंवा कोणीतरी आमच्या गोलंदाजीची अक्षरशः धुलाई करीत आहे, असे कधीच वाटले नाही, असे भुवनेश्वरने ठामपणे सांगितले.

वैभव २५ वर्षांचा असो किंवा १५ वर्षांचा असो, तो टी-२० क्रिकेटचाच एक अविभाज्य भाग आहे.

आमच्याकडे काही रणनीती होत्या, पण त्याची अंमलबजावणी आम्ही पूर्णपणे करू शकली नाही. हा खेळाचाच एक भाग आहे, त्यामुळे आम्ही त्याबद्दल फारशी चिंता करत नाही, असेही तो म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)





# १३ सुवर्णपदकांसह भारतीयांचा दबदबा

### दक्षिण आशियाई युवा टेबल टेनिस

◆ **शिमला, ११ एप्रिल**

येथील दक्षिण आशियाई युवा टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत शनिवारी विविध गटांमध्ये एकूण १३ सुवर्णपदके जिंकून भारतीय खेळाडूंनी आपले वर्चस्व गाजविले.

ही स्पर्धा आशियाई युवा अजिंक्यपद स्पर्धेसाठीची पात्रता फेरी म्हणूनही महत्त्वाची आहे.१९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीच्या अंतिम फेरीत, भारताच्या प्रियनुज भट्टाचार्य याने आपलाच देशबांधव पुनीत बिस्वास याचा ३-१ ने पराभव करत सुवर्णपदक पटकावले. दुहेरीच्या सामन्यात, एम.आर. बालमुरुगन आणि मेहान सेंथिल या जोडीने पहिला गेम गमावल्यानंतरही जोरदार पुनरागमन करत बांगलादेशच्या अबुल हसीब व नफीज इक्बाल या जोडीचा पराभव केला व विजेतेपदावर आपले नाव कोरले. १५ वर्षांखालील मुलांच्या गटात, आदित्य दास याने अंतिम फेरीत आपला सहकारी भारतीय खेळाडू अक्षय किरिकारा याचा पराभव करण्यासाठी अत्यंत प्रभावी कामगिरी केली.

दुहेरीचे विजेतेपदही भारताकडेच राहिले; ऋषान चट्टोपाध्याय आणि आकाश राजवेलू या जोडीने नेपाळविरुद्धच्या पाच गेमपर्यंत चाललेल्या अटीतटीच्या लढतीत विजय मिळविला. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात सर्व-भारतीय अंतिम फेरीत जेनिफर वर्गीस हिने एक गेम पिछाडीवर असतानाही मुसंडी मारत अनन्या मुरलीधरनचा पराभव केला; तर १५ वर्षांखालील गटाच्या अंतिम फेरीत अंकोलिका चक्रवर्ती हिने आहोना रे हिच्यावर मात करत विजेतेपद पटकावले. मुलींच्या दुहेरीच्या दोन्ही गटांमध्येही भारताने निर्विवाद वर्चस्व गाजवत सर्व विजेतेपदे आपल्याकडे खेचून आणली. प्रिशा गोयल व दित्सा रॉय या जोडीने १९ वर्षांखालील गटाचे विजेतेपद सलग गेम्समध्ये जिंकले; तर १५ वर्षांखालील गटाच्या अंतिम फेरीत श्रीजनी चक्रवर्ती आणि तनिष्का काळभैरव या जोडीने पहिला गेम गमावल्यानंतरही जबरदस्त पुनरागमन करीत विजय मिळविला. मिश्र दुहेरीच्या स्पर्धांनी भारताची श्रेष्ठता प्रकर्षाने दिसून आली. १९ वर्षांखालील गटाच्या अंतिम फेरीत प्रियनुज व जेनिफर या जोडीने पूर्णपणे वर्चस्व गाजवले; तर आदित्य दास आणि अंकोलिका चक्रवर्ती या जोडीने एकही गेम न गमावता १५ वर्षांखालील गटाचे विजेतेपद निश्चित केले. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापुरच्या महिला उपांत्य फेरीत

**नागपूर, दि ११ एप्रिल-**

येथे सुरू असलेल्या राज्य अजिंक्यपद व्हॉलिबॉल स्पर्धेत सोलापूरच्या महिला संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत त्यांची गाठ नाशिकशी पडेल. उपांत्यपूर्व सामन्यात सोलापूरच्या महिला संघाने नागपूरला २५-२१, २५-१९ असे सरळ दोन सेटमध्ये हरविले.



### रशीद खान चॅम्पियन गोलंदाज : दहिया

◆ **लखनौ, ११ एप्रिल**

अष्टपैलू खेळाडू रशीद खान हा एक चॅम्पियन्स गोलंदाज आहे, अशा शब्दांत गुजरात टायटन्सचे सहाय्यक प्रशिक्षक विजय दहियाने त्याचे कौतुक केले.

रशीद खानच्या कामगिरीत थोडी घट झाली असली, तरीही सिद्ध कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना स्वतःच्या खेळात आमूलाग्र बदल करण्याची गरज नसते, असेही तो म्हणाला.

गत काही काळात रशीदची कामगिरी फारशी समाधानकारक राहिली नाही. गुजरात टायटन्ससाठी १५ सामन्यांत त्याला केवळ नऊ बळी मिळवता आले. पाठीच्या शस्त्रक्रियेनंतर पुन्हा एकदा आपला सूर गवसण्यासाठी संघर्ष करीत असल्याने २०२४ हे वर्षही त्याच्यासाठी आतापर्यंत शांतच राहिले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सविता काटे, नलिनी धेंडे प्रथम क्रमांकाचे मानकरी

## एकता महिला मंच स्पर्धा : 'पाणी वाचवा, झाडे जगवा' रील स्पर्धेचा पारितोषिक वितरण

तभा वृत्तसेवा
**वैराग, दि. ११ एप्रिल-**

एकता महिला मंचच्या 'पाणी वाचवा, झाडे जगवा' रील स्पर्धेतून तळ्यात मळ्यातमध्ये सविता काटे यांनी तसेच लकी ड्रॉ मध्ये नलिनी धेंडे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी बचतीचा आणि वृक्ष संवर्धनाचा जागर करण्यासाठी 'एकता महिला मंच'ने येथील श्री व्यंकोबाबा महाराज मंदिर परिसरात 'पाणी वाचवा, झाडे जगवा' या विषयावरील रील स्पर्धा आयोजित केली होती. यात ३० ते ३५ महिलांनी आपला सहभाग नोंदवत कलेच्या माध्यमातून सामाजिक भान जपले. महिला दक्षता कमिटीच्या स्मिता देशपांडे, निर्भया पथकाचे



प्रमुख बाबासाहेब घाडगे, वैराग पोलीस स्टेशनच्या शबाना कोतवाल, एकता महिला मंच प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, इंजिनिअर किशोर चौधरी, मालबार गोल्डचे शाहीर सय्यद व सुमित टकले, पोलीस कॉन्स्टेबल अमोल भोरे यांच्या उपस्थितीत याचे बक्षिस वितरण झाले. मान्यवरांनी प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेच्या पूजन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

सहभागी रणरागिणी या स्पर्धेत शालन दसवंत, गीतांजली जोशी, लक्ष्मी सुतार, नलिनी धेंडे, गीता पाटील, शुभांगी अडसूळ, सुचिता कुटे, जयश्री संकपाळ, प्रेमला सुरवसे, सुनिता जांभळे,रंजना गवळी, सविता काटे, पूजा भोसले, क्रांती पाटील, शैला कांबळे, पूजा काळे, पंचशीला बनसोडे, रत्नप्रभा गायकवाड, वर्षा साळुंखे, लक्ष्मी मोरे, राजनंदनी हाके,इंदू डाके, अनिता पाटील, संगीता डाके, रेणुका चौगुले, मनीषा गवळी, राणी गवळी, प्रभावती साबळे, सुरेखा कोळी, वंदना कासार, राजश्री बादगुडे, भाग्यश्री पावले, सुरेखा कोळी, मथुरा दसवंत यांसह मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रेमला सुरवसे यांनी केले.

लोकसहभागातून बक्षिसांचा वर्षाव

महिलांच्या या जिद्दीला प्रोत्साहन देण्यासाठी श्री गणेश वस्त्र दालन बार्शी यांच्या वतीने सर्व सहभागी महिलांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. मालबार गोल्ड अँड डायमंड्स यांच्या विशेष सहकार्यातून लकी ड्रॉ काढण्यात आला आणि विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. देवराज स्टील सेंटर वैराग यांच्याकडून सर्व उपस्थितांसाठी अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती.

### अंतिम निकाल (प्रथम तीन)

**तळ्यात मळ्यात स्पर्धा :** सविता काटे, शालन दसववंत, पूजा भोसले, उत्तेजनार्थ राजेश्री बादगुडे.

**लकी ड्रॉ :** नलिनी धेंडे, मनीषा गवळी, राजेश्री बादगुडे.

## महत्वाचे...



**सोलापूर : होमिओपॅथिक शास्त्रचे जनक डॉ. सॅम्युअल हनिमन यांची २७१ वी जयंती होमिओपॅथिक डॉक्टर संघटनेचे कार्यालय येथे ॲड. शक्ती कोळेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी होमिओपॅथि संघटना संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनील वरळे, पेशंट शंकर बाबर, रुपाली वरळे.**

## एसआयआर मोहोळ विधानसभा प्रमुखपदी महेश सोवनी यांची निवड

**मोहोळ, दि. ११ एप्रिल-**



मतदार यादी पुनर्निरीक्षण म्हणजे एसआयआर मोहोळ विधानसभा प्रमुख पदी भाजपाचे जिल्हा चिटणीस मोहोळचे महेश विलास सोवनी यांची निवड करण्यात आली आहे. तशा आशयाचे पत्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांनी त्यांना दिले आहे. राज्यात एसआयआरची प्रक्रिया सुरु झाली आहे. यामध्ये २००२ आणि २०२४ च्या मतदार यादीतील नावांचे मॅपिंग करणे, सर्व नांवे पुन्हा येतील असा प्रयत्न करणे, आणि ज्यांची नांवे नसतील त्यांचे योग्य पुरावे घेऊन नव्या मतदार यादीत त्यांची नावे घालणे,नावात दुरुस्ती, फोटो आणि पत्ता बदल आदि कामे प्रामुख्याने केली जात आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने प्रत्येक बूथवर म्हणजे यादी भाग क्रमांकासाठी एका शासकीय कर्मचाऱ्याची बीएलओ म्हणून नियुक्ती केली आहे. त्याला मदत करण्यासाठी प्रत्येक पक्षाच्या वतीने एका कार्यकर्त्याची प्रत्येक बूथवर नियुक्ती करायची आहे. भाजपच्या वतीने ही नियुक्ती करण्याचे अधिकार महेश सोवनी यांना पक्षाने दिले आहेत. या निवडीबद्दल माजी आमदार राजन पाटील आणि यशवंत माने, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे, दोन्ही मंडल अध्यक्ष सतीश काळे आणि रमेश माने, माजी जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे, मच्छिंद्र गाडे-पाटील, ज्ञानेश्वर भोसले आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## बादोले (बु) येथे ७२ जणांचे रक्तदान

**अक्कलकोट, दि. ११ एप्रिल-**

मौजे बादोले बु. दलित वस्ती समाज मंदिर कुरनूर रोड येथे रक्तदान शिबीर संपन्न झाले यामध्ये ७२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यंदाचे हे ७ वे वर्ष होतशिबीराचे उद्घाटन माजी पंचायत समिती सदस्य मल्लिकार्जुन हत्ते यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी अक्कलकोट नगरपरिषदेचे आरोग्य सभापती अविनाश मडिखांबे होते. प्रमुख अतिथी म्हणून रासपचे सोलापूर जिल्हा युवक आघाडी जिल्हा अध्यक्ष साहिल बंडगर, रिपाईचे अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष शांतकुमार सलगरे, रासपचे बादोले शाखा अध्यक्ष पांडुरंग सलगरे, बादोल्याचे माजी सरपंच बाजीराव खरात, विठ्ठल खरात, शिवशंकर कत्ते, रेवणसिध्द सरवदे, अनिल धायगोडे, बालाजी धायगोडे, लाला नदाफ,सिध्दाराम बिराजदार, धनराज बिराजदार, अकबर भाईजान, तानाजी सोलंकर, उत्कर्ष कुलकर्णी, राम मदने, म्हाळू धर्मसाले उपस्थित होते. यावेळी अक्कलकोट नगरपरिषदेचे आरोग्य सभापती अविनाश मडिखांबे, रासपचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी मनोगत व्यक्त केले. रक्त संकलन करण्यासाठी शिवशंभो ब्लडबँक सेंटर मोहोळ यांनी सहकार्य केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी महेश सोलंकर, सिध्दाराम सलगरे, समर्थ खरात, प्रकाश बंडगर, राजू माडकर, अनिल खरात तुळशीराम माडकर यांनी परीश्रम घेतले.



## शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**सांगोला, दि. ११ एप्रिल-**

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष महादेव गायकवाड, प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख उपस्थित होते. सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वैष्णवी भोसले, समीक्षा लिगाडे, शितल सावंत, सानिका गरंडे, सानिका साळुंखे, शुभम स्वामी, नम्रता खटकाळे, साक्षी गायकवाड, पूजा गायकवाड या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रथम वर्ष विभागाचे प्रमुख प्रा.पी.जी.पवार म्हणाले, आयुष्यात अडचणी येतील, अपयशही येईल, पण त्या प्रत्येक प्रसंगातून काहीतरी शिकून पुढे जाणे हेच खरे यश आहे असा सल्ला दिला. याप्रसंगी माजी विद्यार्थिनी संजना येलपलेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाल्याबद्दल, सिव्हिल विभागातील शुभम टाकळेने कॅडवॉर या इव्हेंट मध्ये प्रथम क्रमांक तर श्रेयश भगतने उपविजेते पद प्राप्त केल्याबद्दल तसेच नम्रता खटकाळे, पूजा गायकवाड, समृद्धी काळुंखेनी ब्रिज मेकिंग या इव्हेंटमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. रणजीत देशमुख, सूत्रसंचालन प्रा.संदीप बावचे यांनी केले.

## निधन वृत्त...

### रमाकांत देशपांडे

**वेळापूर, दि. ११ एप्रिल-**



वेळापूर (ता.माळशिरस) येथील रहिवासी व विश्व हिंदू परिषदेचे व पंढरपूर प्रांत उपाध्यक्ष रमाकांत बाळकृष्ण देशपांडे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. डॉ. श्रीकर देशपांडे यांचे ते वडील होत.



## महात्मा फुले यांना जयंती दिनी संभाजी आरमारची मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्यावतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्यास संघटनेचे कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी सांगितले की, बहुजन समाजाला शिक्षणाची द्वारे महात्मा फुले यांनी खुली करून दिली. त्यांनी रचलेल्या स्त्री शिक्षणाच्या पायावर चढलेला कळस म्हणजे आज देशाच्या राष्ट्रपती पदी विराजमान महिला आहेत. याप्रसंगी संभाजी आरमार उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमीत कदम, शहर संघटक राज जगताप, अर्जुन शिवसिंगवाले, उपशहरप्रमुख द्वारकेश बबलादीकर, सागर दासी, सचिव तेजस चौधरी, अविनाश विटकर, मल्लिकार्जुन पोतदार, विकी ठेंगले, प्रवीण मोरे, सुधाकर करणकोट, रोहन तपासे, सुरेश मामाड्याल उपस्थित होते.

## समतेच्या विचारांची वाटचाल : 'युगंधर'कडून समता सहलीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

सामाजिक समतेचे प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधत युगंधर फाऊंडेशन सोलापूरच्या वतीने समता सहल या अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२७ या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमामध्ये विशेषतः महिला आणि युवतींना प्राधान्य देण्यात येणार असून, फुले दांपत्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी स्वतःमध्ये नेतृत्वगुण विकसित करावेत, सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा आणि परिवर्तनाच्या प्रवाहात सहभागी व्हावे, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे.

सहलीमध्ये प्रवास, स्मारकांचे प्रवेश शुल्क, नाश्ता व जेवण यांचा एकत्रित खर्च समाविष्ट असणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी युगंधर फाऊंडेशनशी (८७८८१३९२२९) संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



## सुयश विद्यालयात महात्मा फुले जयंतीनिमित्त समाज प्रबोधनाचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ एप्रिल-**

सुयश विद्यालय, बार्शी येथे महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती अलका जगताप, उपमुख्याध्यापक येवले, संस्थापक नलवडे तसेच संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मुख्याध्यापिका श्रीमती अलका जगताप यांनीही महात्मा फुले यांच्या सामाजिक समतेच्या विचारांची माहिती देत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भाषणे, कविता सादरीकरण व घोषवाक्यांच्या माध्यमातून महात्मा फुले यांना अभिवादन केले.



## यश-अपयशाचा विचार न करता सातत्याने काम करत रहा

### सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये चित्रकार सचिन खरात यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

यश-अपयशाचा विचार न करता सातत्याने काम करत राहा. प्रामाणिकपणे काम केले तर पैसा आणि यश आपोआप तुमच्या मागे येते, असा प्रेरणादायी संदेश चित्रकार सचिन खरात यांनी विद्यार्थ्यांना दिला.

एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव (सोलापूर) येथे विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला रंगांचा उत्सव प्रतिभेशी संवाद! हा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी खरात यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या जीवनप्रवासातील संघर्ष आणि चित्रकलेतील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.

अजिंठा-वेरूळ शैलीवर आधारित पहिले चित्र काढल्यानंतर मिळालेल्या कौतुकामुळे चित्रकलेबद्दल आवड निर्माण झाली, असे त्यांनी सांगितले. सोलापुरात चित्र काढण्याचे शिक्षण घेतले, तर मुंबईत चित्र विकण्याची कला शिकली, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रयत्नशील राहण्याचा सल्ला दिला.

यावेळी त्यांनी प्रसिद्ध चित्रकार राजा रवि वर्मा यांच्या चित्रांची किंमत आज कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे उदाहरण देत भारतीय कलेचे महत्त्व अधोरेखित केले. कलाकार कधीही उपाशी राहत नाही, कला माणसाला जगण्याची दिशा देते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सचिन खरात यांची मुलाखत घेतली. साकेत कांबळे, प्रांजल शिंदे आणि सिद्धी कुरुंद या विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरांद्वारे संवाद साधला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून मोहिनी राऊत-नवले यांनी काम पाहिले.

## प्रज्ञाशोध परीक्षेत विश्वगुरु लोहार यांचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा बोरोटी (खु) येथील विद्यार्थी विश्वगुरु गोपाळ लोहार यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परिक्षेत उत्तम अंक संपादन करून यश मिळविला आहे. या परीक्षेत बोरोटी (खु.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेचा विद्यार्थी विश्वगुरु गोपाळ लोहार याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्याच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक राजश्री तांबे,सहशिक्षक शरणप्पा फुलारी, विषय शिक्षक अनंत बांगर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांना शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धाराम बिराजदार, उपाध्यक्ष चिदानंद शिंगे, राजू हालोळी यांनी त्यांचे अभिनंदन केले.




## पंप सुरू झाले, पण दर कमी नाही; रिक्षाचालकांचा लढा तीव्र होणार : रियाज सय्यद

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने १६० व्या रिक्षा स्टॉपचे उद्घाटन संपन्न झाले. विजापूर रोड येथील इंदिरा रिक्षा स्टॉपचे उद्घाटन महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद आणि स्वीकृत नगरसेविका वृषाली चालुक्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सय्यद यांनी सांगितले की, एलपीजी इंधनाची कमतरता व दरवाढ यामुळे रिक्षा चालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून अनेकांना आपली वाहने बंद ठेवावी लागत होती. या पार्श्वभूमीवर महासंघाने सोलापूरमधील सर्व संघटनांना एकत्र आणून सोलापूर रिक्षा संघटना कृती समिती स्थापन केली. या कृती समितीच्या माध्यमातून माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली पालकमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांत एलपीजी पंप सुरू करण्यात आले. मात्र अद्याप दर कमी करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रिक्षा चालकांना मोठ्या आंदोलनासाठी सज्ज राहावे लागणार असून महासंघ प्रत्येक लढ्यात चालकांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी महासंघाचे महासचिव प्रदीप शिंगे, अशोक बनसोडे, शंकर राऊत, अप्पू सुतार, मनोहर खांडेकर, स्टॉप अध्यक्ष अजरोद्दीन शेख, सिद्धराम पुजारी, नितीन ननवरे, चंद्रकांत मेटकरी उपस्थित होते.

## उमरड येथे समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.११ एप्रिल-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आयोजित समाधान शिबिर उमरड (ता. करमाळा) येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरास लोकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. प्रशासनाला थेट जनतेच्या दारापर्यंत जाता यावे यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. उमरड मंडळ येथे आयोजित या शिबिरामध्ये अनेक लोकांनी आपली प्रशासकीय कामे एकाच छताखाली पूर्ण करून घेतली. या शिबिराचे उद्घाटन तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आदिनाथ कारखान्याचे माजी चेअरमन वामनराव बदे, आदिनाथ कारखान्याचे संचालक राजाभाऊ कदम, मकाई कारखान्याचे संचालक बापूराव चोरमले, उमरडचे सरपंच प्रमोद बदे, अंजनडोह अरुण शेळके, सरपंच संदिप मारकड उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विशेष सहाय्य योजनेअंतर्गत मंजूर योजनांचे प्रमाणपत्र, व बेबी किटचे लाभार्थ्यांना वाटण्यात आले.

आदिनाथ कारखान्याचे संचालक राजभाऊ कदम यांनी हे शिबिर सर्वसामान्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे सांगितले आदिनाथचे संचालक वामनराव बदे यांनी उमरड मंडळामध्ये शिबिराचे आयोजन केल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानले. कार्यक्रमाचे निवेदन प्राध्यापक नंदकिशोर वलटे यांनी केले.



### शिबिरातील सहभागी विभाग व लाभार्थी संख्या-

आरोग्य विभाग ११६,कृषी ६३ ,भूमि अभिलेख ११ ,गॅस विभाग २५, पुरवठा विभाग १७०, सेतू विभाग ५० ,पंचायत समिती व जिल्हा परिषद विभाग ६२, उमरड महसूल मंडळ २४९ ,आधार कार्ड दुरुस्ती विभाग ६० ,एनसीएमसी कार्ड ५२, पशुसंवर्धन विभाग ६३

छत्रपती शिवाजी महाराज महाराज अभियान अंतर्गत आयोजित समाधान शिबिरात आज उमरड मंडळामध्ये अनेक लोकांनी सहभाग घ्यावा प्रशासनाचे विविध विभाग आज या ठिकाणी उपस्थित असून नागरिकांना एकाच छताखाली सर्व योजनांचा लाभ घेता यावा व प्रशासनाला थेट जनतेच्या दारापर्यंत नेणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला जात आहे लोकांनी समाधान शिबिरात सहभागी होऊन आपली प्रशासकीय कामे पूर्ण करून घ्यावीत.

**- शिल्पा ठोकडे**
(तहसीलदार करमाळा)

## चार वर्षाच्या बाळाला सांभाळत केडगावची तेजल बोराडे पोलिस दलात भरती

**जेऊर, दि. ११ एप्रिल-**



विवाहनंतर चार वर्षाच्या मुलाबरोबरच कुटुंबाची जबाबदारी पार पाडत केडगाव (ता. करमाळा) येथील तेजल बोराडे यांनी सोलापूर ग्रामीण पोलिस दलात स्थान मिळवले असून त्यांच्या जिद्द चिकाटीसह त्यांचा संघर्षमय प्रवास इतरांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरत आहे. उमरड (ता.करमाळा) येथील तेजल घनवट यांचे पोलिस होण्याचे स्वप्न शालेय जीवनापासून होतं. जुनियर कॉलेजला असताना एनसीसीमधील मुलींना पाहिल्यानंतर आपल्याही अंगावर खाकी वर्दी असावी असं त्यांना वाटायचं वडिलांची परिस्थिती बेताची असल्याने बारावी शिक्षण झाल्यानंतर त्यांचा शेजारील असलेल्या केडगाव या गावातील महसूल सेवक असलेल्या सुनील बोराडे यांच्याशी विवाह झाला. विवाह नंतर दोघांचा सुखी संसार सुरू झाला. त्यांना एक मुलगा झाला परंतु यांनी पाहिलेलं स्वप्न त्यांना गप बसू देत नव्हतं आपल्या पती जवळ त्यांनी ही गोष्ट बोलून दाखवली त्यांनी तिला पाठिंबा दिला. पतीचा खंबीर पाठिंबा मिळाल्यानंतर नव्या जोमाने तेजलने अभ्यास केला परंतु मैदानी चाचणीत आपण कमी तर पडणार नाही ना अशी शंका होती त्यानंतर पतीसह त्यांनी एक वर्षापूर्वी जेऊरवाडी येथील योद्धा करिअर ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. परंतु पूर्ण वेळ त्यांना तिथेही राहायला जमत नव्हतं या काळात त्यांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागले कुटुंबाची जबाबदारी तर होतीच पण राजवीर नावाच्या छोट्या मुलाची ही जबाबदारी त्यांच्यावर होती तेजल यांना सासू-सासरे नाहीत त्यामुळे आई-वडिलांनी मुलाला सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारली.

# जिल्ह्यातील ९ ग्रामपंचायतींना १.१० कोटींचा निधी

## ●मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतून मदत ●ग्रामविकासाला मिळणार आणखीन गती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

ग्रामीण भागातील प्रशासन सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने सोलापूर जिल्ह्यातील ९ ग्रामपंचायतींना कार्यालय बांधकामासाठी तब्बल १ कोटी १० लाख ६८ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे.



बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना अंतर्गत राज्यातील एकूण ५८ ग्रामपंचायतींसाठी ११०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यात सोलापूर जिल्ह्यातील ९ ग्रामपंचायतींचाही समावेश आहे. राज्याच्या २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात ही तरतूद करण्यात आली आहे. २७ मार्च रोजी हा निधी जिल्हा परिषदांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला. यानिमित्ताने ग्राम विकासाला आणखीन गती मिळण्यास मदत होईल.ग्रामपंचायत कार्यालय बांधणीसाठीचा निधी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाला आहे.

जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीममध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने निधी प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यास विलंब झाला, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विकासाला चालना देणारा हा निर्णय आहे. ज्या ग्रामपंचायतींकडे अद्याप स्वतःचे कार्यालय नाही, त्यांनाही लवकरच निधी मिळावा यासाठी प्रयत्न सुरु आहे, असे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजित पवार यांनी सांगितले.

### ग्रामपंचायतनिहाय मंजूर निधी

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडकबाळ (८.७५ लाख), हत्तुर (३.०७ लाख), उत्तर सोलापूरमधील वांगी व दिंडूर (४.७५ लाख), अक्कलकोट तालुक्यातील बसलेगाव (९ लाख), बणजगोळ (८ लाख), बोरगाव (५ लाख), काझीकणबस (५ लाख), पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली (५ लाख).

## महत्वाचे...



### विश्व हिंदू परिषद सामाजिक समरसता आयामच्या वतीने म.फुले जयंती साजरी

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

विश्व हिंदू परिषद, समरसता आयाम तर्फे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती साजरी करण्यात आली. सोलापूर शहरातील सुपर मार्केट येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे, जिल्हाध्यक्ष विष्णु मोंढे, उपाध्यक्ष केदार पाटील, विभाग मंत्री विजयकुमार पिसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्त्रीशिक्षण आणि सामाजिक विषमते विरुध्द महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेल्या कार्याचे स्मरण करण्यात आले. याप्रसंगी विभाग सह मंत्री संजयकुमार जमादार, प्रांत धर्माचार्य सह संपर्क प्रमुख नागनाथ अण्णा बोंगरगे, अमित सारोळकर, चन्नबसवेश्वर सोलापुरे, समरसता आयाम प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी, राजाभाऊ माने, प्रवीण कांबळे आदी उपस्थित होते.



### हरिभाई देवकरण प्रशालेत महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

हरिभाई देवकरण प्रशालेत महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी करण्यात आली. पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे, उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्याचा आढावा व गोरगरिबांसाठी केलेले कार्य तर मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांनी महात्मा फुले यांनी स्त्रियांविषयी दिलेले योगदान याविषयीची माहिती दिली. मल्लिकार्जून घवाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.



### पी.बी. ग्रुपच्यावतीने महात्मा फुले यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पी.बी ग्रुपचे माजी अध्यक्ष धनंजय कापुरे व नूतन अध्यक्ष प्रवीण शिंदे यांच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, भारत बाबरे, चंद्रकांत सोनवणे, संजय इंगळे, भैय्या कापुरे, अमित माने, सोशल बँकेचे कर्मचारी मोबीन पठाण, रौफ शेख, सुलतान पटेल. सुरज वाघमोडे, धोंडीबा कापुरे, विकी माळाळे, गौतम शिंदे, प्रसन्न तळभंडारे, दैवशील गायकवाड, आदर्श कापुरे, प्रतीक चंदनशिवे उपस्थित होते.



# बालाजी अमाईन्सला राज्य शासनाचा प्रतिष्ठित औद्योगिक सुरक्षा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

बालाजी अमाईन्स लिमिटेडला नारायण मेघाजी लोखंडे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासनामार्फत देण्यात येतो. सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते जिओ वर्ल्ड सेंटर येथे ११ एप्रिल २०२६ रोजी आयोजित प्रतिष्ठित समारंभात प्रदान करण्यात आला.

कंपनीच्या वतीने जनरल मॅनेजर आर. एस. शास्त्री, सहा. व्यवस्थापक एच. आर.- एम. आर. सावंत व सेफ्टी ऑफिसर प्रशांत तारमोडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. हा पुरस्कार राज्यातील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उद्योगांना दिला जातो. औद्योगिक सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन, कार्यस्थळी अपघात टाळणे आणि कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढविणे हा या पुरस्काराचा मुख्य उद्देश आहे. १९८८ साली स्थापन झालेल्या बालाजी अमाईन्स लिमिटेडने धाराशिव जिल्ह्यातील तामलवाडी येथे एकाच उत्पादन प्रकल्पापासून आपल्या कार्याची सुरुवात केली.


स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आधारे अलिफॅटिक अमाइन्सचे उत्पादन करून कंपनीने गेल्या तीन दशकांत जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह उत्पादक म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. सध्या कंपनी महाराष्ट्र व तेलंगणा राज्यांमध्ये चार उत्पादन युनिट्स कार्यरत असून, ५० हून अधिक देशांमध्ये निर्यात करते. तसेच देशात प्रथमच अनेक आयात-पर्यायी उत्पादने विकसित करण्याचा मान कंपनीला मिळाला आहे. याबाबत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी म्हणाले, आम्ही सुरक्षेला खूप महत्त्व देतो आणि पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा यांवर सातत्याने भर देतो. आमची बांधिलकी केवळ कर्मचाऱ्यांपुरती मर्यादित नसून समाजापर्यंत विस्तारलेली आहे. हा पुरस्कार आमच्या सुरक्षा उपक्रमांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल आहे.

### डफरीन चौकातील झपुर्झा गॅलरीत

# बुधवारपासून 'शुभकामना' पेन्सिल आर्ट चित्रांचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

कर्नाटकातील कलबुर्गी (गुलबर्गा) येथे वास्तव्यास असलेले चित्रकार महेश सदाफुले यांच्या 'शुभकामना' या पेन्सिल आर्ट चित्रांच्या प्रदर्शनाचे आयोजन येथील डफरीन चौकातील पु. ना. गाडगीळ अँड सन्सच्या झपुर्झा आर्ट गॅलरीत दि.१५ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले, अशी माहिती संतोष धाटेगाव यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यामध्ये ४५ कलाकृतींचा समावेश आहे. बुधवार, दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता या प्रदर्शनाचे माजी प्राचार्य सुदर्शन देवरकोंडा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी प्रा.दीपक देशपांडे, शेरशाह डोंगरी, शशिकांत सदाफुले, प्राचार्य गोपाळराव डोंगे, प्रा.धनंजय टाकळीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

गुरुवार दि. १६ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता चित्रकार नितीन खिलारे यांचे प्रात्यक्षिक होणार आहे. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी सोलापूर जिल्हा शैक्षणिक कला शिक्षक संघाचे सहकार्य लाभत आहे. या प्रदर्शनास सोलापुरकरांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन चित्रकार महेश सदाफुले, पु.ना.गाडगीळ अँड सन्सचे जितेंद्र जोशी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस शेरशाह डोंगरी, शांतप्पा काळे आदी उपस्थित होते.

# मार्कंडेय रूग्णालय कर्मचारी नागरी पतसंस्थेच्या चेअरमनपदी पुंजाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रूग्णालय कर्मचारी नागरी पतसंस्था मर्यादित सोलापूर या संस्थेच्या चेअरमनपदी राजू पुंजाल, तर उपाध्यक्षपदी निशांत संगा यांची तर मानद सचिव म्हणून श्रीनिवास बुर्ला यांची एकमताने निवड करण्यात आली. उपनिबंधक कार्यालयात अधिकारी आर एन ढोणे यांच्या अध्यक्षतेखाली प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.



श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रूग्णालय कर्मचारी नागरी पतसंस्था मर्यादित सोलापूर या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली होती ही निवडणूक बिनविरोध झाली. यावेळी संचालक म्हणून राजू पुंजाल, राजीव येदूर, प्रभाकर सग्गम, निशांत संगा, राघवेंद्र ऊर्फ राकेश पुंजाल, दिगंबर इप्पलपल्ली, गीता मादगुंडी, सविता शंकूर, विकास कांबळे, उज्ज्वला लिंबोळे, चंद्रकांत कोनापुरे हे निवडून आले होते.

आज झालेल्या अध्यक्ष व पदाधिकारी निवडीची प्रक्रिया उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी ढोणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली निवडीनंतर अध्यक्ष राजू पुंजाल व्हा चेअरमन निशांत संगा मानद सचिव श्रीनिवास बुर्ला यांचा सत्कार करण्यात आला.

या निवडीनंतर रूग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, चेअरमन डॉ. माणिक गुर्रम व्हाइस चेअरमन रमेश विडप आदी संचालकांनी नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.



# रेल्वे रुग्णालयात औषधनिर्मात्यांसाठी 'सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १० एप्रिल २०२६ रोजी डॉ. कोटणीस स्मृती रेल्वे रुग्णालयात औषधनिर्मात्यांसाठी विभागीय स्तरावरील 'सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण' कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना औषधनिर्मात्यांचे सक्षमीकरण: सुरक्षित औषध वितरण, स्मार्ट तंत्रज्ञान आणि रुग्णांचे उत्तम आरोग्य परिणाम अशी होती. या संकल्पनेद्वारे आधुनिक आरोग्यसेवा प्रणालीमध्ये औषधनिर्मात्यांची बदलती भूमिका अधोरेखित करण्यात आली; तसेच रुग्णांची सुरक्षा, तंत्रज्ञानाचा वापर आणि आरोग्यसेवेच्या वितरणातील सुधारणा या बाबींवर विशेष भर देण्यात आला.

मध्य रेल्वेच्या मुंबई, नागपूर, पुणे, भुसावळ आणि सोलापूर या सर्व विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी आणि औषध निर्मात्यांनी यात सहभाग घेतला. प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ.विद्या निरंजन, वैद्यकीय संचालक डॉ.ममता शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्य आरोग्य संचालक डॉ.सुषमा माटे, अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. कृष्णा चंडक उपस्थित होते. वैद्यकीय आणि औषधनिर्माण क्षेत्रातील विविध विषयांवर या कार्यक्रमात अनेक ज्ञानवर्धक व्याख्याने देण्यात आली.

# कर्नाटकच्या दिशेने होणारी गो-तस्करी रोखली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

श्रीराम सेना व प्राणीन फाउंडेशन सोलापूरच्या गोरक्षकांना सोलापूरहून कर्नाटकच्या दिशेने बेकायदेशीररित्या देशी गोवंशांची तस्करी होणार आहे, अशी माहिती मिळाली. त्यानुसार गोरक्षकांनी रात्री सापळा रचला असता पहाटे ४ वाजताच्या दरम्यान एक अशोक लेलँड कंपनीचे पॅक बॉडी दहा चाकी कंटेनर संशयितरित्या वाहतूक करीत असतानाचे गोरक्षकांच्या निदर्शनास आले.

गोरक्षकांनी सदर वाहन केगाव येथील पुलावरून जात असताना समर्थ चायनीज सेंटर या दुकानासमोर कंटेनर चालकास सांगून सदर वाहन रस्त्याच्या कडेला थांबविले असता. सदर वाहन थांबताच वाहनातील ड्रायव्हर, क्लिनर व इतर दोन इसमांनी पळ काढण्यास सुरुवात केली. तेव्हा गोरक्षकांनी समयसूचकता दाखवत चौघांना ताब्यात घेऊन सदरील वाहन चालकाची चौकशी केली.

सदर कंटेनरमध्ये ३० बैल असून ते विजापूर येथे कत्तलीसाठी घेऊन जात असल्याचे त्या चौघांकडून सांगण्यात आले. दरम्यान, फौजदार चावडी पोलिस ठाण्याला याबाबतची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून घटनास्थळी धाव घेत वाहनांची पाहणी केली असता देशी खिलार जातीच्या बैलांचे तोंड हे वाहनाच्या वरील बाजूस असलेल्या लोखंडी अँगलला बांधल्याचे दिसून आले. याप्रकरणी आरिफ मर्दनसाब



तहसीलदार, रघु शिवन्ना जाधव, मुबारक नन्नूसाब बेपारी, मलिक रिहान बादशाहसाब यांना ताब्यात घेण्यात आले. कंटेनरमधील ३० खिलार जातीचे बैल हे पुढील चारा पाण्याच्या देखभालीसाठी अहिंसा गोशाळा येथे सुखरूपरीत्या जमा करण्यात आले.

सदर कार्यवाही यशस्वी करण्याकरिता श्रीराम सेनेचे जिल्हाध्यक्ष शितल परदेशी, श्रीराम सेना जिल्हा गोरक्षा प्रमुख पवनकुमार कोमटी, प्राणिन फाउंडेशनचे वरिष्ठ अनिकेत गोरट्याल, गोरक्षक प्रशांत परदेशी, सौरभ कुलकर्णी, राजन सिरसिल्ला, वीरु मंचाल, अमोल चौगुले आदींनी परिश्रम घेतले.

### आरटीई शुल्क घोटाळ्याविरोधात

# विद्यार्थ्यांच्या वेशात करण्यात आले आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत काही शाळांकडून शासनासह पालकांकडूनही शुल्क आकारले जात असल्याचा गंभीर आरोप करत प्रहार संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेत अनोखे आंदोलन छेडण्यात आले. विशेष म्हणजे कार्यकर्त्यांनी विद्यार्थी वेश परिधान करून हे आंदोलन केले. शाळांमधील प्रत्यक्ष स्थिती जाणून घेण्यासाठी यु-डायस किंवा विद्यार्थी पोर्टलवर उपलब्ध पालकांच्या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा. केवळ ५ ते १० पालकांशी संवाद साधल्यास संबंधित शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काची वस्तुस्थिती समोर येईल, असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. तसेच, डमी पालक पाठवून प्रवेश प्रक्रियेची पडताळणी करण्याची मागणीही करण्यात आली. या प्रकरणात उत्तर सोलापूर तालुक्यातील राजश्री शाहू महाराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय (कोंडी), सनराईज पब्लिक स्कूल (बीबीदारफळ), जिजाऊ ज्ञान मंदिर (कोंडी), प्रगती पब्लिक स्कूल (माढा), प्रगती विद्यामंदिर (कुडूवाडी), माळशिरस तालुक्यातील न्यू डायमंड इंग्लिश मीडियम स्कूल (श्रीपूर), शिरनांदगी गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल (शिरनांदगी), तसेच मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यातील शिवरत्न पब्लिक स्कूल (गादेगाव) आदी शाळांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# पहिल्या दिवशी ४२९ शाळांची पटपडताळणी; ९६.५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

जल्हा परिषद सोलापूरच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत आज जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये शाळांची प्रत्यक्ष पटपडताळणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेच्या पहिल्या दिवशी पहिल्या दिवशी ४२९ शाळांची पटपडताळणी करण्यात आली. तीत ९६.५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंद असल्याचे दिसून आले.

या शाळांमध्ये एकूण ७३ हजार १४१ पटसंख्या नोंदविण्यात आली असून, त्यापैकी ७० हजार ५८० विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित तर २ हजार ५६१ विद्यार्थी अनुपस्थित असल्याचे आढळले. तालुकानिहाय पाहता माढा तालुक्यात सर्वाधिक ९९.४४ टक्के उपस्थिती नोंदली गेली. मोहोळ तालुकाही ९९.५३ टक्क्यांसह आघाडीवर राहिला. बार्शी, माळिशरस, मंगळवेढा या तालुक्यांनीही ९८ टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थिती नोंदवत चांगली कामगिरी केली. करमाळा, सांगोला आणि पंढरपूर या तालुक्यांमध्येही उपस्थितीचा टक्का ९७ च्या पुढे राहिला. अक्कलकोट (९५.१७ टक्के), उत्तर सोलापूर (९६.८४ टक्के) येथे कमी



उपस्थिती दिसून आली. सोलापूर महापालिका क्षेत्रात केवळ ९२.४७ टक्के उपस्थिती नोंदली गेली असून, हे प्रमाण जिल्ह्यात सर्वात कमी आहे. शहरी भागात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद समाधानकारक असल्याचे दिसून येत असताना, काही भागात अजूनही सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे. शंभर टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शिक्षक, पालक आणि प्रशासन यांच्यात अधिक समन्वय वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शिक्षक समायोजन प्रक्रिया पदोन्नतीनंतर करण्याची प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल :** शिक्षक समायोजन प्रक्रिया शिक्षकांची पदोन्नती करूनच करण्यात यावी. निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणी प्रस्ताव गेल्या २ वर्षांपासून प्रलंबित आहे, ते निकाली काढावेत. तसेच २४ वर्ष सेवा झाली त्यांना सरसकट निवड श्रेणी देण्याचा निर्णय घ्यावा, अशा मागण्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अरूण सोळुंके यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. समायोजन प्रक्रिया शासन निर्णयाप्रमाणे राबविण्यात यावी. जिल्ह्यात व तालुक्यांत एकच नियम असावा. समायोजनापूर्वी समायोजन निकष नियमावलीचे पत्र शिक्षण विभागाने काढावे. ज्या डीसीपीएस शिक्षकांचे जी. पी. एफ खाती निघाली आहेत. त्यांची एनपीएस मध्ये जमा झालेली रक्कम शासनाच्या रकमेसह जी. पी. एफ नंबरवर वर्ग करावी. शिक्षण विभागातील सर्व प्रकारच्या पदोन्नत्या लवकरात लवकर कराव्यात व पदोन्नत्यासाठी टेट २०२७ पर्यंत बंधनकारक करू नये. बीएलओसारख्या अशैक्षणिक कामातून शिक्षकांची सुटका करावी. या कामामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक फार मोठे नुकसान होत आहे. जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मागील चार वर्षांपासून प्रलंबित आहेत. ते लवकर वितरित करावेत. शासन निर्णयानुसार काही शिक्षकांचे सेवा जोडणी प्रकरणे जि. प. लातूरकडे प्रलंबित आहेत. सदरील प्रस्ताव निकाली काढावेत. सी. आर. नुसार न्यायालय निकालाप्रमाणे वेतनवाढी प्रकरणे तात्काळ निकाली काढावित. निलंबित शिक्षकांची प्रकरणे निकाली काढून त्यांना पदस्थापना द्यावी. सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांचे मंजुरी पत्र सेवानिवृत्ती दिवशीच जि. प. कडून देण्यात यावे, यासह इतर मागण्यांचे निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरूण सोळुंके, सरचिटणीस चंद्रकांत भोजने, संपर्क प्रमुख किशन बिरादार, संजय सूर्यवंशी यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहे.



## विविध वृत्त...

### चाटेवाडी येथे मातोश्री पाणंद रस्त्याच्या कामास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट :** जळकोट तालुक्यातील चाटेवाडी येथे मातोश्री पाणंद रस्त्याचा शुभारंभ तहसीलदार राजेश लांडगे व सभापती प्रतिनिधी संभाजी कोसंबे तसेच उपसभापती माधव वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बायनाबाई संदिपान कांबळे या उपस्थित होत्या तर यावेळी उपसरपंच राजीव गिते, विश्वनाथ चाटे, सुधाकर बुक्के सर्व ग्रामपंचायत सदस्य, रोजगार सेवक, प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते. अनेक दिवसापासून हा रस्ता व्हावा, अशी मागणी सभापती, तहसीलदारांची उपस्थिती परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची गैरसोय दूर होणार शेतकऱ्यांची होती ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मातोश्री पाणंद रस्ता योजने अंतर्गत हा रस्ता मंजूर करण्यात आला होता. शेतकऱ्यांच्या शेतातील मालवाहतुकीसाठी शेत रस्ता हा महत्त्वाचा आहे. या रस्त्यामुळे आता शेकडो शेतकऱ्यांची सोय होणार आहे महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी सुरू केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या अंतर्गत शेतापर्यंत जाण्यासाठी मजबूत रस्ते, मुरुम रस्ते आणि पाणंद रस्ते तयार केले जातात, ज्यामुळे शेतमाल वाहतूक आणि शेतीकामासाठी यंत्रे ने-आण करणे सोपे होते. पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी रस्ते नसल्यामुळे होणारी गैरसोय दूर करणे आणि शेतमालाची वाहतूक सुरळीत करणे हा उद्देश या योजनेचा आहे. रस्ते मजबुतीकरणासाठी मुरुम, दगड आणि माती मोफत उपलब्ध करून दिली जाते तसेच तांत्रिक मदतही मिळते.

### बनावट ऑईल विकणाऱ्यावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** नामांकित कंपनीचे भासवून बनावट ऑईल विकणाऱ्या लातुरातील एका ऑटोमोबाईल चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहराच्या विवेकानंद चौकातील गार्गी ऑटोमोबाईलचे मालक सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड (रा. निगुडगे नगर, रत्नेश्वर कॉलनी, लातूर) हे एका नामांकित कंपनीचे ऑईल असल्याचे भासवत हुबेहुब तशाच बाटल्यांतून ते ऑईल वाहनधारकांना विक्री करीत होते. यामुळे वाहनधारकांचे नुकसान होत होते. ही बाब फिर्यादी दीपक बाबूलाल पटेल (वय ४९, नेर्टिका कन्सल्टिंग इंडिया प्रा. लि.) यांच्या ध्यानात आली. तत्काळ त्यांनी लातूर गाठले. खातरजमा केल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड याच्याविरोधात तक्रार दिली. त्यावरून विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात हेड कॉन्स्टेबल लाव्हरे करीत आ-हेत.

### जयंती समिती अध्यक्षपदी धनुरे

**तभा वृत्तसेवा**

**देवणी :** महात्मा बसवेश्वर जयंती समिती अध्यक्षपदी अटल धनुरे यांची तर सचिवपदी दीपक मळभगे यांची निवड करण्यात आली. देवणी येथील बसवप्रेमी भक्तांची बैठक घेण्यात येऊन जयंती समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी अटल धनुरे, उपाध्यक्ष सुमित रोटे, विशाल अंबुलगे, प्रशांत बळते, सचिव दीपक मळभगे, कोषाध्यक्ष परमेश्वर जी-वने, रॅलीप्रमुख सागर मसगले, सूरज अंबुलगे, शंतनू बिरादार, ईश्वर पाटील, मिरवणूक प्रमुख बाबुराव लांडगे, गणेश बोंद्रे, मनोज पाटील, रेवण स्वामी मळभगे, बसवराज बिरादार, रक्तदान शिबिरप्रमुख सोमनाथ लुल्ले, नीलेश लांडगे, सचिन डोंगरे, सदस्य म्हणून प्रदीप हरनाळे, आकाश पाटील, बसवराज हरनाळे, चेतन मिटकरी, माणिक मानकरी, राहुल बिरादार, गुंडप्पा कंटे, उदय बिरादार, भीमाशंकर पाटील, ओमकार कोरे, राहुल बिराजदार, अमोल जीवने, अभिषेक करकेली यांची निवड करण्यात आली. यावेळी विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

## भीक मागणाऱ्यांची संख्या शून्यावर आणण्याकरिता सर्वतोपरी उपाय योजना राबवा : महेश ढवळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल :** पुरोगामी विचारधारेने प्रेरित असणाऱ्या आपल्या महाराष्ट्र राज्यातील भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या शून्यावर आणण्याकरिता राज्य शासनाकडून तात्काळ सर्वतोपरी उपाय योजना राबविण्यात याव्यात असे निर्देश राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिले आहेत.



राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ च्या कलम १६ अन्वये राज्य अन्न आयोगास अन्नसुरक्षा योजनांच्या अंमलबजावणीचे, तक्रारींचे परीक्षण करून राज्य शासनास शिफारसी करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. फोरम फॉर इनोव्हेशन अँड ऍप्लिकेशन, फिन ऍप असो. ने राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाविरुद्ध असा मुद्दा उपस्थित केला आहे की, राज्यात अन्नधान्य उत्पादन मुबलक आहे. शासनाकडून विविध कल्याणकारी योजना अस्तित्वात असूनही सार्वजनिक ठिकाणी भीक मागणाऱ्यांची संख्या वाढत आहे. ज्यामुळे राज्याची प्रतिमा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यात भिकवृत्ती प्रतिबंधक कायदा लागू असून भीक मागणे व भीक देणे हे दंडनीय कृत्य घोषित आहे. राज्य शासनाने या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी भिक्षेकरीगृहे, बालसंरक्षण संस्था व पुनर्वसन योजना कार्यान्वित केलेल्या आहेत.

राज्य अन्न आयोगाकडे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने दि. २० जून २०२५ रोजी सदर प्रकरणी प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा शोध घेण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीत अन्न नागरी पउरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, नगर विकास विभाग, सामाजिकण्यास विभाग या सर्व विभागांच्या शासकीय प्रतिनिधींचा समावेश होता. या समितीकडून मिळालेल्या अहवालानुसार राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिले आहेत. जिल्हास्तरीय जबाबदारी निश्चित करणे, कार्यकारी अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवणे, वंचित लाभार्थी शोध मोहीम, जनजागृती मोहीम राबविनयेत यावेत असे निर्देश दिले आहेत. अन्नासाठी भीक मागणाऱ्या व्यक्तींची संख्या शून्यावर आणणेही मुख्य उद्देश्य समोर तेहवून विशेषकृती आराखडा तयार करावा. आंतरराज्य भीक मागणारी टोळी मुंबई, पउणे यासारख्या मोठ्या शहरात जास्तीच्या दिसून येतात. अशा भीक मागणाऱ्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून ते ज्या राज्यातील आहेत, त्यांना त्या राज्यात पाठवून देण्यात यावेत. जिल्हास्तरीय अन्नसुरक्षा व पुनर्वसन समिती स्थापन करण्यात यावी. भिकवृत्ती ही केवळ कायदा व सुव्यवस्थेची बाब नसून ती अन्न सुरक्षा, मानवी सन्मान व सामाजिक न्यायाशी निगडित आहे. राज्य शासनाच्या धोरणात्मक प्रयत्नांना बाधा न आणता, कार्यकारी स्तरावरील त्रुटी दूर करून महाराष्ट्र राज्य 'भिकमुक्त, भूकमुक्त' करण्यासाठी तातडीने प्रभावी उपाय योजना राबविण्याकरिता राज्य शासनामार्फत संबंधित विभागामध्ये समन्वयाने एक संयुक्तिक शासन निर्णय निर्गमित करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे महेश ढवळे यांनी सांगितले.

### लातूर जिल्हा रुग्णालयासाठी २५.७० कोटींचा निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल :** गेल्या काही वर्षांपासून लातूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या उभारणीचा प्रश्न प्रलंबीत होता. शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १०० खाटांच्या नवीन जिल्हा रुग्णाल इमारत (विद्युतीकरणासह) बांधकामासाठी २५ कोटी ७० लाख ६ हजार ७२५ रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे प्रलंबीत जिल्हा रुग्णालयाची उभारणी लवकरच सुरु होवून सामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लातूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या उभारणीचा प्रश्न पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रयत्नामुळे मार्गी लागला आहे. या रुग्णालयासाठी आवश्यक जागेच्या मोबदल्यासाठी ३ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीला पुरवणी मागण्यांमध्ये मंजुरी देण्यात आली होती. सन २०१३ मध्ये जिल्हा सामान्य जिल्हा रुग्णालय, लातूर रुग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. १०० खाटांचे हे रुग्णालय उभारण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातून ३१ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी ही प्राप्त झाला आहे.

### राष्ट्रीय स्तरावरील जीपॅट-२०२६ परीक्षेत दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचे ८ विद्यार्थी उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल :** भारत सरकारच्या नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस (NBEMS) द्वारे राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आलेल्या जीपॅट-२०२६ (Graduate Pharmacy Aptitude Test-2026) परीक्षेत लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर महाविद्यालयातील बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही यशाची परंपरा कायम राखत एकूण ८ विद्यार्थ्यांनी जीपॅट-२०२६ परीक्षेत यश संपादन केले आहे.

जीपॅट परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत वार्षिक १ लाख ५० हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा यासाठी दयानंद शिक्षण संस्थेकडून ऑल इंडिया रँकच्या पहिल्या शंभर मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक प्रथम क्रमांका साठी ११ हजार रुपये, द्वितीय साठी ७ हजार रुपये, तृतीय साठी ५ हजार रुपये, तर इतर यशस्वी विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३ हजार रुपये देण्यात येते.

या परीक्षेत दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, लातूरच्या बी. फार्मसीत शिकत असलेल्या प्रीती पवार (गुण २२०), हनीफाबी पटेल (गुण २१३), शुभांगी कोकाटे (गुण २००), रोहिणी चापुले (गुण १९६), निकिता काळे (गुण १९५), शाश्वती दलाल (गुण १८८), मेघा गायकवाड (गुण १५६), ऋषिकेश कांबळे (गुण १५५) या विद्यार्थ्यांनी जीपॅट-२०२६ परीक्षेत उत्तम गुण मिळवून राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले.

या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. ललितभाई शहा व मा. रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे व मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, जीपॅट विभाग प्रमुख प्रा. प्रतिक चिंचोले, प्रा. सुषमा पांचाळ, प्रा. ओम पाटील, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### मराठवाड्यातील शिक्षणाची पंढरीमध्ये गुरु-शिष्याच्या नात्यांचा उत्सव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल :** लातूर शहरात गुरुजनांचा सन्मान करण्यासाठी एक भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री केशवराज माजी विद्यार्थी संघ व गुरुजन कृतज्ञता अमृत सोहळा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी बेळंबे लॉन्स, डी मार्ट समोर, अंबाजोगाई-नांदेड बायपास, लातूर येथे सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत पार पडणार आहे. या सोहळ्याचा उद्देश म्हणजे गुरुजनांनी दिलेल्या शिक्षण, संस्कार, राष्ट्रभक्ती आणि मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे. १९७४ ते २०१० या कालावधीत दहावी उत्तीर्ण झालेले माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, विद्यालयातील सर्व सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात येणार आहे.

गुरु-शिष्य नाते हे केवळ ज्ञानदानाचे औपचारिक संबंध नसून, ते जीवन घडवण्याचे, संस्कार रुजवण्याचे आणि अंधकारातून प्रकाशाकडे नेणारे एक पवित्र, अमर आणि भावनिक बंध आहे. प्राचीन भारतीय परंपरेत गुरूला ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वरापेक्षाही श्रेष्ठ मानले जाते. याचे सुंदर वर्णन संस्कृत सुभाषितात येते: **गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।। (गुरू ब्रह्मा आहे, गुरू विष्णू आहे, गुरू देव महेश्वर आहे. गुरू साक्षात परब्रह्म आहे, त्या श्री गुरुदेवांना नमस्कार.)** हाच भाव धरून श्री केशवराज माजी विद्यार्थी संघ, लातूर व गुरुजन कृतज्ञता अमृत सोहळा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने एक भावनिक आणि कृतज्ञतापूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दिनांक १२ एप्रिल रोजी सायंकाळी ५.०० ते १०.०० वाजेपर्यंत, बेळंबे लॉन्स, डी मार्ट समोर, अंबाजोगाई-नांदेड बायपास, लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात केशवराज विद्यालयात १९७४ ते २०१० या ३६ वर्षांच्या कालावधीत दहावी उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. या दीर्घ प्रवासात ज्या गुरुजनांनी विद्यार्थ्यांच्या हातात ज्ञानाची ज्योत दिली, संस्कारांची शिदोरी दिली, आयुष्याला दिशा दिली आणि चांगल्या नागरिक बनवले, त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

सर्व सन्माननीय सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा यथायोग्य गौरव होईल. कार्यक्रमाला लातूर शहरातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यामध्ये मा. आमदार, लोकप्रतिनिधी, न्यायव्यवस्थेतील उच्च पदाधिकारी, मंत्रालयातील सेक्रेटरी, व अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, अभियंते, शिक्षणतज्ज्ञ, कलाक्षेत्रातील व्यक्ती, क्रीडा क्षेत्रातील खेळाडू आणि समाजातील इतर सन्माननीय माजी विद्यार्थी यांचा समावेश असेल. जवळपास ५०० माजी विद्यार्थी या सोहळ्यात सहभागी होण्याची अपेक्षा संयोजन समितीला आहे. या सोहळ्यात गुरुजनांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि माजी विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील कृतज्ञतेचे अश्रू यांची साक्ष देण्याची संधी सर्वांना मिळणार आहे. गुरूने दिलेल्या ज्ञानाने आज जे विद्यार्थी समाजाच्या विविध क्षेत्रांत मोठे झाले आहेत, ते गुरुजनांच्या पावलांचे ऋण कधीही फिटू शकत नाही, याची प्रचिती या कार्यक्रमातून येईल.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर (टप्पा क्र. १) यशस्वी





**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**

**वलांडी, दि. ११ एप्रिल :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर (टप्पा क्र. १) मंडळ विभाग वलांडी येथे उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिराच्या माध्यमातून शासन आपल्या दारी हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.

या समाधान शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या लोकाभिमुख योजना व सेवा नागरिकांना थेट गावपातळीवर उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे व वगळणे, शेत रस्ता व पांदन रस्ता खुला करणे, मतदार यादीत नाव समाविष्ट व वगळणे, आरोग्य सेवा, ग्रामपंचायत व पंचायत समिती मार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा, आधार कार्ड दुरुस्ती, श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना आदींचा समावेश होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.संदीप कुलकर्णी उपजिल्हाधिकारी लातूर हे होते .

प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार देवणी मा. सोमनाथ वाडकर, नायब तहसीलदार मा. लहू कांबळे व मा. शेखर सुरडकर तसेच जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सभापती उपस्थित होते तसेच मोठ्या संख्येने नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमास तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते. या शिबिरात विविध विभागांचे १५ पेक्षा अधिक स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉलच्या माध्यमातून अनेक गरजू लाभार्थ्यांना विविध १९२५ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले तसेच विविध योजनांची माहिती देण्यात आली.

या समाधान शिबिराचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. शासनाच्या सेवा व योजना थेट गावपा-तळीवर उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे सामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यास मोठी मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी मा संदीप कुलकर्णी उपजिल्हाधिकारी लातूर यांनी उपस्थित नागरिकांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. सोमनाथ वाडकर यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तहसील कार्यालय देवणी येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

सदर कार्यक्रमास सर्व सहायक महसूल अधिकारी , मंडळ अधिकारी, महसूल सहायक, ग्राम महसूल अधिकारी शिपाई, महसूल सेवक व तालुक्यातील इतर कर्मचारी हे उपस्थित होते.

### देशात लोकसंख्या नियंत्रण कायदा करावा : डॉ. तोगडिया

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल :** समग्र हिंदू समृद्ध आणि सुरक्षेसाठी देशात हिंदू बहुमत कायम ठेवण्यासाठी देशात लोकसंख्या नियंत्रण कायदा करावा, असे मत आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण तोगडिया यांनी लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात शुक्रवारी सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने आयोजित कार्यकर्ता मेळाव्यासाठी डॉ. प्रवीण तोगडिया हे लातूर येथे आले होते.

तेव्हा त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पुढे बोलताना डॉ. तोगडिया म्हणाले, देशात हिंदूसाठी काही मुद्या-वर आम्ही जनजागृती करत आह-ेत. त्यामध्ये पहिल्यांदा मी हिंदू आहे. हिंदू एकता विचार आणि व्यवहार, लोकसंख्या नियंत्रण कायदा, बंगल-ादेशीना पिटाळून लावणे, तीन बच्चे सबसे अच्छे आणि साप्ताहिक हनुमान चालीसा, असे कार्यक्रम राबविले जाणार आहेत. या पत्रकार परिषदेला आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे राज्य अध्यक्ष जगन्नाथराव यादव, बजरंग दलाचे विभाग अध्यक्ष आकाश मसाने व इतर पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती होती.


### जाहिर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते कि, माझे पक्षकार **श्री. विजयकुमार तुकाराम बारबोले, रा. आखरवाई ता. जि. लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **सौ भाग्यश्री प्रताप सोळंके, रा. गजाजन हाऊसिंग सोसायटी, वाल्मिकी चौक, लातूर** यांची मालकीचा मौ. **आखरवाई** ता. जि. लातूर येथील जमीन गट नं **६६** पैकीचा याचा एन. ए झालेला नं- **२०१०/जेएमबी /लातूर/सीआर-९३६, दि-०७/१०/२०१०** अन्वये मे. सबडिव्हिजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा याचा ले-आउट नंबर **लतर/ आखरवाई/गट नं.६६ / लातूर /एनआरएल-९३६, दि-०९/०९/२०१०** मे. नगररचनाकर, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नं १२ पूर्ण, असून याची लांबी दक्षिण-उत्तर १२.५ मी फुट व रुंदी पूर्व-पश्चिम ९ मी. असून याचे एकूण क्षेत्रफळ ११२.५ चौ.मी (१२१०.५चौ.फु.) असून याची चतुःसीमा पुर्वेसः प्लॉट नंबर १३ पश्चिमेस : प्लॉट नंबर ११ दक्षिणेस :- ९ मी. रुंदीचा रस्ता उत्तरेस गट नंबर ६६ मधील जमीन.

येणे प्रमाणे वरील चतु : सिमेच्या आतील मिळकत खरेदी करणेचा लेखी करार केला असुन ठरावापोटी ईसारा रक्कम दिलेली आहे तसेच सदरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखिम असल्याची हमी विध्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे तरी सदर मिळकतीवर जर कोणाचा उजर, हक्कसंमध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीस, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लिज, लिन, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसांचे आत माझ्या खालील पत्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप आला नाही तर सदरील मिळकत हि निर्विवाद व निर्जोखिम समजुन माझे पक्षकार नोंदनिकृत खरेदीखत करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.
दिनांक ११/०४/२०२६
**तर्फे. ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे**
**नोटरी भारत सरकार. शाहु चौक, लातूर**
**मो. न. ९४२११९८६४९५**

**जाहिर प्रगटन देणार**
**विजयकुमार तुकाराम बारबोले**
**रा. आखरवाई ता.जि. लातूर**
**मो नं. ९७६३४६८९११**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# औशातील सात गावात पायलट प्रकल्पाची मुहुर्तमेढ

## टाटा मोटर्स फाउंडेशन, क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त पुढाकार

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ११ एप्रिल :** औसा मतदारसंघात ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी टाटा मोटर्स फाउंडेशन, क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक ग्रामविकास प्रकल्पांतर्गत सात ग्रामपंचायतींमध्ये पायलट प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पामध्ये आरोग्य, शिक्षण, शेती, पाणी व्यवस्थापन आणि कौशल्य विकास अशा विविध घटकांवर एकत्रितपणे काम केले जाणार आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली असून, गावनिहाय कुटुंब सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणा-तून प्रत्येक कुटुंबाच्या गरजा ओळखून पुढील तीन वर्षांसाठी सविस्तर नियोजन करण्यात येत आहे. या काळात शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रावर विशेष भर देत सर्वांगीण विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे.यासंदर्भात औसा पंचायत समितीत




शुक्रवारी बैठक पार पडली. या बैठकीस आमदार अभिमन्यू पवार, टाटा मोटर्स फाऊंडेशनचे शैलेश पाटील, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, सौ. शोभा अभिमन्यू पवार तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनामार्फत २०१७ पासून सुरू असलेला हा प्रकल्प सुरुवातीला पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात राबविण्यात आला होता. त्यानंतर राज्यातील १५ आकांक्षित तालुक्यांमध्ये त्याचा विस्तार करण्यात आला असून सध्या ८२ ग्रामपंचायतींमध्ये हा प्रकल्प सुरू आहे.

औसा तालुका मूळ यादीत नसतानाही आमदार पवार यांच्या प्रयत्नांमुळे सात ग्रामपंचायतींमध्ये हा पायलट प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.यावेळी बोलताना आमदार पवार म्हणाले की, स्वयंपूर्ण मतदारसंघ घडविण्याच्या उद्देशाने विविध विकासकामे राबवली जात आहेत. बेलकुंड येथे निम्न तेरणा धरणातून बंद पाईपद्वारे सिंचन उपसा योजना राबवली जाणार असून यामुळे १५ ते १७ गावे हरित होतील.तसेच, तावरजा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरावा यासाठी नागझरी येथून वाहून जाणारे पाणी वळवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून जलसाठा वाढवून पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याशिवाय, सुमारे ६० गावांमध्ये नालीकरण, सरळीकरण आणि खोलीकरणाची कामे हाती घेत-ली जाणार असून त्यामुळे भविष्यात पाण्याची मुबलक उपलब्धता सुनिश्चित होणार आहे.औसा मतदारसंघात ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी टाटा मोटर्स फाउंडेशन, क्रिएट फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक ग्रामविकास प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात तांबरवाडी,दावतपूर फत्तेपूर, पारधेवाडी या ठिकाणी हा प्रकल्प राबविला जाणार आहे अशी माहिती यावेळी आमदार आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली.

**फत्तेपुरात सोमवारी शुभारंभ**

या प्रकल्पाचा शुभारंभ सोमवारी फत्तेपूर येथे होणार असून, कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड , जिल्हा परिषद सीईओ राहुल कुमार मीना आणि आमदार अभिमन्यू पवार उपस्थित राहणार आहेत.एकात्मिक ग्रामविकास प्रकल्पामुळे औसा तालुक्यातील ग्रामीण भागात पाणी, शेती, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात मोठा बदल घडून येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आजनसोंडा व शेळगावच्या हनुमान मंदिराच्या विकासासाठी प्रयत्नशील- सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ११ एप्रिल :** चाकूर तालुक्यातील आजनसोंडा व शेळगाव येथील हनुमान मंदिराच्या विकासासाठी व भविष्यातील येथील गावच्या विकासासाठी कटिबद्ध असून येथील मंदिरासाठी लागेल तेवढा निधी मंदिराच्या विकास कामासाठी देऊ असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी आजनसोंडा व शेळगाव येथे केले.

ते आजनसोंडा व शेळगावच्या हनुमान मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा व कलशारोहन सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

यावेळी मच्छिंद्र नागरगोजे, उपसभापती भुजंग शिंदे, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, अनिल वाडकर, पंचायत समिती सदस्य सुप्रिया नरेंद्र हाक्के, पंचायत समिती सदस्य गजानन हो-नराव, माजी पंचायत समिती सभापती शिव-ाजीराव माने, माजी जिल्हा परिषद सदस्य हनमंत पाटील, सरपंच देविदास माने, गणपत नितळे, महेश देवणे, सिद्धाजी माने, बाबुराव माने, इंद्रजीत माने, अजिज शेख तसेच शेळगाव येथील कार्यक्रमात संतोष भोसले पाटील, गणेश पाटील, दिनकर कुलकर्णी, श्याम भालके, ज्येष्ठ पत्रकार



राजकुमार जगताप, शरद पाटील, सिद्धेश्वर हवा, माणीक कस्तुरे, मुकुंद कस्तुरे सह विविध ना-गरीक उपस्थित होते.

पुढे बोलताना सहकार मंत्री ना . बाबासाहेब पाटील म्हणाले की, या हनुमान मंदिरातून तरुणांनी अध्यात्म जोपासले पाहिजे ,त्याचबरोबर मंदिर बांधण्यापेक्षा मंदिराचे पावित्र्य महत्त्वाचा आहे. येणाऱ्या काळात धार्मिक कार्याबरोबरच विविध सामाजिक कार्यक्रमा साठी सुद्धा या मंदिर देवस्थानने पुढाकार घ्यावा असे आवाहन ही सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी केले.

**माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांचीही भेट**

आजनसोंडा व शेळगावच्या दोन्ही हनुमान मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांनीही सदिच्छा भेट देत मंदिर बांधकामाचे कौतुक करत मंदिर समितीला शुभेच्छा दिल्या.

## केंद्रे महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर परिक्षा सुरळीत सुरु

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. ११ एप्रिल :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व्दारा आयोजित उन्हाळी- २०२६ मधील प्रथम द्वितीय , तृतीय , चौथा , पाचवा , सहवा सेमिस्टर च्या बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी., प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाच्या पदवी व एम ए . बी.एड . पदयुत्तर पदवी परिक्षा जळकोट येथील संभाजीराव केंद्रे वरिष्ठ महाविघालयात सुरळीत सुरू आहेत. या परीक्षा केंद्रावर महत्मा फूले महाविधालय , अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय ,व संभाजीराव केंद्रे महाविद्यालयांचे पदवीचे विद्यार्थी परिक्षा देत आहेत.

या परिक्षा केंद्रावर बी.ए. प्रथम १३२, व्दितीय वर्ष - ५८, तृतीय वर्ष ५० एकून २४० बी.एस्सी. प्रथम १४६ व्दितीय वर्ष १४५ तृतीय वर्ष १२० एकूण ४११ ,

बी. कॉम. प्रथम वर्षाचे ४७ , व्दितीय वर्ष २९ तृतीय वर्ष ४० एकून ११६ बी.ए.बी.एस्सी.बी. कॉम. द्वितीय

बीएड प्रथम व्दितीय वर्षाचे



३१५ तर एम प्रथम , व्दितीय वर्षाचे २० विद्यार्थी सह ११०२ परिक्षार्थी परिक्षा देत आहेत .या उन्हाळी पदवी परिक्षा-२०२६

सुरळीत पार पाडण्यासाठी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी सह

केंद्रप्रमुख प्रा.डॉ. देवशेट्टे एस. एम. ( महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय , ता मुखेड ता. मुखेड जिल्हा नांदेड ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर महाविघालयाने केंद्र संचालक म्हणूण प्रमुख प्रा.डॉ. कडकेकर एन. पी .यांची नेमणूक केली असून , सह साह्यक केंद्रप्रमुख म्हणूण प्रा. प्रा मुंजाजी भोसले. , प्रा. आकाश मठवाले एन, प्रा. सौ आरती सुरपाम, प्रा. पाटील सोनाबाई हे काम पाहत आहेत. या परीक्षा केंद्रावर परिक्षेच्या दरम्यान काही अनुचित प्रकार घडू नये म्हणूण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. टी. लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत दक्षता पथकाची नेमणूक करण्यात आली असून या पथकात प्रा.डॉ. जितेंद्र प्रताप शेळके .. प्रा. केंद्रे कल्पना काशिनाथ . मॅडम , प्रा डॉ सोमवंशी आल्का बाबाराव ,आदी जन काम पाहत आहे. एकंदरीत या पदवी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी

प्राचार्य डॉ.बी.टी. लहाने, उपप्राचार्य डॉ व्यंकटराव पाटील , अधीक्षक श्री अनिल केंद्रे., प्रा डॉ संजय मुंडकर , प्रा डॉ सोमवंशी ए.बी. , प्रा डॉ. पस्ता-पुरे आर. एन. ,प्रा.डॉ.नामदेव राठोड, प्रा. डॉ. कांबळे पी.एस., प्रा.डॉ. बालाजी राठोड, प्रा.डॉ. कांबळे माधव., प्रा. डॉ.केंद्रे टी. ई., , प्रा.डॉ. जोशी ए.जी., प्रा. मोरे एस.एन., डॉ. टिमकीकर डी. एस. प्रा. मुसळे एन.पी., प्रा.डॉ. मुंडे अशोक , ,प्रा. डॉ . मुंडे , आदी कर्मचारी परिश्रम घेत असून जळकोट पोलिस स्टेशनचे पोलीस निरिक्षक मेचेवाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे.

## महात्मा गांधी महाविद्यालयात विद्यार्थी-पालक मेळावा उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ११ एप्रिल :** महात्मा गांधी महाविद्यालयात विद्यार्थी-पालक मेळावा मोठ्या उत्सा-हात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचार विकास मंडळाचे अध्यक्ष ड किशनराव बेंडकुळे हे होते, त्यांनी आपल्या भाषणात म्हटले की, पालक, शिक्षक यांचे ऋणानुबंध हे विद्यार्थांच्या सर्वांगीन विकासाचे आधार स्तंभ असतात. विद्यार्थी घडविण्यात जेवढा शिक्षकांचा सहभाग असतो, तेवढाच त्यांच्या पालकांचाही सहभाग असतो. एकमेकांच्या विश्वासातूनच विद्यार्थी घडत असतो. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची उभारणी शैक्षणिक काळातच होत असते. त्यादृष्टीने आजचा हा विद्यार्थी-पालक मेळावा मला खूप महत्त्वाचा वाटतो. त्यासाठी मी महाविद्यालयाचे अभिनंदन करतो, असे विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव ड. पी. डी. कदम, सहसचिव श्री सुरेशराव देशमुख, तसेच प्राध्यापक प्रतिनिधी प्रा. हेमंत पाटील हे व्यासपीठावर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . व्ही. पी. पवार यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात सातत्याने संवाद घडून येणे आवश्यक आहे. एकमेकांच्या संवादातूनच उत्तम विद्या-र्थी घडतो. म्हणून अशा विद्यार्थी-पालक मेळाव्याची आवश्यकता असते. आपल्या महाविद्यालयातील असंख्य माजी विद्यार्थी आज देशाच्या विविध भागात आणि परदेशात मोठ्या पदावर कार्यरत आहेत . आजचे विद्यार्थी सुद्धा त्या पदापर्यंत पोहोचू शकतात त्यासाठी त्यांनी ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचावीत व आपल्या पालकांचा, गुरुजनांचा विश्वास संपादन करावा आणि यशाची शिखरे पादाक्रांत करावित, असे सांगितले. पालक प्रतिनिधी प्रसाद पाटील व प्रा . डॉ. शादुल पठाण यांनी व विद्यार्थ्यांपैकी भंडे शरयू यांनी मनोगत व्यक्त केले. याच कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२५-२६ चा उत्कृष्ट शिक्षक महाविद्यालय पुरस्कार मराठी विषयाचे प्रा. टी. एस. जोहारे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जे. पी. कुलकर्णी यांनी केले, तर शैक्षणिक माहिती प्रा. एस.के. गायकवाड यांनी सांगितली. याप्रसंगी मोठ्याप्रमाणावर पालक वर्ग आणि महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . आर. डी. गुळवे यांनी केले तर आभार प्रा. ए. एन. शिंदे मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाल करंजे, सुनील राठोड, संतोष पळसकर, दिपक दुर्गे, हानुमंत पौळ, जी. एस. बंडेवाड, शंकर शेळके यांनी परिश्रम घेतले .

## अडत व्यापाऱ्यांच्या हरिनाम सप्ताहात भक्तीसोबतच समाजसेवेचा जागर

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ११ एप्रिल :** शहरातील निलंगा बाजार समितीच्या आवारात व्यापाऱ्यांच्या वतीने गेल्या २४ वर्षांपासून आयोजित करण्यात येत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह यंदाही अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. केवळ आध्यात्मिक उपक्रमच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत या सप्ताहात ११५ रुग्णांची नेत्रतपासणी आणि ३१ रक्तदात्यांनी रक्तदान करून एक नवा आदर्श घालून दिला आहे.

भक्ती आणि शक्तीचा संगम

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही आठ दिवस निलंगा शहरात भक्तीची मेजवानी पाहायला मिळाली. महाराष्ट्रातील

**३१ जणांचे रक्तदान, ११५ जणांची नेत्रतपासणी**

विविध जिल्ह्यांतून आलेल्या नामवंत महाराजांचे कीर्तन, भजन आणि प्रव-चनाने संपूर्ण शहर भक्तिमय झाले होते. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे धार्मिक कार्यक्रमांसोबतच राबविलेले समाजोपयोगी उपक्रम. सप्ताहामध्ये ११५ रुग्णांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली असून, यातील गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे, तसेच त्यांना चष्म्यांचे वाटपही करण्यात येणार आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून ३१ तरुणांनी





स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले आहे.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी निलंग्यातील सर्व अडत व्यापाऱ्यांनी गेल्या आठ दिवसांपासून अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला निलंगा शहराचे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, डॉ अरविंद भातांब्रे, नगरसेवक ईश्वर पाटील, हरीभाऊ सगरे, रविशंकर फुलारी,औराद शह-ाजानी बाजार समितीचे सचिव सतीश मरगणे, संचालक जनार्दन सोमवंशी, उद्योजक विशाल जोळदापके किशोर लंगोटे यांच्यासह अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन झाले. 'विठ्ठल-रखुमाई'च्या जयघोषात आणि गुलालाच्या उधळणीत या सोहळ्याची सांगता झाली. यानंतर निलंगा शहरा-तील हजारो महिला व पुरुष भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ सुरू असलेली ही परंपरा व्यापाऱ्यांच्या एकोप्यामुळे आणि सामाजिक दृष्टिकोनामुळे जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

## संक्षिप्त...

### अंकिता आणि पल्लवी जाधव या बहिणींची पोलीस दलात निवड

**त भा वृत्तसेवा**

**अहमदपूर :** शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द असेल तर परिस्थिती कधीच अडथळा ठरू शकत नाही, हे अहमदपूर तालुक्यातील सुनेगाव शेंद्री येथील अंकिता बाबुराव जाधव आणि पल्लवी विजय जाधव या दोन सख्या चुलत बहिणींनी सिद्ध करून दाखवले. अंकिताने पुणे पोलीस दलात एसईबीसी प्रवर्गातून आणि त्या पूर्वी पल्लवीने नांदेड पो-लीस दलात मिळवलेल्या यशामुळे एकाच घरातील दोन कन्यांनी खाकी वर्दी परिधान केली.



दोन्ही भगिनींचा हा प्रवास अत्यंत खडतर आणि प्रेरणादायी राहिला आहे. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हल-ाखीची असताना आणि वडिलांकडे जेमतेम शेती असूनही त्यांनी आपल्या ध्येयापासून मागे न सरकता हे यश खे-चून आणले त्या साठी त्यांनी कोणत्याही क्लासचा आधार घेतला नाही. त्यांच्या या यशात महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर येथील प्राध्यापक विनोद माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांनी दोन्ही मुलींची मैदानी चाचणी व लेखी परीक्षेची शास्त्रोक्त पद्धतीने तयारी करून घेतली होती.

अंकिता जाधव हिने तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा सुनेगाव शेंद्री येथे पूर्ण केले, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अहमदपूर येथील महात्मा फुले विद्यालय व महाविद्यालयातून घेतले. पल्लवी नंतर अंकिता चीही पुणे पोलीस दलात निवड झाल्याने सुनेगाव शेंद्री गावाचे नाव उज्वल केले आहे. त्यांचे अभिनंदन केले जात आहे , ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या इतर मुलींसाठी जाधव भगिनी आदर्श ठरल्या आहेत.

### रंगकर्मीच्या विज्ञान प्रयोग स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सृजनशिलता व संशोधन वृत्तीला चालना देणारे- शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर :** उदगीर रंगकर्मी साहित्य, कला,क्रीडा प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या प्रयोग स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सृजनशिलता व संशोधन वृत्तीला चालना देणारे असुन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी महत्वाच्यि असल्याचे मत उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांनी व्यक्त केले ते रंगकर्मी प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय विज्ञान प्रयोग स्पर्धेच्या पारीतोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते.

यावेळी प्राचार्य उषा कुलकर्णी, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक महादेव खळूरे, साहित्यिक रसुल पठाण, चंद्रशेखर भालेराव, सतिश चव्हाण, रंगकर्मी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा बिभीषण मद्देवाड, सचीव प्रा.ज्योती मद्देवाड, साहित्यिक रामदास केदार, लक्ष्मण बेंबडे,जहाँगीर पटेल, मारोती भोसले, विशाल आदेप्पा, मनोहर लोहारे, नागनाथ गुट्टे, निवृती जवळे, आदेप्पा यावेळी विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचत, पर्यावरण संरक्षण, जलसंधारण, तसेच तंत्रज्ञान आधारित सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे, तर काहींनी पाणी शुद्धीकरण यंत्राचे मॉडेल सादर केले. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन व प्रयोग स्पर्धेत माध्यमिक गट वर्ग ७ ते९ प्रथम क्रमांक पोस्ते पोद्दार लर्न स्कूल उदगीर द्वितीय सिरॅक स्कूल उदगीर तृतीय विभागून सरदार वल्लभभाई पटेल प्रा शाळा, उदगीर, लिटल अँजल्स दत्तगुरु इंग्लिश स्कूल उदगीर, प्राथमिक गट ३ ते ६ प्रथम टाइम्स पब्लिक स्कूल उदगीर, द्वितीय क्रमांक गोल्डन गेट पब्लिक स्कूल उदगीर, तृतीय क्रमांक लिंकन इंटरनॅशनल स्कूल,उदगीर . या स्पर्धेत प्रथम,५००० द्वितीय३००० आणि तृतीय२००० अशी रोख पारितोषीके व प्रमाणपत्रे देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दलची आवड वाढण्यास मदत होणार असून, भविष्यात अशा स्पर्धांचे आयोजन अधिक प्रमाणात करण्यात येणार असल्याचे आयोजक प्रा ज्योती मद्देवाड यांनी व्यक्त केला.

### अवैध दारु विक्री बंद करा येरोळच्या सरपंचाचे पोलीस निरीक्षकांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथे गेली अनेक दिवसांपासून मुख्य रस्त्यावर तीन चार दारु विक्रेत्यांकडून अवैध दारू विक्री करण्यात येत असून याचा रस्त्यावरुन जाणारे शाळकरी विद्यार्थी, महिला, नागरिक यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे अवैध दारू विक्री तात्काळ बंद करण्यात यावी अशी मागणी ग्रामपंचायतीच्या वतीने निवेदनाद्वारे शिरूर अनंतपाळ पोलिस ठाणे यांच्याकडे करण्यात आली आहे.




अवैध दारू विक्री मुख्य रस्त्यावर जागोजागी केली जात आहे याच मुख्य रस्त्यावरुन गावातील सर्व वाहतूक होते दारुडे दारुच्या नशेत मुख्य रस्त्यावर नशेत धिंगाणा घालणे, रस्त्यावर लोळणे या प्रकारामुळे लहान शाळकरी मुले भितीने शाळेत जात नाहीत अशा पालकातून तक्रारी वाढत आहेत, मुख्य रस्त्यावर दारु पिऊन नशेत फिरणाऱ्या लोकांनमुळे महिला, वयोवृद्ध नागरिकात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी पोलिस प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन येथील अवैध दारू विक्री थांबवावे अन्यथा ग्रामस्थांच्या वती-ने आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे सरपंच सतिश सिंदाळकर यांच्या सह ग्रामस्थांनी दिला आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## परंड्यात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.११ एप्रिल -**

क्रांतीसूर्य, सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती परंडा येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात साजरी करण्यात आली.




या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष धनंजय सोनटक्के, जिल्हा उपाध्यक्ष मोहन बनसोडे, शिवसेनेचे विश्वजित पाटील, न.प. उपाध्यक्ष समरसिंह ठाकूर, प्रा.डॉ. शहाजी चंदनशिवे, अनिल शिंदे, रमेशसिंह परदेशी, राहुल बनसोडे, मजहर दहलुन, डॉ. अब्बास मुजावर, सत्तार पठाण, अकीब पठाण, अविनाश विधाते, सोमनाथ अलबते, नसीर शहाबर्फीवाले, शिवाजी मेहेर, श्रीहरी नाईकवाडी, नंदकुमार शिंदे, उमाकांत गोरे, तानाजी सोनवणे, शांतीलाल चंदनशिवे, अजीनाथ राऊत, उत्तरेश्वर बापू ठवरे, प्रा. विलास गायकवाड, किरण बनसोडे, तु.दा. गंगावणे, विजय मेहेर, गोरख देशमाने तसेच विलास जाधव, नवनाथ गावडे, शहाजी सोलंकर, गंप्पू साडेकर, मधुकर सुरवसे, घनशाम शिंदे यांचीही उपस्थिती होती.



### संक्षिप्त वृत्त...




## भूम भाजपा कार्यालयात महात्मा फुलेंना अभिवादन

**भूम, दि.११ एप्रिल -**

महान समाजसुधारक, शिक्षणप्रेमी आणि स्त्री-शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त भाजप कार्यालय, भूम येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बाळासाहेब क्षीरसागर, तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर, शहराध्यक्ष बाबासाहेब वीर, सरचिटणीस आबासाहेब मस्कर, सोपान वरबडे, चंद्रकांत मासाळ, प्रदीप साठे, सोमेश्वर उंबरे, संतोष आवताडे, उमेश ढगे, अमोल लोंढे, सोमनाथ मिसाळ, तानाजी साबळे, शुभम खामकर, बन्सी काळे, सिद्धार्थ जाधव, रमेश माळी, सूरज माळी, महेश माळी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजसेवक उपस्थित होते.



## तुळजापूरात साहित्य संमेलनाध्यक्ष श्रीपाल सबनीस यांची सदिच्छा भेट

**तुळजापूर, दि.११ एप्रिल -**

श्री तुळजाभवानी मंदिर दर्शनासाठी तुळजापूर येथे आलेले ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी मराठवाडा साहित्य परिषद (म.सा.प.) तुळजापूर शाखेच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान श्रीपाल सबनीस यांनी शाखेच्या ग्रंथालयाची सविस्तर पाहणी केली. ग्रंथसंपदा, वाचन संस्कृती वाढविण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम तसेच स्थानिक पातळीवरील साहित्यिक कार्यक्रमांविषयी त्यांनी समाधान व्यक्त करत तुळजापूर शाखेच्या कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी म.सा.प. तुळजापूर शाखेच्या वतीने श्रीपाल सबनीस व त्यांच्या पत्नींचा शाल, कवड्याची माळ व पुस्तके देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. हा सत्कार किरण हंगरगेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रसंगी कवी दास पाटील, के.टी. ताटे, राजेश शिंदे, दिपक पावेकर तसेच म.सा.प. चे इतर सदस्य उपस्थित होते.

## पूजा ढगे यांची जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन समितीवर निवड

**भूम, दि.११ एप्रिल -**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन समिती सदस्यपदी पूजा विशाल ढगे यांची निवड झाली आहे.



त्या माजी आरोग्यमंत्री आमदार प्रा.डॉ. तानाजी सावंत यांचे सहकारी विशाल ढगे यांच्या पत्नी असून, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे व रामचंद्र घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची निवड झाली. पूजा ढगे या विविध सामाजिक व कृषी उपक्रमांत सक्रिय असून, शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणे व विकासकामांना गती देण्यासाठी त्या प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## लोहारा येथे महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

**लोहारा, दि.११ एप्रिल -**

महात्मा फुले युवा मंच, लोहारा यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती शहरातील महात्मा चौकात उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात अभिमान खराडे यांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमास शहरातील नागरिक उपस्थित राहून महात्मा फुले यांच्या कार्याला अभिवादन केले.



## 'स्वामी विवेकानंद'मध्ये महात्मा फुलेंना अभिवादन

**उमरगा, दि.११ एप्रिल -**

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका सविता लोहार व शिक्षण विस्तार अधिकारी संजय राऊत यांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या समाजसुधारणेतील कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे, बेबी सरोजा पवार यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# तुळजापूरच्या सर्वांगीण विकासासाठी ५० वर्षांचा मास्टर प्लॅन; अडचणी दूर करून कामांना गती!

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ एप्रिल -**

धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या तुळजापूर शहराचा पुढील ५० वर्षांचा विचार करून अर्बन प्लॅनिंग मास्टर प्लॅन तयार करण्यात येणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.



शहराचा शाश्वत व नियोजनबद्ध विकास साधण्यासाठी हा मास्टर प्लॅन महत्त्वाचा ठरणार आहे.या योजनेत शहर विकास, मंदिर परिसराचा विकास, रस्त्यांचे आधुनिकीकरण तसेच भविष्यातील गरजा लक्षात घेऊन जमिनीखालील लाईट केबल व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात येणार आहे.

वाढत्या शहरीकरणाचा विचार करून वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता व पर्यावरणीय संतुलन यांचाही समावेश करण्यात येईल. तसेच विकास कामांमध्ये येणाऱ्या सर्व अडचणींचा सखोल आढावा घेऊन त्या तात्काळ सोडवण्यात येणार आहेत. प्रशासकीय, तांत्रिक व स्थानिक अडथळे दूर करून प्रलंबित कामांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तुळजापूर



शहराला आधुनिक, स्वच्छ व सुबक धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी हा मास्टर प्लॅन महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढवून निर्णय प्रक्रिया जलद करण्यात येणार असून, नागरिकांच्या अपेक्षेनुसार कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे.

शहरातील लोकप्रतिनिधींना या विकास प्रक्रियेत विशेष जबाबदाऱ्या देण्यात येणार असून, प्रत्येक विभागासाठी समन्वयकांची नियुक्ती केली जाणार आहे. शहर स्वच्छतेसाठी समन्वयकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष विनोद गंगणे, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, सागर कदम, औदुंबर कदम, लखन पेंदे, आनंद कंदले, संदीप गंगणे, रत्नदिप भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांची पट पडताळणी मोहीम; शैक्षणिक नोंदींची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ एप्रिल -**

उमरगा येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे शासनाच्या आदेशानुसार शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ रोजी विद्यार्थ्यांची पट पडताळणी प्रक्रिया पार पडली. राज्यातील सर्व शाळांमध्ये सध्या ही मोहीम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून या शाळेत प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली.

शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांची उपस्थिती, नावनोंदणी व शैक्षणिक नोंदींची अचूकता तपासण्यासाठी ही मोहीम सुरू आहे. या अनुषंगाने शिक्षण विस्तार अधिकारी संजय राऊत यांनी स्वतः शाळेला भेट देत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची वर्गनिहाय पडताळणी केली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी आवश्यक कागदपत्रे व माहिती उपलब्ध करून दिली. तसेच शिक्षक गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे, व्यंकट वचने यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पट पडताळणी प्रक्रियेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांची अचूक संख्या निश्चित होण्यास मदत होणार असून, शैक्षणिक नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. तसेच शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ योग्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासही या प्रक्रियेचा उपयोग होणार आहे.

## डॉ. तांबारे व पत्रकार बारकुल यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.११ एप्रिल -**

येरमाळा येथील डॉ. संदीप तांबारे यांना 'पुण्य पुरस्कार' तर पत्रकार दिपक बारकुल यांना 'कै. अनंत भालेराव स्मृती स्पर्धा पत्रकारिता पुरस्कार' जाहीर झाला आहे.




डॉ. संदीप तांबारे यांनी 'येडाई व्यसनमुक्ती केंद्रा'च्या माध्यमातून समाजातील अनेक तरुणांना व्यसनमुक्त करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. धाराशिवसह सोलापूर जिल्ह्यात 'आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्र' उभारून त्यांनी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने अनेक व्यसनाधीन युवकांना नवे जीवन दिले आहे. त्यांच्या या समाजोपयोगी कार्याची दखल घेत त्यांना 'पुण्य पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. या दोन्ही पुरस्कारांचे वितरण रविवारी धाराशिव येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरात आयोजित कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या पुरस्कारांबद्दल सर्व स्तरातून डॉ. तांबारे व दिपक बारकुल यांचे अभिनंदन होत आहे.

## सामनगावात घराला आग; काळे कुटुंबाचा संसार जळून खाक

### तानाजीराव सावंत यांच्या माध्यमातून मदत; अर्चना दराडे यांचा तत्पर पुढाकार...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.११ एप्रिल -**

तालुक्यातील सामनगाव येथे पारधी समाजातील एका कुटुंबाच्या घराला आग लागून घरातील संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना घडली. या आगीत कपडे, धान्य, घरगुती वस्तू तसेच लहान मुलांचे शालेय साहित्य पूर्णपणे नष्ट झाले असून कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सामनगाव येथील मीराबाई काळे यांच्या घरास अचानक आग लागली. या घटनेत त्यांचे संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाले. दरम्यान,



नातीला वाचवताना मीराबाई काळे या गंभीररीत्या भाजल्या असून त्यांच्या दोन्ही हातांना दुखापत झाली आहे.

घटनेची माहिती मिळताच शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अर्चना दराडे यांनी तात्काळ कुटुंबाशी संपर्क साधत घटनास्थळी भेट दिली. त्यांनी पीडित कुटुंबाला अन्नधान्य, किराणा साहित्य, साड्या, मुलांसाठी दप्तर व खाऊ देत मदतीचा हात पुढे केला.

तसेच त्यांनी तातडीने भूम ग्रामीण रुग्णालयाशी संपर्क साधून ॲम्ब्युलन्स बोलावून मीराबाई काळे यांना उपचारासाठी दाखल केले.

यावेळी अर्चना दराडे यांनी तानाजीराव सावंत यांच्या माध्यमातून पत्र्याच्या शेडसाठी आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले असून, उद्ध्वस्त झालेला संसार पुन्हा उभा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, या मदतीमुळे काळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

## फुले-आंबेडकर संयुक्त जयंतीनिमित्त विविध उपक्रमांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, धाराशिव जिल्ह्याच्या वतीने महात्मा फुले चौक येथे अभिवादन करण्यात आले.

फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन जाहीर करण्यात आले. यामध्ये निबंध, वक्तृत्व, नाट्य, कविता वाचन, चित्रकला, भित्तिपत्रक तसेच साहित्य वाचन स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच रक्तदान, आरोग्य शिबिरे, कवी संमेलन, परिसंवाद, सत्यशोधक विवाह व समाजप्रबोधनाचे विविध कार्यक्रम राबवून समतेचा विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास विविध पदाधिकारी, सरपंच व नागरिक उपस्थित होते.

## आळणी शाळेला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट; शैक्षणिक गुणवत्तेचे कौतुक

### पीटी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर सुविधा तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

पीटी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद धाराशिवच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. प्रियंवदा महाडदळकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आळणी येथे भेट देऊन शाळेच्या शैक्षणिक व भौतिक सुविधांची सविस्तर पाहणी केली.

यावेळी त्यांनी शाळेतील स्वच्छतागृहासह विविध सुविधांची तपासणी केली. तसेच डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम इनोव्हेटिव्ह अँड सायन्स सेंटर, ॲस्ट्रॉनॉमी लॅब आणि आयडियल कॉम्प्युटर सेंटरला भेट देत त्यांच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. शाळेत उपलब्ध आधुनिक सुविधांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांनी इंग्रजीतून आत्मविश्वासाने संवाद साधत आपली बौद्धिक क्षमता दर्शविली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी तत्परतेने व प्रभावीपणे उत्तरे दिली. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व वर्गांना भेट देत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला आणि शैक्षणिक गुणवत्तेची पाहणी केली. तसेच झढ परीक्षेबाबत शिक्षक व विद्यार्थ्यांशी चर्चा करून मार्गदर्शन केले.



शाळेच्या एकूण गुणवत्तेचे विशेष कौतुक करत त्यांनी, शाळेची गुणवत्ता अत्यंत उत्कृष्ट असून येथील विद्यार्थी अत्यंत हुशार आहेत, असे गौरवोद्गार काढले आणि शाळेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेस प्रथमच भेट दिल्याबद्दल मुख्याध्यापक बशीर तांबोळी व सरपंच प्रमोद वीर यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. तसेच शाळेतील अडचणी सोडविण्यासाठी व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वैयक्तिक लक्ष देण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी रंजना मैंदर्गी यांनीही प्रत्यक्ष वर्गात जाऊन पट पडताळणी केली व शाळेच्या कामकाजाचा आढावा घेतला.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त वाचन संकल्प व ग्रंथ प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि.११ एप्रिल रोजी महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन संकल्प व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुभाष राठोड होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. अशोक कदम, डॉ. शिवाजी घोडके, डॉ. दिपक जगदाळे, डॉ. हंसराज जाधव तसेच ग्रंथपाल डॉ. सुभाष जोगदंडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.



यावेळी उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांना वाचन संकल्प करण्याची शपथ देण्यात आली. महाविद्यालयात मांडण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ होण्यास मदत होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

हे ग्रंथ प्रदर्शन दि.११ ते १९ एप्रिलपर्यंत खुले राहणार असून, गावातील वाचकप्रेमी व विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.


या कार्यक्रमास प्रा.डॉ.पी.एस. गायकवाड, डॉ. तुळशीराम दबडे, डॉ. लक्ष्मण थिटे, डॉ.एस.यु. मिटकर, डॉ.यु.एन. भाले, डॉ. संतोष पवार, विजय सुरवसे, सचिन गायकवाड, हामेद काझी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुभाष जोगदंडे यांनी केले.

## लोहारा येथे महात्मा फुले जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ एप्रिल -**

महात्मा फुले युवा मंच, लोहारा यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती महात्मा चौकात उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी मा. नगरसेवक अभिमान खराडे यांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास विविध मान्यवर व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली.

या प्रसंगी शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून महात्मा फुले यांच्या कार्याला अभिवादन केले.

## कळंबमध्ये वाढत्या गुन्हेगारीविरोधात छावा संघटनेचा इशारा; पोलिसांकडे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.११ एप्रिल -**

कळंब शहरात अलीकडील काळात सार्वजनिक ठिकाणी भांडण-तंटे करून दहशत निर्माण करण्याचे प्रकार वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शाळा, महाविद्यालये, बसस्थानक तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये अशा घटना वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात शहरात नियमित गस्त वाढवून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच वर्दळीच्या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने वाहने पार्क करणे, मोठ्या आवाजात सायलेंसर असलेल्या दुचाकी भरधाव चालविणे, अवैध धंदे आणि बेशिस्त पार्किंग यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी अखिल भारतीय छावा संघटनेचे शहराध्यक्ष अमर गायकवाड, अमोल कसबे, अण्णा हौसलमल, मंगेश सुकाळे, कृष्णा चाटे उपस्थित होते.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धाराशिवात महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.११ एप्रिल -**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी युवा नेतृत्व मल्हार पाटील यांनी उपस्थित राहून अभिवादन केले.



महात्मा फुले हे अन्याय, अंधश्रद्धा आणि विषमतेविरुद्ध लढणारे महान क्रांतिकारक होते. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समतेवर आधारित, न्याय्य आणि प्रगत समाज घडवण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असा संदेशही देण्यात आला.

या कार्यक्रमास नगराध्यक्षा नेहा काकडे, उपनगराध्यक्ष अक्षय ढोबळे, नगरसेवक, नगरसेविका तसेच कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### तेरखेडा येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

**वाशी, दि.११ एप्रिल -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने गावातील शिवसेना कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी फुले यांच्या समाजसुधारणेतील कार्याचा गौरव करण्यात आला. शिक्षणाचा प्रसार, स्त्री-शिक्षणाची चळवळ आणि सामाजिक समतेसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख करून त्यांच्या विचारांवर प्रकाश टाकण्यात आला. या प्रसंगी गावातील नागरिक उपस्थित होते.

### अर्चना माने यांची तालुकाध्यक्षपदी निवड

**भूम, दि.११ एप्रिल -**

शिवसेना बांधकाम मजूर सेनेच्या महिला तालुकाध्यक्षपदी ईट (ता. भूम) येथील अर्चना समाधान माने यांची निवड करण्यात आली.



त्यांना निवडीचे पत्र राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर व खासदार उन्मेष पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हा प्रमुख सूरज साळुंके, दत्ताअण्णा साळुंके, युवा सेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब मांगले, समाधान माने यांच्यासह मोठ्या प्रमाणात शिवसैनिक उपस्थित होते. अर्चना माने यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र कौतुक होत असून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



### ईट ग्रा.पं. महात्मा जोतीराव फुलेंना अभिवादन

**भूम, दि.११ एप्रिल -**

ईट येथील ग्रामपंचायत कार्यालयात महात्मा जोतीराव फुले यांची जयंती सकाळी १० वाजता उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी समाजातील वंचित व शोषित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेल्या महान कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक सुधारणा, शिक्षण प्रसार आणि समतेच्या विचारांवरही प्रकाश टाकण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते सुनील देशमुख, ग्रामपंचायत सदस्य गणेश चव्हाण, समाजसेवक ईश्वर देशमुख, बाबासाहेब भोसले, समर्थ हुंबे, अशोक माने, संजय हुंबे, सुरेश टिळेकर, आप्पासाहेब देशमुख, बाळासाहेब स्वामी आदी उपस्थित होते.



### 'महात्मा बसवेश्वर'मध्ये महात्मा फुले जयंती साजरी

**उमरगा, दि.११ एप्रिल -**

श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नेताजी गायकवाड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे शरद गायकवाड यांनी आपल्या भाषणात फुले यांच्या कार्याचा गौरव करत स्त्री-शिक्षण, सामाजिक समता व अंधश्रद्धाविरोधातील त्यांच्या लढ्याचा उल्लेख केला. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श व्यक्तिमत्व घडवून समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन रवींद्र पोतदार यांनी व्यक्त केले. यावेळी शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व प्रेरणा निर्माण झाल्याचे दिसून आले.

### दारफळातून मोटारसायकल चोरी

**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

ज्ञानेश्वर बाबुराव सुरवसे यांच्या मालकीची अंदाजे ३०,००० रुपयांची हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. एमएच २५ ए.एम. ७२९८) अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली आहे. दि.९ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास, दारफळ शिवारातील फिर्यादी यांच्या शेतातून ही मोटारसायकल चोरीस गेली. या प्रकरणी ज्ञानेश्वर सुरवसे यांनी दि.१० एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# तुळजाभवानी मंदिरात 'रेफर पास'ला गर्दी; देणगी पासपेक्षा स्वस्त पर्यायावर भाविकांचा ओघ

**दोनशे रुपयांच्या रेफर पासमुळे वाढली रांग... समान दर्शन व्यवस्थेची मागणी जोरात...**

**सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.११ एप्रिल -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये 'रेफर दर्शन पास'ला सध्या मोठी गर्दी होत असल्याचे चित्र दिसत आहे. पाचशे रुपयांच्या देणगी दर्शन पासपेक्षा रेफर पास केवळ दोनशे रुपयांत मिळत असल्याने भाविकांचा ओघ त्या दिशेने वाढला आहे.





दररोज हजारोंच्या संख्येने भाविक तुळजापूर येथे दाखल होत असून, गरीब ते श्रीमंत सर्व स्तरातील भक्त आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येतात. गरीब भाविक मोफत मुखदर्शन व धर्मदर्शन रांगेतून तासन्तास थांबून दर्शन घेतात, तर काही भाविक देणगी पास घेऊन जलद दर्शन घेतात. मात्र, विश्वस्तांचे पाहुणे, शासकीय अधिकारी तसेच आमदारांच्या शिफारसीवर येणाऱ्या भाविकांना 'रेफर पास' कमी दरात मिळत असल्याने या पाससाठी मोठ्या रांगा लागलेल्या दिसतात.

प्रत्येक विश्वस्त व जनसंपर्क अधिकाऱ्यांना पासचा कोटा उपलब्ध असल्याने रेफर आणि गेस्ट पासधारकांची संख्या वाढली आहे. परिणामी, पास काढण्यापासून दर्शनापर्यंत व्हीआयपी भाविकांनाही रांगेत थांबावे लागत असून, व्हीआयपी नसून सामान्य भाविक झालो अशी चर्चा रांगेत ऐकू येत आहे.

दरम्यान, मुखदर्शन व धर्मदर्शन घेणाऱ्या भाविकांना सिंह गाभाऱ्यातून लांबून दर्शन दिले जाते, तर देणगी, गेस्ट आणि रेफर पासधारकांना चोपदार दरवाज्यापासून दर्शन मिळते. यामुळे देवाच्या दरबारातही श्रीमंत-गरीब भेदभाव होतो अशी भावना काही भाविक व्यक्त करत आहेत.

सर्व भाविकांना समान ठिकाणावरून दर्शन दिल्यास भेदभावाची भावना दूर होईल, अशी मागणी होत आहे. तसेच रेफर पाससाठी वाढती गर्दी लक्षात घेता काउंटर वाढविणे किंवा पर्यायी उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही भाविकांचे मत आहे.

मंदिर संस्थान यावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## धाराशिवात भरधाव कारची धडक; पादचारीचा मृत्यू, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

रामप्रताप रामनिवास सहानी (वय ३४, रा. उत्तरप्रदेश, ह.मु. विलाराजे नगर, धाराशिव) यांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.



दि.६ एप्रिल रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास रामप्रताप सहानी हे विमलाराजे नगर येथून सांजा चौकाकडे पायी चालत जात असताना, कार क्रमांक डी.एल.३ सी.सी.एन. २११७ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात रामप्रताप सहानी गंभीर जखमी झाले व त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी फिर्यादी शशीकांत मधुकर मोरे (वय ३४, रा. शिवनेरी नगर, धाराशिव) यांनी दि.१० एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## नायगांवात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' शिबिर संपन्न

**नायगांव, दि.११ एप्रिल -**

कळंब तालुक्यातील नायगांव येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात महसूल, भूमी अभिलेख, ग्रामविकास, कृषी, महिला व बालकल्याण, आरोग्य, शिक्षण आदी १९ विभागांच्या सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिबिरात ५२८ नागरिकांनी प्रत्यक्ष लाभ घेतला, तर १३८ अर्ज स्वीकृत करण्यात आले. एकूण ६६६ नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. विविध विभागांच्या समन्वयातून तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, तहसीलदार हेमंत ढोकले, ग्रामस्थ उपस्थित होते.

## उमरग्यात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर अभाविप आक्रमक; नगराध्यक्षांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ एप्रिल -**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) उमरगा शाखेच्या वतीने शहरातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी नगराध्यक्ष किरण गायकवाड यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांची कमतरता अधोरेखित करण्यात आली. विशेषतः विद्यार्थिनींसाठी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांची सुविधा, नियमित स्वच्छता राखणे, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणपोई तसेच रस्त्यावरील बंद दिवे तात्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, या समस्या लवकरात लवकर मार्गी न लावल्यास विद्यार्थ्यांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा अभाविपच्या शहर मंत्री अमृता मुगळे यांनी दिला. यावेळी अभिषेक मिसाळ, पंकज बेळकोने तसेच शेखर सूर्यवंशी उपस्थित होते.

## पाथरुडमध्ये प्रशासनाची कारवाई वादात; तरुणाचा व्यवसाय जमीनदोस्त, आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.११ एप्रिल -**



कायद्याचा धाक दाखवून सर्वसामान्यांचे संसार उघड्यावर आणण्याचे प्रकार प्रशासनाकडून वारंवार घडत असल्याची चर्चा सुरू असतानाच, भूम तालुक्यातील पाथरुड येथे अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. लघु पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता जेसीबीच्या साहाय्याने एका तरुणाचा पिढ्यानपिढ्या चालत आलेला व्यवसाय उद्ध्वस्त केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या अन्यायाविरोधात संबंधित तरुणाने जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाथरुड येथील अविनाश बलभीम बोराडे यांचा गट नंबर १३९४ (सर्वे नं. १२४) मध्ये स्वतःच्या मालकीच्या जागेत व्यवसाय सुरू होता. दि. १८ मार्च २०२६ रोजी लघु पाटबंधारे विभाग, भूम अंतर्गत पाथरुड सिंचन शाखा क्र.१२ चे अधिकारी व कर्मचारी अचानक येथे दाखल झाले. कोणतीही नोटीस किंवा पूर्वसूचना न देता प्रशासनाने थेट जेसीबी लावून व्यवसाय जमीनदोस्त केला. या कारवाईत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा बोराडे यांनी केला असून, त्यांच्या उपजीविकेचे साधन पूर्णपणे हिरावले गेले आहे. मात्र अधिकाऱ्यांनी नियम धाब्यावर बसवून ही कारवाई केली. यामुळे माझे आर्थिक व मानसिक नुकसान झाले आहे. माझ्या जीवाचे काही बरेवाईट झाल्यास प्रशासन जबाबदार राहील, असा संताप अविनाश बोराडे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात व्यक्त केला आहे.

या तक्रारीच्या प्रती खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. यावर जिल्हाधिकारी काय भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

## धाराशिव आरटीओची ११४.५७ टक्के महसूल वसुली; उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये शासनाने दिलेल्या उद्दिष्टाच्या ११४.५७ टक्के महसूल वसुली करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या कालावधीत तब्बल १२६ कोटी ३० लाख रुपयांचा महसूल शासनास मिळवून देण्यात आला असून, मागील वर्षाच्या तुलनेत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे.

वाहन नोंदणीचा महसूलात मोठा वाटा असून, वर्षभरात ३८ हजार ६२४ वाहनांची नोंदणी करण्यात आली. तसेच आकर्षक क्रमांक शुल्कातून ३ कोटी १९ लाख रुपयांची कमाई झाली.

वायुवेग पथकाने १९ हजार ४७५ वाहनांवर कारवाई करून ४ कोटी ५ लाख रुपयांचा




दंड वसूल केला. यासोबतच रस्ता सुरक्षा जनजागृती, प्रशिक्षण, हेल्मेट वापर, "Walk on Right' संकल्पना, तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

या सर्व उपक्रमांमुळे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव हे महसूल वसुलीसह रस्ता सुरक्षा जनजागृतीतही आदर्श ठरत असल्याचे दिसून येत आहे.

## धाराशिवात 'सामाजिक समता सप्ताह' निमित्त महिला मेळावा

**स्वयंरोजगार व समानतेचा संदेश...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ एप्रिल -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष, संत गाडगे महाराज जयंतीचे १५० वे वर्ष तसेच महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' ८ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी, १० एप्रिल रोजी सामाजिक न्याय भवन, धाराशिव येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, नगराध्यक्षा नेहा काकडे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले, सुखदेव चिंचोलकर, अर्चना नरवाडे, अमोल बळे, व्याख्याते महेंद्र चंदनशिवे, प्रा. राजा जगताप, वनिता डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. महिला मेळाव्यात मार्गदर्शन करताना अध्यक्षा अर्चना पाटील यांनी सांगितले की, भारतीय संविधानाने महिलांना समानतेचा हक्क दिला असून आर्थिक अडचणींना खचून न जाता शासनाच्या विविध



योजनांचा लाभ घेऊन स्वयंरोजगार निर्माण करणे आवश्यक आहे. बचत गटांच्या माध्यमातून विविध व्यवसाय उभारून जिल्ह्याचे नाव उंचावावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच अंधश्रद्धेला बळी न पडता विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी आपल्या भाषणात संविधानामुळे महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली असून त्यातून नारीशक्ती अधिक सक्षम होत असल्याचे सांगितले. शिक्षणामुळे महिलांमध्ये सकारात्मक बदल घडत असून त्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत आहेत, असे त्या म्हणाल्या. यावेळी महिला व आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने २००७ पासून बचत गटांना आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती देण्यात आली. तसेच बचत गटांची उत्पादने ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रमात सेंद्रीय शेती, महिला आरोग्य, स्त्री-पुरुष समानता आणि जीवामृत या विषयांवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ज्ञानदीप, समता आणि नवप्रभा, लोकसंचलित साधन केंद्रांना 'नवतेजस्विनी' प्रकल्पांतर्गत प्रत्येकी ५० हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. तसेच २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कार्याबद्दल महिला व आर्थिक विकास महामंडळ, धाराशिव यांना राज्यात द्वितीय क्रमांक मिळाल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.